रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २२२ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)    www.krushival.in


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १८ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹


## ‘नोटा’ला ४३ हजार २११ मते

**पनवेल :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत यंदा राजकीय समीकरणांइतकेच ‘नोटा’ म्हणजेच नन ऑफ द अबाव्ह या पर्यायाने लक्ष वेधून घेतले. ७८ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत तब्बल २४५ उमेदवार रिंगणात होते. एकूण मतदारसंख्या ५ लाख ५४ हजार ५७८ इतकी असताना केवळ ५६ टक्के मतदान झाले. म्हणजेच ३ लाख ८ हजार ७०८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या मतदानात ‘नोटा’ला तब्बल ४३ हजार २११ मते मिळाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. लोकशाही व्यवस्थेत ‘नोटा’ हा पर्याय केवळ एक तांत्रिक सुविधा नसून, मतदारांच्या असंतोषाचा थेट पान २ वर

## लाचखोर तलाठी एसीबीच्या जाळ्यात

**पुणे :** शेतजमिनीच्या पंचनाम्याच्या कामासाठी लाच मागणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) महिलेस सात हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. छत्रपती संभाजीराजे चौक, नाव्हरा-तळेगाव रोडवर शुक्रवारी (दि.१६) ही कारवाई करण्यात आली आहे. ग्राम महसूल अधिकारी प्रमिला नागेश वानखेडे (४२) असे कारवाई करण्याच आलेल्या महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत ५६ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. तक्रारदार यांची शिरसगाव काटा येथे वडिलोपार्जित जमीन आहे. वडिलांनी तोंडी वाटप करून दिलेल्या त्यांच्या हिस्स्याच्या शेतजमिनीची लेव्हल करत असताना भावासोबत वाद झाला होता. त्यानंतर ९ जानेवारी रोजी तलाठी पान २ वर

# दिल्लीसह चार राज्यांत हाय अलर्ट



■ २६ जानेवारीपूर्वी दहशतवादी हल्ल्याची शक्यता

■ गुप्तचर यंत्रणांचा सतर्कतेचा इशारा

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीसह देशातील चार राज्यांमध्ये दहशतवादी हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन भारतीय गुप्तचर यंत्रणांनी हाय अलर्ट जारी केला आहे. २६ जानेवारीपूर्वी खलिस्तानी आणि परदेशस्थित दहशतवादी नेटवर्ककडून हल्ल्याचा कट रचला जात असल्याचे गंभीर इशारे मिळाल्याने सुरक्षायंत्रणा पूर्णतः सतर्क करण्यात आल्या आहेत. इंटेलिजन्स ब्युरो (आयबी) शी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, बंदी घातलेल्या खलिस्तानी संघटना तसेच बांगलादेशस्थित दहशतवादी गट दिल्लीसह प्रमुख शहरांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करू शकतात. या कटात गुन्हेगारी टोळ्यांची मदत घेतली जात असल्याचेही समोर आले आहे.

### राजधानीत मॉक ड्रिल, सुरक्षा यंत्रणांची कसोटी

२६ जानेवारी रोजी कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनापूर्वी दिल्ली पोलिसांच्या नॉर्थ डिस्ट्रिक्टने संवेदनशील आणि गर्दीच्या ठिकाणी मॉक ड्रिल घेतली. लाल किल्ला, कश्मीरी गेट, चांदणी चौक तसेच विविध मेट्रो स्थानकांवरही सुरक्षा सराव मोहिमा राबवण्यात आल्या. या मॉक ड्रिलचा उद्देश संभाव्य दहशतवादी हल्ल्यांवर तात्काळ नियंत्रण ठेवण्याची तयारी तपासणे, तसेच सुरक्षायंत्रणा आणि नागरिकांना अधिक सतर्क करणे हा आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर असून, संशयित हालचालींवर कडक नजर ठेवण्यात येत आहे. नागरिकांनीही सतर्क राहून कोणतीही संशयास्पद बाब तात्काळ पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे

वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, पंजाबमधील काही कुख्यात गँगस्टर परदेशातून कार्यरत खलिस्तानी आणि कट्टरपंथी हँडलर्ससाठी ‘फूट सोल्जर’ म्हणून काम करत आहेत. भारताची अंतर्गत सुरक्षा कमकुवत करण्यासाठी आणि आपला अजेंडा राबवण्यासाठी हे हँडलर्स गुन्हेगारी नेटवर्कचा वापर करत असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. गुप्तचर अहवालानुसार हे गँगस्टर हरियाणा, दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये सक्रिय असून, त्यांचा खलिस्तानी दहशतवादी संघटनांशी संपर्क दिवसेंदिवस वाढत आहे.

यापूर्वी १० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कारमध्ये झालेल्या आत्मघाती दहशतवादी हल्ल्यात १५ जणांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर यंदा कोणतीही जोखीम न घेण्याच्या दृष्टीने सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. सर्व यंत्रणा सतर्क झाली आहे.

## वेधक

### एकाला हॉकी स्टीकने मारहाण चौघांविरोधात गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** वाकडी येथील रिसॉर्टमध्ये पार्टी करून घरी परत जात असताना पार्टीमध्ये झालेल्या बाचाबाचीच्या रागातून चिपळे ब्रिजजवळ ३५ वर्षीय माधव येरोले याला लाथाबुक्क्यांनी आणि हॉकी स्टीकने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी सुधीर ठोंबरे, जीवन कांबळे, सुभाष घाडगे, विराट पवार (सर्व रा. कळंबोली) यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १७ जानेवारी रोजी पुन्हा दाखल करण्यात आला. माधव येरोले हा नावडे कॉलनी येथे राहात असून, १६ जानेवारी रोजी पनवेल पालिका निवडणुकीत नगरसेवक निवडून आल्याने शिवसेना शिंदे गटाचे दहा ते पंधरा कार्यकर्ते वाकडी येथील रिसॉर्टवर गेले. रिसॉर्टवर पार्टी चालू असताना रात्री साडे अकराच्या सुमारास पान २ वर

### एकाचा दुर्दैवी मृत्यू

**पनवेल :** पनवेलजवळील सोमाटणे गावाजवळ कोनसावळा मार्गावर असलेल्या केरी इंडेव्ह लॉजिस्टिक कंपनीत घडलेल्या एका भीषण अपघातात एका कामगाराचा दुर्दैवी अंत झाला आहे. मोहन गोमा म्हस्कर (५५) असे या कामगाराचे नाव असून, ते नारपोली गावचे रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, मोहन म्हस्कर हे दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास कंपनीच्या आवारात काम करत होते. यावेळी कंटेनर उचलण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या फोर्कलिफ्ट वाहनाच्या मागील चाकाखाली ते अचानक सापडले. फोर्कलिफ्टचे चाक त्यांच्या पोटावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत त्यांचा अंत झाला.

### यूपीएससी मुलाखतीच्या वेळापत्रकात बदल

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) सिव्हिल सेवा परीक्षा २०२५ च्या व्यक्तिमत्व चाचणी (मुलाखत) वेळापत्रकात कार्यक्रमात मर्यादित स्वरूपाचा बदल जाहीर केला आहे. या बदलाचा परिणाम फक्त त्या उमेदवारांवर होणार आहे. ज्यांची मुलखात २२ जानेवारी रोजी दुपारच्या सत्रात नियोजित होती. आयोगाच्या अधिकृत माहितीनुसार, २२ जानेवारी रोजी दुपारच्या सत्रा-तील सर्व मुलाखती रद्द करण्यात आल्या आहेत. याच दिवशी नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनासाठी फुल ड्रेस रिहर्सल आयोजित करण्यात येणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

### दुचाकीस्वार ठार

**माणगाव :** मुंबई-गोवा महामार्गावर गारळ गावाच्या हद्दीत दोन कार आणि एक दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सविस्तर वृत्त असे की, दि. १७ जानेवारी रोजी महामार्गावर सायंकाळच्या वेळेस गारळ फाट्यावर हॉटेल आनंद भुवनसमोर मारुती सुझुकी बलेनो क्र. एमएच ४६ डीए १२२९ व मारुती सुझुकी व्हॅगनार क्र. एमएच ०८ बीई ७५६१ तसेच होंडा शाईन क्र. एमएच ०६ बीआर ६८२६ मध्ये अपघात झाला. या अपघातात मोटार सायकलस्वार जागीच ठार झाला. अण्णा काळे असे त्याचे नाव आहे. या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पोलीस याबाबत पुढील तपास सुरू आहे.

# रायगडात स्वच्छतेचा जागर




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषदेच्यावतीने संपूर्ण जिल्ह्यात स्वच्छतेचा जागर करण्यात आला. शुक्रवारी (दि.१६) एकाच दिवशी जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी व आरोग्य केंद्रांमध्ये राबविण्यात आलेल्या सामूहिक स्वच्छता मोहिमेत तब्बल ७ हजार ९९८ किलो प्लास्टिक व सुका कचरा संकलित करण्यात आला. या अभियानात अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्वच्छता ही केवळ मोहीम न राहता आरोग्याची सवय बनावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या अभियानात जिल्ह्यातील २० हजार २८१ जण सहभागी झाले होते. घरासह परिसर स्वच्छ राहिल्यास रोगराईवर नियंत्रण मिळते, या जाणीवेतून ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, शाळा परिसर, आरोग्य केंद्रे व गावातील मोकळ्या जागांमधील कचरा गोळा करण्यात आला. संकलित कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली आहे.

या अभियानात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे तसेच स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी माणगाव तालुक्यातील वरचीवाडी व तळाशेत येथे प्रत्यक्ष सहभाग घेऊन ग्रामस्थांचा उत्साह वाढविला.

**रोगराईवर नियंत्रण**

घरातील परिसर स्वच्छ राहिल्यास रोगराईवर नियंत्रण मिळते. या जाणिवेतून ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, शाळा परिसर, आरोग्य केंद्रांची साफसफाई करण्यात आली.

श्रीवर्धन तालुक्यातील रानवली ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून स्वच्छतेचे महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले.

> “स्वच्छता ही एकदिवसीय उपक्रम न राहता लोकांची सवय व्हावी, हा या अभियानाचा उद्देश आहे. ग्रामस्थ, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून समाधान वाटते. रायगड जिल्हा स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श ठरेल, यासाठी सातत्याने असे उपक्रम राबवले जातील. - नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद”

**एक नजर आकडेवारीवर**

एकूण सहभागी : 20,281

एकूण कचरा संकलन : 7,998 किलो

2,473 शाळा : 2,012 किलो

809 ग्रामपंचायती : 3,269 किलो

336 आरोग्य व उपकेंद्रे : 716 किलो

3,161 अंगणवाड्या : 1,580 किलो

# शेकाप सोडून गेलेल्यांना फटका

■ महापालिका निवडणुकीत पराभव

■ मतदारांनी दाखविली जागा

**। पनवेल । प्रतिनिधी।**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीत पक्षांतर करणाऱ्या उमेदवारांना मतदारांनी चांगलाच धडा शिकविल्याचे चित्र दिसून आले आहे. विशेषतः शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) सोडून भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेल्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणात पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या शेकापला सोडून सत्ताधारी पक्षात प्रवेश केल्याने मतदार नाराज झाल्याचे निकालांतून स्पष्ट झाले आहे. मंजुळा कातकरी, अरुणा दाभणे आणि सारिका भगत या उमेदवारांना मतदारांनी स्पष्टपणे नाकारले. अरुणा दाभणे यांनी शेकाप सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता; मात्र हा निर्णय त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या अंगलट आला. या निकालांमुळे पक्षनिष्ठेला मतदार अजूनही महत्त्व देत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विकासकामे, स्थानिक प्रश्नांवरील भूमिका आणि सातत्यपूर्ण संपर्क यापेक्षा केवळ पक्षबदल करून निवडणूक जिंकता येत नाही, असा संदेश मतदारांनी दिल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये या निकालामुळे नवचैतन्य संचारले असून, भविष्यात पक्षसंघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न वाढविण्यात येणार असल्याचे पक्ष नेत्यांकडून सांगण्यात आले. पनवेलमधील या निकालांचा परिणाम येत्या काळातील स्थानिक राजकारणावर निश्चितच दिसून येणार आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी शेकाप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

# प्रशासकीय राजवटीत शेलू ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार?

**काम न करताच लाखोंची बिले, साहित्य खरेदीचा अद्याप पत्ता नाही**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेलू ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर सध्या प्रशासकांच्या माध्यमातून कारभार सुरू आहे. मात्र, हा प्रशासकीय काळ म्हणजेच भ्रष्टाचाराला मोकळे रान दिल्याचे गंभीर आरोप ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहेत. विकासकामे प्रत्यक्षात न करता केवळ कागदावरच कामे दाखवून लाखो रुपयांची बिले काढण्यात आल्याचा आरोप होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते अक्षय हिसाळगे, महेश खारीक आणि रवींद्र मसणे यांनी प्रशासकीय राजवटीत शेलू ग्रामपंचायतीत पैशांची खुलेआम लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप केला आहे. प्रशासक काळात साहित्य खरेदी दाखवण्यात आली असून, खरेदीला तीन महिने उलटूनही हे साहित्य ग्रामपंचायत कार्यालयात पोहोचलेले नाही, असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी अक्षय हिसाळगे यांच्यासह ग्रामस्थांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामविकास अधिकारी आर.जी. म्हात्रे यांची भेट घेतली. यावेळी सुरू असलेल्या विकासकामांबाबत माहिती विचारली असता, अनेक ठिकाणी काम न करताच बिले काढल्याचे स्पष्ट झाले. काही कामांसाठी त्रयस्थ व्यक्तींच्या नावावर खोटी बिले काढण्यात आल्याचा आरोप अक्षय हिसाळगे यांनी केला.

याशिवाय ग्रामपंचायत हद्दीतील तलावाजवळ ओपन जिम उभारल्याचे बिल काढण्यात आले असून, प्रत्यक्षात जिमच्या साहित्याचा ठावठिकाणा नसल्याचे रवींद्र मसणे यांनी सांगितले. कचरा संकलनासाठी पान २ वर

### मुंबई पोलिसांना मिळणार हक्काची घरे

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या शनिवारी (दि. १७) झालेल्या बैठकीत मुंबई पोलिसांच्या शासकीय निवासस्थानासाठी मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिपला मंजुरी देण्यात आली आहे. मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थाने उपलब्ध होणार आहेत. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. याद्वारे सुमारे पाच कोटी चौरस फूट क्षेत्राचे विकसन करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

# माती भरावाने नैसर्गिक नाला बुजवला

**॥ सांडपाणी विहिरीत झिरपले ॥ सावरोलीतील आदिवासींचे आरोग्य धोक्यात**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



सावरोली गावाजवळ एका खासगी जागेत बिनधास्तपणे माती भराव करून थेट नैसर्गिक नाला अडवल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या नाल्यातून वाहणारे सांडपाणी अडवल्याने ते तुंबून विहिरीत झिरपले असून, हेच दूषित पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने सावरोलीतील आदिवासी बांधवांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे.

सावरोली ग्रामपंचायत हद्दीत आदिवासी कुटुंबांनी स्थलांतर करून ‘नवीन पवई आदिवासीवाडी’ वसवली असून, येथे सध्या १६ ते १७ कुटुंबे वास्तव्यास आहेत. ग्रामपंचायतीने पाण्याची टाकी बसवली असली, तरी पाणी अपुरे असल्याने ग्रामस्थांना विहिरीच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

दरम्यान, नैसर्गिक नाल्यावर माती भराव केल्यामुळे सांडपाणी तुंबून राहिले असून, ते झिरपून थेट विहिरीत साठत आहे. परिणामी, आदिवासी वाडीत लहान मुलांसह अनेक नागरिक आजारी पडत असून, साथीचा धोका निर्माण झाला आहे. ग्रामस्थांमध्ये भीती व संतापाचे वातावरण आहे.

या प्रकाराची माहिती लोकप्रतिनिधींना तोंडी स्वरूपात देण्यात आल्याचे रामदास शंकर पवार, दत्ता पवार, चंद्रकांत पवार, संजय वाघमारे, पिंकी पवार, सीता वाघमारे यांच्यासह आदिवासी महिलांनी सांगितले. मात्र, अद्याप कोणतीही ठोस पान २ वर

**पोलादपूरमध्ये दुबार मतदार ठरणार निर्णायक | लोकशाहीला धोका, कारवाईकडे लक्ष**

# मुंबईची शाई पुसून गावाकडे धाव!

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यात तब्बल नऊ वर्षांनंतर होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत ‘शहरात मतदान, गावात उमेदवारी’ असा धक्कादायक प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. मुंबई महानगरपालिका व इतर शहरांमध्ये मतदान करून ‘शाई पुसून’ गावाकडे येणारे दुबार मतदार या निवडणुकीत निर्णायक ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या या निवडणुकीसाठी तहसील कार्यालय पोलादपूर येथे आतापर्यंत १६ मागणी अर्ज दाखल झाले असून, ४६ नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. आगामी काही दिवसांत मुंबई, नवी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड आदी शहरांमध्ये वास्तव्यास असलेले दुबार मतदार जिल्हा परिषद व पंचायत समितीचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार असल्याची माहिती पुढे येत आहे.



पोलादपूर तालुक्याला ‘चाकरमान्यांचा तालुका’ म्हणून ओळख आहे. मात्र, आता हेच चाकरमानी मतदार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदच नव्हे तर विधानसभा व लोकसभा निवडणुकांमध्येही ‘किंगमेकर’ ठरत आहेत. अनेक गावांमध्ये स्थानिक मतदारांपेक्षा परगावच्या दुबार मतदारांची संख्या अधिक असल्याने निवडणूक निकालाची दिशा तेच ठरवत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, तहसील कार्यालयाने ६९० दुबार मतदारांची नावे निश्चित केली आहेत. मात्र, मतदान ओळखपत्राला आधार लिंक नसल्याने दुबार, तिबार अथवा अनेक ठिकाणी नावे असलेले मतदार अद्यापही यंत्रणेच्या रडारबाहेर आहेत. शहरात आणि गावात वेगवेगळ्या तारखांना मतदान होत असल्याचा फायदा घेत हे मतदार दोन्ही ठिकाणी मतदान करत असल्याचा आरोप होत आहे.

या दुबार मतदारांना शहरातून गावाकडे आणण्यासाठी ने-आण, जेवण व रोख खर्च केला जात असून, मतामागे हजारो रुपयांचा व्यवहार सुरू असल्याची चर्चा उघडपणे होते आहे. परिणामी, आर्थिक ताकद नसलेले स्थानिक उमेदवार समाजकार्य व पक्ष संघटन करूनही पराभूत होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर दुबार मतदारांचा प्रश्न लोकशाही प्रक्रियेच्या मुळावर घाव घालणारा ठरत असून, राज्य निवडणूक आयोग यावर ठोस आणि कठोर कारवाई करणार का, असा सवाल पोलादपूर तालुक्यात उपस्थित केला जात आहे.




# रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्त आक्रमक

- आझाद मैदानात उपोषण सुरूच
- रिलायन्स अधिकाऱ्यांची टाळाटाळ

**। शिहू । प्रतिनिधी ।**

भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था चोळे ते नागोठणे या गावातील जमिनी या प्रकल्पासाठी संपादित केल्यानंतर तेथील वंचित भूमीपुत्रांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचे ठरले होते. त्यानुसार ९०० हून अधिक जणांना नोकरी मिळाली. मात्र, ३२४ जणांना अद्यापही नोकरी मिळालेली नाही. याविरोधात प्रकल्पबाधित भूमीपुत्र ७ ऑक्टोबरपासून आझाद मैदानावर आमरण उपोषण करत आहेत. १६ जानेवारी २०२६ ला या उपोषणाला तीन महिने १० दिवस झाले असून, भूमीपुत्र अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

या प्रकल्पबाधितांकडे आवश्यक प्रमाणपत्रे आहेत, त्यामुळे पात्र भूमीपुत्रांना रिलायन्सच्या आस्थापनात कायमस्वरूपी नोकरीत घ्यावी, अशी मागणी प्रकल्पग्रस्तांची आहे. यासंदर्भात २४ जून २०२५ या दिवशी मंत्रालयात झालेल्या बैठकीत मुख्य आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी दोन महिन्यांत यावर निर्णय घेण्याचे आदेश दिले असूनही प्रकल्पग्रस्तांना नोकरीत समाविष्ट करून घेण्यात रिलायन्सचे अधिकारी टाळाटाळ करत आहेत.

स्थानिकांच्या जमिनींवर प्रकल्प उभारल्यानंतर स्थानिकांना नोकरी हक्कापासून रिलायन्स प्रशासन वंचित ठेवत आहेत. रिलायन्स नागोठणे कंपनी प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्यावे, अशी मागणी भूमीपुत्रांची असून, तीन दशकांहून अधिक हा संघर्ष सुरु आहे. मुख्य आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी निर्देश दिले असतानादेखील कंपनी प्रशासन कोणतीच कृती करत नसल्याने आम्हला नोकरी देणे शक्य नसल्यास आमच्या जमिनी कंपनीने परत कराव्यात, जोपर्यंत आम्हाला नोकरीत समाविष्ट करून घेत नाहीत, तोपर्यंत आमचा हा लढा असाच चालू राहील, असे यावेळी प्रकल्पग्रस्तांनी सांगितले.



# शेकापने दिलेला शब्द पाळला

## शिवानी जंगम यांचा स्वीकृत नगरसेवकपदाचा राजीनामा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर नगरपंचायतीच्या निवडणूक लढविण्यासाठी माघार घेऊन पक्षाचे उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या सचिन कांबळे (भीम) याला स्वीकृत नगरसेवक बनवले आहे. शेकापक्षाचे नेते उपनगराध्यक्ष संतोष जंगम अणि माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम यांनी दिलेला शब्द पाळत बौद्ध समाजातील तरुणाला नगरसेवक बनविल्याने कौतुक होत आहे.

खालापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत शेकापक्षाने उमेदवार निवडून आल्यानंतर त्यांच्या जोडीला अभ्यासू नेतृत्व असावं म्हणून स्वीकृत नगरसेवकपदी माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम यांची निवड केली होती. शिवानी जंगम यांनी आपल्या स्वीकृत नगरसेवक पदाचा राजीनामा दिल्यानंतर स्वीकृत नगरसेवकपदी कोणाची निवड होणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले असतानाच उपनगराध्यक्ष संतोष जंगम आणि माजी नगरसेविका शिवानी जंगम यांनी शेकापक्षासाठी सदैव मेहनत घेणारा तसेच वॉर्ड क्रमांक १४ बौद्धवाडा, सोमेश्वर वसाहत याठिकाणी मोठे प्राबल्य असतानाही माघार घेऊन पक्षाने दिलेले उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रचंड मेहनत घेणारे सचिन कांबळे (भीमा) यांना स्वीकृत नगरसेवक बनवले आहे.



आपल्या पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्त्याला मोठे करण्याची भावना उपनगराध्यक्ष संतोष जंगम आणि माजी नगरसेविका शिवानी जंगम यांनी नेहमीच ठेवली असून, सचिन कांबळे (भीम) यांना स्वीकृत नगरसेवकपदी निवड होताच शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस किशोर पाटील, नगराध्यक्षा रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम आणि सर्व शेकापक्षाचे नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होत्या.

## सैनिकांचा कृतज्ञता सन्मान सोहळा

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांच्या माता, पत्नी आणि निवृत्त सैनिक यांचा कृतज्ञता सन्मान सोहळा आणि त्यांना संगीतमय मानवंदना असा कार्यक्रम २० जानेवारी रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे दुपारी साडेचार वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमात भारत पाकिस्तान युद्ध, कारगिल युद्ध, ऑपरेशन सिंदूर, विविध युद्ध प्रसंग यावर आधारित एवी क्लिप दाखवण्यात येणार आहेत.

यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. गिरीश गुणे, प्रेसिडेंट अनिल ठकेकर, प्रोजेक्ट चेअरमन प्रकाश रानडे, सेक्रेटरी अतिश थोरात उपस्थित राहणार असून, त्या ठिकाणी विनामूल्य प्रवेश आहे. अहोरात्र डोळ्यात तेल घालून आपल्या भारत मातेचे रक्षण करणारे सैनिक, जाज्वल्य देशभक्तीची भावना नागरिकांमध्ये जागवणाऱ्या आणि वीर पत्नी, वीर माता व निवृत्त सैनिक यांच्या प्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या कार्यक्रमाला देशभक्त पनवेलकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्टेजवर फीत घातली; पण पक्षप्रवेश नाही!

- रचना गोपाळेंचा शिवसेनेच्या कार्यक्रमावर थेट खुलासा
- काँग्रेसमध्येच ठाम असल्याची ठोस भूमिका केली स्पष्ट

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

भोईघर ग्रुप ग्रामपंचायतमधील बारशिव गावातून निवडून आलेल्या सदस्य रचना अमित गोपाळे यांनी शिवसेनेच्या कार्यक्रमात आपला पक्षप्रवेश झाल्याचा पसरवला जात असलेला गैरसमज जोरदार शब्दांत फेटाळून लावला आहे. शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी झालेल्या शिवसेनेच्या कार्यक्रमाला केवळ मैत्रिणींसोबत उपस्थित असताना, कोणतीही पूर्वकल्पना न देता स्टेजवर बोलावून गळ्यात पक्षाची फीत घालण्यात आली. मात्र, हा पक्षप्रवेश नसून, त्यामागे माझा कोणताही निर्णय किंवा इरादा नव्हता, असे स्पष्टीकरण रचना गोपाळे यांनी दिले आहे.

राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आणणाऱ्या या घटनेवर त्यांनी ठाम भूमिका घेत सांगितले की, मी २०२३ मध्ये ग्रुप ग्रामपंचायत भोईघरच्या निवडणुकीत सुभाष महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस (आय) पक्षाच्या वतीने निवडून आले असून, आजही काँग्रेस (आय) पक्षातच आहे आणि यापुढेही राहणार आहे.



सहमती नसताना फीत घालून पक्षप्रवेशाचा आभास निर्माण करणे हे चुकीचे असून, जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक असल्यानेच हे स्पष्टीकरण दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राजकारणात 'दिसतं तसं नसतं' हे पुन्हा एकदा अधोरेखित करणारी ही घटना भोईघर परिसरात चांगलीच चर्चेचा विषय ठरत आहे.

## पत्रकार मंगेश तावडे यांना मातृशोक

**। पालघर । प्रतिनिधी ।**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील आवळेगाव येथील रहिवासी सुलोचना वामन तावडे (८७) यांचे गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी सकाळी पालघर येथील खासगी रुग्णालयात निधन झाले.



गेल्या साडेतीन वर्षांपासून त्या पालघर येथे वास्तव्यास होत्या. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयामार्फत पती वामन तावडे यांच्या निधनानंतर मिळणारे कलाकार मानधन त्यांना प्राप्त होत होते. त्यांच्या पश्चात मुलगा प्रदीप, पालघर जिल्ह्यातील पत्रकार मंगेश तावडे, सुना, नातवंडे व पणतवंडे असा परिवार आहे.

पालघर येथेच शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेसमयी राजकीय, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्हावे येथे गावस्वच्छतेचा संकल्प



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

न्हावे ग्रामपंचायतीच्या वतीने न्हावे ता. रोहा येथे मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियान अंतर्गत (दि.१६) जानेवारी रोजी महाश्रमदान अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी स्वच्छ, सुंदर आणि समृद्ध न्हावे घडविण्याचा निर्धार यावेळी दिसून आला.

महाश्रमदान अभियानांतर्गत गावातील शाळा परिसर, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी, मंदिर तसेच सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करण्यात आली. रस्त्यांवरील कचरा, प्लास्टिक, झुडपे काढून स्वच्छता करण्यात आली. यामुळे गाव परिसर स्वच्छ दिसू लागला. या महाश्रमदानात ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक, शाळेचे शिक्षक व विद्यार्थी, महिला बचतगट, शाळा कमिटी अध्यक्ष व सदस्य, युवक मंडळ तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छतेचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छ गावामुळे होणारे आरोग्यविषयक फायदे याबाबत जनजागृती करण्यात आली. स्वच्छता हीच सेवा या भावनेतून अशा उपक्रमांचा सातत्याने अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

मुख्यमंत्री समृद्धग्राम अभियानाच्या माध्यमातून न्हावे गाव विकासाच्या दिशेने वाटचाल करत असून, या महाश्रमदानामुळे गावाच्या स्वच्छतेबरोबरच ग्रामस्थांमध्ये सामाजिक बांधिलकी व विकासाची जाणीव अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसून आले.

# कुडपण खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह

## शेलारमामा यांचा ३५५ वा पुण्यतिथी सोहळा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील ब्रिटिशकालीन हिलस्टेशन अशी थंड हवेचे ठिकाण म्हणून नोंद असलेल्या पर्यटनासाठी सर्वश्रुत असलेल्या पोलादपूर तालुक्यातील कुडपण खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह आणि शेलारमामा यांच्या ३५५ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे संयुक्त आयोजन दि. २७ ते ३० जानेवारी या कालावधीत करण्यात आले आहे.

तपोनिधी संत गणेशनाथ महाराज यांच्या प्रेरणेने व सद्गुरु अरविंदनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कालावधीत रोज काकडा आरती, पारायण, हरिपाठ, किर्तन, जागर तसेच महिलांसाठी हळदी कुंकू तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आध्यात्मिक उपक्रम ग्रामस्थांच्या वतीने राबविण्यात येणार आहेत. याचबरोबर स्वराज्याचे मामा सरनौबत कोंडाजी रायाजी शेलार तथा शेलारमामा यांची ३५५ वी पुण्यतिथी समाधी सोहळा जन्मगाव कुडपण खुर्द येथे साजरी होणार आहे. समाधी सोहळा पूजन, अभिषेक सद्गुरु अरविंदनाथ गिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

याप्रसंगी फलोत्पादन, रोजगार हमी योजना, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, मुंबै बँक अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर, महाडच्या माजी नगराअध्यक्षा स्नेहल जगताप-कामत, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, कृष्णा कदम, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या वंशजांच्या सुनबाई डॉ. शीतल मालुसरे, अनेक इतिहासतज्ज्ञ, तसेच विविध राजकीय मंडळी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, भाविक भक्त, शिवभक्त ह्या अखंड हरिनाम सप्ताह काळात भेट देणार असल्याचे कुडपण खुर्द ग्रामस्थांनी सांगितले.

# युवकांसाठी तीन दिवसीय पर्यावरण छावणी

## वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये आयोजन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या जैवविविधता संवर्धन संशोधन केंद्रातर्फे रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यामधील वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये युवकांसाठी पर्यावरण छावणी आयोजित करण्यात आली आहे. दि. ३ ते ५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय निवासी युवक पर्यावरण छावणीचा उद्देश पर्यावरणीय संकटांच्या आव्हानांना सामोरे जाण्यास युवकांना सक्षम बनवणे हा असून, जैवविविधता अभ्यासक पार्थ बापट हे या शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक आहेत.

पर्यावरणीय प्रश्नांचे ऐतिहासिक, सामाजिक-आर्थिक व वैज्ञानिक आकलन, स्थानिक पर्यावरणीय समस्यांची ओळख व विश्लेषण, पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास, पर्यावरण व्यवस्थापन क्षेत्रातील करिअर संधी अशा विविध विषयांवर या शिबिरात मार्गदर्शन मिळणार आहे. निसर्गभ्रमंती, निसर्गखेळ, गावभेटी, चित्रपट, चर्चा, प्रकल्प अशा विविध स्वरूपात वरील विषय या शिबिरात शिकता येणार आहेत. जैवविविधतेवर विशेष भर असलेल्या पर्यावरण संकल्पना, मानव-पर्यावरण यांचे ऐतिहासिक नाते (इकोसिस्टम सर्व्हिसेस), कृषी व औद्योगिक समाजांचा पर्यावरणावर परिणाम, बदलत्या पर्यावरणाचा मानवी जीवनावर प्रभाव, पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम व उपाय या विषयांवर तज्ज्ञ या शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत.

# म्हसळा तालुक्यात 'मिनी विधानसभा' रणसंग्राम

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तब्बल चार वर्षांहून अधिक कालावधीनंतर होणार असल्याने म्हसळा तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणुकांची चाहूल लागताच सर्वच पक्षांतील इच्छुक उमेदवार मोर्चेबांधणीला लागले असून, मतदारांशी संपर्क, बैठकांचे सत्र आणि शक्तिप्रदर्शनाला वेग आला आहे.

म्हसळा तालुक्यात पांगलोली व पाभरे हे दोन जिल्हा परिषद गट, तर साळवींडे, खरसई, पाभरे व पांगलोली हे चार पंचायत समिती गण आहेत. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व जागांवर विजय मिळवत वर्चस्व राखले होते. मात्र, यंदा महायुती अथवा महाविकास आघाडी एकत्र येण्याची शक्यता धूसर झाल्याने बहुतेक पक्ष स्वबळावर लढण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

या निवडणुकीत इच्छुकांची संख्या अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एका जागेसाठी पाच ते दहा इच्छुक रिंगणात असल्याने खा. सुनील तटकरे यांच्यासमोर उमेदवारी ठरवताना मोठे आव्हान उभे राहिले आहे. उमेदवारी न मिळाल्यास नाराजी आणि बंडखोरीची शक्यता नाकारता येत नाही.

**वाढता खर्च इच्छुकांसाठी डोकेदुखी**

निवडणुकीचा वाढता खर्च ही इच्छुकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. प्रचार, मतदार संपर्क, बैठकांचे आयोजन, वाहनव्यवस्था, बॅनर आणि जाहिरातींसाठी मोठ्या आर्थिक तरतुदी कराव्या लागत असल्याने अनेक इच्छुक आर्थिक गणिते जुळवण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत आर्थिक ताकदही उमेदवारी आणि यशासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

**सर्व पक्ष मैदानात; राजकीय संघर्ष तीव्र**

सध्याच्या राजकीय परिस्थितीत म्हसळा तालुक्यावर खासदार सुनील तटकरे यांचे वर्चस्व दिसून येत असले, तरी शिवसेना-राष्ट्रवादी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गट जोमाने मैदानात उतरणार असल्याची चर्चा आहे. एकूणच, अनेक वर्षांनंतर होणाऱ्या या 'मिनी विधानसभा' निवडणुकीत कोण बाजी मारणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार असून, आगामी काही दिवसांत राजकीय हालचाली आणखी वेग घेणार हे निश्चित आहे.

पान १ वरून

## माती भरावाने नैसर्गिक नाला बुजवला

कारवाई झालेली नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, संबंधित माती भराव करताना शासनाची किती रॉयल्टी भरली आहे, याचीही चौकशी करावी, तसेच आदिवासी बांधवांना वेठीस धरून त्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आदिवासी ग्रामस्थांनी केली आहे. नैसर्गिक जलस्रोतांवर अतिक्रमण करून आदिवासींच्या जीवाशी खेळ सुरू असताना प्रशासन डोळेझाक करणार का, की तातडीने कारवाई करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रशासकीय राजवटीत शेलू ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार?

खरेदी करण्यात आलेली घंटागाडी ग्रामपंचायत आवारात सडून नादुरुस्त अवस्थेत उभी असून, आजपर्यंत तिचा एकदाही वापर करण्यात आलेला नाही, असे महेश खारीक यांनी स्पष्ट केले.

परिसरात सौरदिवे आणि एलईडी लाईट खरेदीच्या नावाखाली लाखो रुपयांचा खर्च दाखवण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात हायमास्ट व दिव्यांचा पत्ताच नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. गटारे साफसफाईसाठी खर्च दाखवला असतानाही आजही गटारे तुंबलेलीच असल्याचे वास्तव समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ग्रामपंचायत हद्दीतील विविध कामांची बिले एकाच ठेकेदाराच्या नावावर काढण्यात आली असून, संबंधित ठेकेदारालाही याची माहिती नसेल, असा संशय व्यक्त केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अक्षय हिसाळगे आणि ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांना लेखी तक्रार देऊन कारवाईची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महेश खारीक, अक्षय हिसाळगे, रवींद्र मारुती मसणे, कल्पेश मसणे, तुषार मसणे, विक्रांत कुंभार, गणेश हिसाळगे, मनोज तरे, प्रसाद मसणे, गणेश तरे, आसिम मणियार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, प्रशासकीय काळात सुरू असलेल्या शेलू ग्रामपंचायतीच्या अनागोंदी व संशयास्पद कारभाराविरोधात ग्रामस्थ आक्रमक झाले असून, या प्रकरणाची चौकशी होणार का? आणि आरोप खरे ठरल्यास दोषींवर कठोर कारवाई होणार का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## हॉकी स्टिकने मारहाण प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल

त्यांच्यात बाचाबाची झाली. त्यानंतर सर्वजण घरी जाण्यासाठी निघाले. रात्री बाराच्या सुमारास ते चिपळे ब्रिजवळ आले. यावेळी त्यांच्यासमोर दोन वाहने येऊन थांबली आणि सुधीर ठोंबरे, जीवन कांबळे, सुभाष घाडगे व विराट पवार यांनी माधव याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. जीवन याने माधव याला हॉकी स्टिकने मारहाण केली, तर सुधीर ठोंबरे याने बेसबॉल स्टिकने डोक्यात पाठीमागे मारले. यावेळी सुधीर याने तुषार जाधव याला शिवीगाळ करून उद्या सकाळी बघून घेतो अशी धमकी दिली आणि ते निघून गेले. या मारहाणीत माधव येरोले हा जखमी झाला. त्याला उपजिल्हा रुग्णालय येथे नेण्यात आले. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

## लाचखोर तलाठी एसीबीच्या जाळ्यात

कार्यालयाकडून शेताचा पंचनामा करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. १२ जानेवारी रोजी तक्रारदार तलाठी कार्यालयात गेले असता, आरोपी लोकसेविका वानखेडे यांनी तुमच्या बाजूने पंचनामा करून देण्यासाठी १० हजार रुपये द्यावे लागतील, अशी थेट लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात आली असता, तडजोडीअंती लाचेची रक्कम ७ हजार रुपये निश्चित करण्यात आली. त्याच दिवशी छत्रपती संभाजीराजे चौक, नाव्हरातळेगाव रोड येथे सापळा रचण्यात आला. पंचासमक्ष तक्रारदाराकडून ७ हजार रुपये स्वीकारताना अधिकारी महिलेला रंगेहाथ पकडण्यात आले. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## 'नोटा'ला ४३ हजार २११ मते

आवाज मानला जातो. पनवेलसारख्या वेगाने विकसित होत असलेल्या शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात मतदारांनी कोणत्याही उमेदवाराला न पसंत करता 'नोटा'ची निवड करणे, ही बाब राजकीय पक्षांसाठी आत्मपरीक्षणाची घंटा ठरली आहे. निवडणूक लढवणाऱ्या २४५ उमेदवारांपैकी एकाही उमेदवारावर विश्वास न टाकता ४३ हजारांहून अधिक नागरिकांनी 'नोटा' दाबणे, हे आकडेवारीत लहान वाटले तरी त्यामागचा संदेश अतिशय गंभीर आहे.

## बेलीचा नवी पूल होणार तरी कधी?

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यात अलिबाग-नागाव मार्गावर बेली गावानजीक असणारा छोटा पूल कमकुवत झाल्यामुळे या पुलावरील अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे. आज या घटनेला दोन महिन्यांहून अधिकचा काळ लोटला आहे. परंतु, अद्यापपर्यंत या पुलाच्या दुरुस्तीची किंवा नवीन पूल उभारणीची हालचाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिसून येत नाही. त्यामुळे हा पूल होणार तरी कधी? असा सवाल स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

बेलीचा पूल कमकुवत झाल्यामुळे या पुलावरील अवजड वाहतूक बंद करण्यात आली. परंतु, या पुलाच्या दुरुस्तीचे कोणतेही पाऊल अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उचलण्यात आलेले नाही. परिणामी, या मार्गावरुन एसटी बसची वाहतूक बंद करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांसह शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे हाल सुरू आहेत. विद्यार्थ्यांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागत असून, नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे. तरी, संबंधित विभागाने आतातरी पूल दुरुस्ती अथवा नवीन पूल उभारणीसाठी हालचाल करावी, अन्यथा पाऊस पडल्यावर पुलाची दुरुस्ती करणे अशक्य होऊन बसेल.

## शिरवलीत वंधत्वविषयक मार्गदर्शन शिबीर

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील शिरवली येथील मोकल हॉस्पिटलच्या वतीने व यशोदा फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटरच्या संयुक्त विद्यमाने वंधत्व निर्मूलनविषयक मोफत तपासणी, सल्ला व मार्गदर्शन शिबीर शनिवारी (दि. १८) सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत यशस्वीपणे पार पडले. या शिबिराचे आयोजन मोकल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोरेश्वर मोकल यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन मोकल हॉस्पिटलच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिबीर प्रमुख डॉ. श्रेया गुप्ता, शिरवलीचे सरपंच डॉ. मोरेश्वर मोकल, यशोदा फर्टिलिटी सेंटरचे मार्केटिंग मॅनेजर श्री. गुप्ता तसेच वाघ्रणचे पत्रकार दीपक पाटील उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत श्रीकांत म्हात्रे यांनी केले.



पहिल्या १०० जोडप्यांसाठी मर्यादित असलेल्या या शिबीराला महिला व पुरुषांचा चांगला प्रतिसाद मिळाला. उपस्थित जोडप्यांना वंधत्वविषयक शास्त्रीय माहिती, उपचार पद्धती व उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष तपासणीदरम्यान शिबीर प्रमुख डॉ. श्रेया गुप्ता यांनी प्रत्येक जोडप्याची स्वतंत्रपणे बंदिस्त पद्धतीने तपासणी केली. महिलांची मोफत तपासणी करताना आवश्यकतेनुसार सोनोग्राफी करण्यात आली, तर पुरुषांची वीर्य तपासणी करून समस्येचे निदान करण्यात आले. उपस्थितांच्या समाधानकारक प्रतिसादातच शिबीराची सांगता करण्यात आली व शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले.

## रस्त्यावर पसरले धुळीचे साम्राज्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल परिसरात सध्या रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला सिमेंट काँक्रिटची गटारे बांधण्यात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जेसीबीच्या सहाय्याने गटारे खोदण्यात आली आहेत. त्यामुळे गटारांतील माती रस्त्याच्या दुतर्फा पडून आहे. त्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. अनेकदा या मार्गावरुन प्रवास करणारे दुचाकीस्वारांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या साईडपट्टीवर असलेल्या मातीचा अंदाज येत नसल्याने दुचाकी स्लीप होण्याच्या घटना या परिसरात वारंवार घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित विभागाने रस्त्याच्या बाजूला मातीचे असणारे ढीग बाजूला सारुन साफसफाई करावी, अशी मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे.

## निवडक



### नागोठण्यात महिला चोरट्यांची दहशत

**नागोठणे :** काही दिवसांपूर्वी दुपारच्या सुमारास नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठेतील मीरा ज्वेलर्स या दुकानात चोरीची घटना घडली. यावेळी नागोठण्याजवळील जांभुळटेप येथील रिया भोईर या आपले दीड तोळ्याचे सुमारे २ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र दुरुस्त करण्यासाठी आल्या होत्या. मंगळसूत्र दुरुस्त करण्यास वेळ लागणार असल्याने ज्वेलर्स कारागिराने थोड्या वेळाने येण्याचे रिया त्यांना सांगितले. त्यामुळे त्यांनी मंगळसूत्र आपल्या पर्समध्ये ठेवले आणि त्यांनी दुकानातून बाहेर पडल्या. यादरम्यान त्या ठिकाणी आलेल्या चार महिलांनी रिया भोईर यांच्या पर्समधील मंगळसूत्र शिताफीने लंपास केले. त्यानंतर दुसऱ्या घटनेत नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्त्यालगत एका छोट्या टपरीवर व्यवसाय करणाऱ्या अनुसया शिंदे यांच्याकडे शुक्रवारी (दि.१६) सायंकाळच्या सुमारास तीन स्कार्पधारी महिला आल्या. यावेळी त्यातील दोन महिला टपरीसमोर तर तिसरी महिला अनुसया शिंदे यांच्या मागे उभी राहिली आणि त्यांना बोलण्यात गुंग करून ठेवले. त्याचवेळी इतर दोन महिलांनी संधी साधून टपरीच्या गल्ल्यातील ३ हजार रुपये हातचलाखीने लंपास करून पोबारा केला. या दोन्ही चोरीच्या घटनांमुळे नागरिकांत घबराट पसरली असून या घटनांची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



### विकासकामांसाठी लोकप्रतिनिधींचा आधार

**माथेरान :** प्रभाग क्र. ७ मधील रहिवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी विजेचा पोल बसविण्यात आले आहेत; परंतु, अद्यापही विजेचा पत्ताच नाही. रेल्वे स्टेशनच्या भागातून वाहून येणारे पावसाळी पाणी हे सुद्धा गटारे कचऱ्यामुळे पूर्णपणे बंद झालेली आहेत. त्यामुळे पावसाळी पाणी रस्त्यावरून वाहत असते. सुलभ शौचालयाची देखील दयनीय अवस्था झाली असून त्याठिकाणी काहीवेळा पाण्याची कमतरता जाणवते. हे सुलभ शौचालय रेल्वे स्टेशनजवळ असल्यामुळे याचा उपयोग पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर होत असतो. परंतु, ही शौचालये अस्वच्छ असल्यामुळे तसेच पाण्याअभावी पर्यटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याचप्रमाणे या शौचालयाच्या बाजूला रेल्वेच्या जुन्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. त्याठिकाणी कुणीही वास्तव्यास नसल्याने नागरिकांनी या भागाला एकप्रकारे डंपिंग म्हणून उपयोग सुरू केला आहे. हा कचरा आणि माती पावसाळ्यात रस्त्यावर येते. अनेकदा नगरपरिषदेचे कर्मचारी किंवा घनकचरा व्यवस्थापन कामगार कोणत्याही भागातील काचेच्या बाटल्या गोळा करत नाहीत. पेव्हर ब्लॉकचे रस्ते सुद्धा जुने झाले असून सततच्या रहदारीमुळे रस्त्यांना जागोजागी खड्डे पडलेले आहेत. मोठ्या गटारात हॉटेलचे सांडपाणी वाहून येत असते. या सर्व अत्यावश्यक कामांची शुक्रवारी (दि.१६) नगरसेवक संतोष शेलार आणि नगरसेविका अनिता रांजाणे व स्वच्छता विभागाचे चंद्रकांत शेटे यांनी पाहणी केली.



### अंनिसतर्फे सक्षम महिलांचा सन्मान

अलिबाग : तालुक्यातील खानाव येथील रा.जि.प. प्राथमिक शाळेत गुरूवारी (दि.८) एकल महिला पालकांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. सुभाष पानस्कर यांनी, राजमाता जिजाबाई आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई यांच्या कार्याची महती सांगितली. पती निधनानंतर खचून न जाता, आपल्या कुटुंबाला आधार देऊन ज्या महिलांनी आपल्या मुलांना शिक्षण देऊन जिद्दीने संसार चालवला, अशा महिलांच्या कार्याची दखल अंनिसची अलिबाग शाखा घेते आणि त्यांचा प्रतिनिधिक सन्मान करते. अशा स्त्रियांना आणि शाळेतील महिला शिक्षिकांचा मान्यवरांच्या हस्ते, भेटवस्तू आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक रवींद्र थळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, १० एकल महिला पालक, खानाव ग्रामसेविका पेढवी, शालेय महिलसमिती सदस्या पूजा वैशंपायन आणि अंनिस अलिबागचे दहा कार्यकर्ते उपस्थित होते.

# समुद्रकिनारी रंगणार फेस्टिवल

## || अलिबाग लायन्स क्लबचा स्तुत्य उपक्रम || खाद्यपदार्थांसह मनोरंजनाची मिळणार मेजवानी

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

लायन्स क्लबच्यावतीने दरवर्षी अलिबाग लायन्स फेस्टीवलचे आयोजन केले जाते. याहीवर्षीदेखील हा स्तुत्य उपक्रम अलिबागच्या समुद्रकिनारी दि.२३ ते २७ जानेवारी या कालावधीत भरविण्यात येणार आहे. या महोत्सवात खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या वस्तूंचे प्रदर्शन व खरेदी तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. यावेळी १७५ हून अधिक अधिक स्टॉल्स असणार आहेत. या फेस्टीवलचा शुभारंभ शुक्रवारी (दि.२३) सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती अलिबाग लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रदिप नाईक यांनी दिली.




लायन्स क्लब ऑफ अलिबाग हे अलिबाग आणि परिसरामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषय उपक्रम राबवते. क्लबने आजवर यशस्वी ५१ वर्षे पूर्ण करून ५२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. लायन्स क्लबच्या इतर अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांपैकी 'लायन्स अलिबाग फेस्टिवल' हा अलिबागकरांसाठी बहुप्रतिक्षित आणि आकर्षणाचा विषय आहे. तसेच, अलिबागसह राज्याच्या सीमा ओलांडून उद्योजकांना उत्तम बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडणारा हा व्यापारी उत्सव आहे. या महोत्सवाला भेट देणाऱ्या ग्राहकांना उत्कृष्ट आणि दर्जेदार वस्तू एकाच छताखाली मिळते. अलिबागकरांच्या प्रचंड प्रतिसादामुळे यावर्षी १९ वा लायन्स फेस्टिवल साजरा करणे शक्य होत आहे, असे महोत्सव समितीचे अध्यक्ष भगवान मालपाणी यांनी सांगितले.

प्रतिवर्षीप्रमाणे हा महोत्सव दि.२३ते२७जानेवारीयाकालावधीत अलिबागच्या समुद्रकिनारी आयोजित करण्यात आला आहे. स्टॉल्सचे विविध प्रकार, हँगर पद्धतीचे विस्तीर्ण दालन, हसायमा पद्धतीचे अत्याधुनिक स्टॉल्स, जागतिक बाजारपेठेतील नामांकित बँड्स असलेल्या मकंड्युमर शॉपी या संस्थेबरोबरील सहकार्याने या महोत्सवामध्ये १७५ हून अधिक स्टॉल्स ग्राहकांच्या सेवेत असणार आहेत. तसेच, चटकदार व्हेज-नॉनव्हेज तसेच खाद्यपदार्थांचे ५० हून अधिक स्टॉल्स खवय्यांसाठी पर्वणी ठरणार आहेत. उत्तम दर्जेदार आणि नवेपणा घेऊन आलेल्या वस्तूंची उपलब्धता हे महोत्सवाचे वैशिष्ट्य व मान्यताप्राप्त सोने-चांदी, हिरे जडजवाहिर, नामांकित ज्वेलर्स, मनाविण्यफ यांचे पैठणी साड्यांचे भव्य प्रदर्शन, नामांकित चारचाकी-दुचाकी वाहनांचे प्रदर्शन आणि विक्री हे सुद्धा या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

या सोहळ्याचे उद्घाटन अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी लायन्सचे इंटरनॅशनल डायरेक्टर ला. पंकज मेहता, जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे, जिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी, अलिबाग नगरपरिषद गटनेते प्रशांत नाईक, जिल्हा प्रथम प्रांतपाल प्रवीण सरनाईक, द्वितीय प्रांतपाल विजय गणात्रा, रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे, माजी प्रांतपाल अनिल जाधव, आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, गेल उसरचे कार्यकारी संचालक अनुप गुप्ता व झोनचे अरपर्सन विकास पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. या संपूर्ण दिमाखदार सोहळ्याला शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, खा. सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, ॲड. प्रवीण ठाकूर, पीएनपी कार्यवाह चित्रलेखा पाटील, जेएसएम अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, आरडीसीसी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्यासह अलिबाग नगरपरिषद मुख्याधिकारी आणि सर्व अधिकारी असे अनेक मान्यवर महोत्सवादरम्यान भेट देणार आहेत.

या महोत्सवात शुक्रवारी (दि.२३) सायंकाळी ६:३० वाजता कराओके स्पर्धा अंतिम फेरी, शनिवारी (दि.२४) दुपारी ३:३० वाजता ममी सुगरण पाककला स्पर्धा, सायंकाळी ६ वाजता ग्रुपडान्स स्पर्धा, रविवारी(दि.२५) दुपारी ३:३० वाजता खेळ पैठणीचा, सायंकाळी ६ वाजता शरीरसौष्ठव स्पर्धा, सोमवारी(दि.२६) सायंकाळी ५ वाजता पेट अँड ब्रीड शो, रात्री ८ वाजता स्टैंडअप कॉमेडी, तर मंगळवारी (दि.२७) सायंकाळी ५:३० वाजता सांगता समारंभ होणार आहे. तसेच, सायंकाळी ७ वाजता इंडिएसा बँड असे अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम होणार आहेत. यादरम्यान, लायन्स हेल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून नेत्रचिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्रदान अवयव दान, देहदान यांचा प्रचार आणि प्रसाराचे कामही होणार आहे.

### फेस्टिवलसाठी झटणारा लायन्स परिवार

यावर्षीच्या महोत्सव समितीचे अध्यक्ष ला. भगवान मालपणी असून परेश भतेजा, संजय पाटील, नयन कवळे, प्रदीप नाईक, अविनाश राऊळ, प्रियदर्शनी पाटील, महेश कवळे, अमोघ किंजवडेकर, संतोष पाटील, महेंद्र पाटील, रणजीत जैन, शशिकांत सोनी, गिरीश म्हात्रे, रमेश धनावडे, नितीन शेडगे, रोहन पाटील, ॲड. गौरी म्हात्रे, अंकिता म्हात्रे, अभिजीत आमले, अभिजित पाटील, संजय मोरणकर असे अनेक पदाधिकारी, संपूर्ण लायन्स आणि डायमंड सदस्य महोत्सव यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत. या सर्वांच्या मेहनतीमुळे हा महोत्सव यशस्वी होईल, अशी खात्री आयोजकांनी दिली.

### बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

लायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून २५ हजार स्क्वेअर फुट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे बांधकाम अलिबागमधील चोरोंडे येथे सुरू आहे. यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असून, रायगड जिल्हा सहकारी बँक, आदर्श नागरी सहकारी पतपेढी, सीएफटीआय, सेंट्रल बँक अशा अनेक संस्थांचे सहकार्य मिळत आहे. अलिबागमधील ग्राहक आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दाखवून हा अलिबाग फेस्टिवल यशस्वी करावा, असे आवाहन अलिबाग लायन्स क्लब तर्फे करण्यात आले आहे.

# 'आचारसंहिता भंग केल्यास कारवाई'

**| माणगाव | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक कार्यक्रमाची घोषणा झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, कायदेशीर चौकटीत व सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांनी जमावबंदी आदेश लागू केले आहेत. या पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस स्टेशनकडून नागरिक, मतदार व उमेदवारांसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत.



माणगावचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्यावतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, निवडणूक काळात सर्व संबंधितांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर, भडकावू अथवा समाजात तणाव निर्माण करणारे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांच्याकडून देण्यात आला आहे. विशेषतः सोशल मीडियाच्या वापराबाबत पोलीस प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडली आहे. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब इत्यादी माध्यमांवर जात, धर्म, वंश, पंथ किंवा वर्गद्वेष निर्माण होईल अशी पोस्ट, संदेश, व्हिडिओ, रील किंवा स्टेटस टाकण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच, मतदान प्रक्रियेचे जात-धर्माधारित ध्रुवीकरण करणारी कोणतीही सामग्री प्रसारित करू नये. चुकीची माहिती, अफवा वा दिशाभूल करणारी पोस्ट टाकणाऱ्यांवर आयटी कायदा, भारतीय दंड संहिता व निवडणूक कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणूक ही लोकशाहीचा उत्सव असून ती शांततेत पार पडणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या मिरवणुका, निदर्शने, आंदोलने, उपोषणे करण्यास मनाई करण्यात आली आहे. नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यास प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस विभागाने केले आहे.



● माघी गणेश जयंतीनिमित्त पनवेलच्या भिंगारी परिसरात विविध श्री गणेश कारखान्यांत गणेशमूर्ती साकार होत आहेत. पनवेल शहरात माघी गणेश जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. दीड दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी जोरात तयारी सुरू आहे. मूर्तिकार आपल्या कौशल्याला आकार देत सुंदर आणि देखण्या मूर्ती घडवत आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

### वडवली येथे सभागृहाचे लोकार्पण

**| खारेपाट | प्रतिनिधी |**

वडवली-श्रीवर्धन येथे ३१वा भव्य महोत्सव गुरुवारी (दि.१५) मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दरम्यान, गेली अनेक वर्षे या ठिकाणी सभागृह व्हावे, असे येथील ग्रामस्थांचे स्वप्न होते. त्या अनुषंगाने काँग्रेसचे राजाभाऊ ठाकूर यांनी स्वखर्चातून याठिकाणी सभागृहाचे लोकार्पण केले. त्याबद्दल उपस्थित नागरिकांकडून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राजाभाऊ ठाकूर म्हणाले की, माझ्याकडे कुठली सत्ता नाही. मी कुठलाही मंत्री नाही. मात्र, माजी आमदार स्वर्गीय मधुकर ठाकूर यांची प्रेरणा व विचार घेऊन समाजाकरीता जे करता येईल ते नक्कीच करेन, असे सांगितले.

# खालापूरमध्ये लाखोंचा गुटखा हस्तगत

**| रसायनी | प्रतिनिधी |**

खालापूरमध्ये गुटखा व तंबाखूची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या गुटखा माफियांवर खालापूर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ६३ लाख ३४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. यावेळी ट्रकसह एकूण १ कोटी ३ लाख ३४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे महामार्गावर कंटेनरमध्ये सुमारे ६३ लाख ३४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित पान मसाला व तंबाखूयुक्त गुटखा बेकायदा विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावेळी खारघर पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकत कारवाई केली. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन पवार, महामार्ग सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील, पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगले, पोलीस बाला जाधव, दिनेश भोईर शिवाजी बोडके संदेश कावजी दशरथ मोकल, कृष्णा मुंडे, अरविंद पुष्कलवार या पथकाने केली.



# मोबाईल चोराच्या मुसक्या आवळल्या

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत रेल्वे हद्दीत एका झोपलेल्या प्रवाशाच्या खिशातून मोबाईल फोनची चोरी झाली होती. याबाबतच्या तक्रारीनंतर रेल्वे पोलिसांनी मोबाईल चोराच्या मुसक्या आवळल्या आहेत.

दहिसर पूर्व येथील गणेश कवठे हे शनिवारी (दि.१०) दुपारच्या सुमारास कर्जत स्थानकातील बाकड्यावर बसले असताना त्यांना झोप लागली. त्यांच्या झोपेचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या जवळील मोबाईल फोनची चोरी केली. झोपेतून जागे झाल्यावर कवठे यांना आपल्या शर्टाच्या खिशातील मोबाईल हरवल्याचे लक्षात आले. याबाबत त्यांनी कर्जत रेल्वे पोलीस चौकीत जाऊन तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज संकलित करून संशयित इंदिरानगर-दहिवली येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्याठिकाणी जाऊन नयनेश उर्फ पिंट्या अरुण शिंदे (४०) याला ताब्यात घेऊन चौकशीसाठी कर्जत लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यावेळी त्याच्या अंगझडतीमध्ये चोरीला गेलेला मोबाईल सापडला. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

**Hiring Walk In Interview**
Company name:- InvoSolar Energy Pvt Ltd
Designation:- Sales Executive
Product:- Solar Panel
Location:- Alibag
Gender:- Male / Female
Equipment needed:- Two Wheeler and Mobile
Qualification:- 12th pass
Petrol allowance:- 5k
Fixed Salary:- 15k
Experience:- 1 year in corporate Sales.
Contact : Mejanoor Shaikh - 8268696332
Nikhil chavan - 9881401550
Send your CV
at:-shaikhmejanoor007@gmail.com
ADDRESS:-SUKHSAGAR BHAVAN, 2ND FLOOR, OPPOSITE AMBEDKAR STATUE, ALIBAG, RAIGAD - 402201

**सक्रिय निरीक्षण यंत्रणांची अंमलबजावणी | हरित भविष्याकडे महत्त्वपूर्ण पाऊल**

# जेएनपीएतील वायुगुणवत्तेत लक्षणीय सुधारणा

**| उरण | प्रतिनिधी |**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण हे भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असून आपल्या कार्यक्षेत्रात सभोवतालच्या वायुगुणवत्तेत सातत्यपूर्ण सुधारणा नोंदवत आहे. अलीकडील वायुगुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) डेटाच्या तुलनेत सकारात्मक कल दिसून येत असून एक्यूआयमध्ये ठोस सुधारणा झाली आहे. ही सातत्यपूर्ण घट जेएनपीएद्वारे राबविण्यात आलेल्या पद्धतशीर पर्यावरणीय हस्तक्षेप, हरित उपक्रम आणि सक्रिय निरीक्षण यंत्रणांची प्रभावी अंमलबजावणी दर्शवत आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने जेएनपीएची बांधिलकी अधिक बळकट होत असून पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा आणि स्वच्छ तंत्रज्ञानावर भर देत बंदराने हरित भविष्याकडे महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.





ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मागील वर्षाच्या तुलनेत पीएम १० पातळीत सातत्यपूर्ण सुधारणा नोंदविण्यात आली. विशेषतः नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत अनुक्रमे सुमारे ३३ टक्के आणि २९ टक्के इतकी लक्षणीय घट झाली असून, हिवाळ्याच्या उच्च कालावधीत धूळजन्य प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे हे स्पष्टपणे दर्शवत आहे. पीएम २.५ पातळीत मिश्र स्वरूपाचा कल दिसून आला. नोव्हेंबर महिन्यात पीएम २.५ मध्ये सुमारे २५ टक्के घट नोंदविण्यात आली असून, ही स्पष्ट सुधारणा दर्शवत आहे. एकूणच आकडेवारीनुसार, हंगामादरम्यान मोठ्या आकाराच्या कणांमुळे होणारे प्रदूषण लक्षणीय प्रमाणात कमी झाल्याचे स्पष्ट होत आहे. ऑक्टोबर २०२५ पासून बंदरातील प्रमुख कार्यक्षेत्रांमध्ये यांत्रिक रस्ते-धूळ स्वच्छता वाहने तसेच धूळ दमन यंत्रांची तैनाती केल्यानंतर वायुगुणवत्तेत ही सुधारणा दिसून येत आहे. हे उपाय जेएनपीए यांच्या सर्वसमावेशक पर्यावरण व्यवस्थापन प्रणालीचा तसेच व्यापक ग्रीन पोर्ट धोरणाचा अविभाज्य भाग आहेत.

### शाश्वत मोबिलिटीकडे वाटचाल

जेएनपीए स्वच्छ व शाश्वत मोबिलिटीकडे वाटचाल करत आपल्या कार्यप्रणालीत विद्युत व पर्यायी इंधनावर चालणाऱ्या वाहनांचा समावेश करीत आहे. सध्या १० विद्युत कार आणि ५२ सीएनजी कार वापरात असून, कंटेनर यार्डमध्ये बॅटरी स्वॅपिंग स्टेशनच्या सहाय्याने ५३ विद्युत ट्रक्स कार्यरत आहेत. विद्युत वाहन परिसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी दोन बॅटरी स्वॅपिंग स्टेशन आणि सहा चार्जिंग पॉइंट्स आधीच कार्यान्वित करण्यात आले आहेत. पुढील टप्प्यात, डिसेंबरपर्यंत १५० हून अधिक विद्युत ट्रक्स तैनात करण्याचे नियोजन असून, अधिकृत कार व बसचे विद्युत वाहनांमध्ये रूपांतराची प्रक्रिया सुरू आहे.

### इंधन, उत्सर्जन बचतीत वाढ

आतापर्यंत सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा (सीपीपी) मुळे बंदर परिसंस्थेत ट्रक वाहतुकीचे सुयोग्य नियोजन व वाहनांच्या निष्क्रिय (आयडलिंग) वेळेत घट झाल्याने ठोस पर्यावरणीय तसेच आर्थिक लाभ साध्य झाले आहेत. या उपक्रमामुळे १२.९ कोटींहून अधिक डिझेल बचत झाली असून, सुमारे ३.६५ दशलक्ष किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनात घट नोंदविण्यात आली आहे. हा उपक्रम प्रभावी वाहतूक नियोजन आणि कार्यक्षमता वाढविणाऱ्या उपाययोजनांमुळे इंधन वापर कमी करणे, उत्सर्जनात घट घडवणे आणि शाश्वत बंदर संचालनाला चालना देणे कसे शक्य होते, याचे उत्तम उदाहरण ठरतो. जेएनपीए अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे हरित व जबाबदार बंदर विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे.

# पाटबंधारे खात्याची डेडलाईन फेल



## • शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोह्यातील गोवे गावातील शेतकऱ्यांना महिसदरा कालव्याच्या माध्यमातून सोडण्यात येणारे पाण्याची डेडलाईन फेल झाली आहे. त्यामुळे गोवे येथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असुन याला जबाबदार कोण, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरुन कुंडलिका नदीच्या उजवा तीर काळव्यामधून महिसदरा कालव्याला पुई तसेच गोवे गावातील शेतकऱ्यांच्या भातशेतीला अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा केला जात आहे. या पाण्यामुळे उन्हाळी भातशेतीमध्ये उत्तम प्रकारे भात पिक घेतले जाते. परंतु, गेल्या वर्षी मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे पुई तसेच गोवे गावाला पाणी पुरवठा करणारा चेंबर तसेच त्याच्या पुढे असणारी मोरी तोडण्यात आली. याविषयी या मोरीचे बांधकाम करण्यासाठी गोवे गावातील ग्रामस्थ आक्रमक पवित्रा घेत रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी मुंबई-गोवा महामार्गाचे ठेकेदार व पाटबंधारे खात्याचे सहाय्यक अभियंता यांनी त्या ठिकाणी येऊन ती मोरी बांधण्याचे आश्वासन दिले. त्याबरोबर पुढील कालवा दुरुस्तीचे काम करण्यात येईल, यासाठी आम्हांला एक वर्ष द्या. सर्व कामे मार्गी लावून पुढील वर्षी पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करू, असे आश्वासन त्यांच्याकडून देण्यात आले होते. त्यानंतर मोरीचे काम करण्यात आले. परंतु, काही ठिकाणच्या पाईप लाईनच्या कामासह इतर कामे अद्याप ही बाकी आहेत.

या वर्षी महिसदरा कालव्याला पाणी सुटणार म्हणून शेतकऱ्यांनी शेतातील गवत काढले; तसेच, इतर पुर्व मशागतीची कामे देखील केली. परंतु, पाटबंधारे खात्याकडून महिसदरा कालव्याला पाणी सोडण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.

त्यामुळे पाणी सोडण्यासाठी गोवे ग्रामसभेत ठराव घेऊन ग्रामपंचायतीतर्फे कोलाड पाटबंधारे खात्याला २६ डिसेंबर रोजी अर्ज देण्यात आला होता. त्यानंतर कालव्याच्या दुरुस्तीचे काम पुर्ण करून दि.१० ते १५ जानेवारीच्या आत पाणी सोडण्यात येईल, असे पाटबंधारे खात्याकडून सांगण्यात आले होते. त्याला २० दिवस उलटून गेले तरी महिसदरा कालव्याला पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे.

> “या परिसरातील शेतकरी अनेक वर्षांपासून उन्हाळी व पावसाळी दोन्ही पिके घेत होते. परंतु, दोन वर्षापासून अति पावसामुळे हातातोंडाशी आलेले घास पावसाने हिरावून नेला आहे. तर, पाटबंधारे खात्याकडून गेल्या वर्षांपासून उन्हाळी भातशेतीला पाणी न सोडल्यामुळे भातशेती नुकसान होत आहे. गोवे येथील भातशेतीला कालव्याला पाणी सोडण्यात यावे, असा अर्ज गोवे ग्रामपंचायती मार्फत केला आहे. परंतु, जानेवारीचे १५ दिवस संपले तरी शेतकऱ्यांच्या भातशेतीला पाणी सोडण्यात आले नाही. जर भातशेतीला पाणी मिळाले नाही तर पाटबंधारे खात्याकडून नुकसान भरपाई देण्यात यावी.
> – महेंद्रशेठ पोटफोडे, सरपंच, गोवे”

## निवडक

### ग्रामपंचायतीला सौर दिव्यांची भेट



**कोलाड :** गोवे गावात पर्यावरणपूरक ऊर्जेचा प्रसार व्हावा, तसेच ग्रामीण भागात शाश्वत विकासाला चालना मिळावी या उद्देशाने तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या माध्यमातून ग.द.तटकरे तंत्रनिकेत कॉलेज यांच्यावतीने गोवे ग्रामपंचायतीला सौर दिव्यांची भेट देण्यात आली. या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत परिसरासाठी सौर दिवे व पाईप प्रदान करण्यात आले. यावेळी तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे, रजिस्टार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल, नानासाहेब धर्माधिकारी कॉलेज प्राचार्य विश्वास देशमुख, तसेच उप सरपंच निशा जवके, नरेंद्र पवार, रंजिता जाधव, ग्रामसेवक गोविंद शिद, अश्विनी पोटफोडे, मयुरी जाधव, अजय पिंपलकर, विनायक पोटफोडे, किरण पवार, अनील पवार आदी उपस्थित होते.

### पनवेलमध्ये धान खरेदीला वेग



**पनवेल :** तालुक्यात आधारभूत धान खरेदी योजना २०२५-२६ अंतर्गत धान खरेदीला वेग आला आहे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन मुंबई व जिल्हा पणन अधिकारी कार्यालय अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसाधारण धानासाठी प्रति क्विंटल २ हजार ३६९ रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यातील शेतकरी ऑनलाईन नोंदणी करून आपला भात पनवेल तालुका सहकारी भात गिरणी लिमिटेड येथे विक्रीसाठी आणत आहेत. दर समाधानकारक असल्याने शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गिरणी परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. शासनाच्या हमीभाव खरेदीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून धान खरेदी प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा जागर




**पाली/बेणसे :** श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणाऱ्या या सोहळ्याने उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये प्रामुख्याने नाटिका, ऐतिहासिक घटनांवर आधारित नाटके, शेतकरी नृत्य, लोककला, लावणी आणि वारकरी नृत्य, तसेच सामाजिक संदेश देणारी, स्त्री शिक्षणावर आधारित आणि प्रबोधनपर गीते व समूह गान इत्यादींचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या या दर्जेदार सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथीराष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष संदेश शेवाळे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. शिक्षण घेत असतानाच अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे व्यक्तिमत्व विकास होतो, असे मत देखील त्यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर होते. यावेळी संस्थेचे सचिव पांडुरंग दिघे, खजिनदार एकनाथ ओंबळे, संचालक एकनाथ चांदे, धर्मा बेलोसे, विद्या तांबट, सरपंच उत्कर्षा बेलोसे, सदस्य उमेश तांबट, भद्रेश शहा, अरुण घोसाळकर आदी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांना बायोचार निर्मिती प्रशिक्षण

**चिरनेर :** जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करत, उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांसाठी शुक्रवारी (दि.१६) 'बायोचार' निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. या बायोचार निर्मितीच्या प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके चिरनेर येथील शेतकरी रामदास हरिभाऊ घबाडी यांच्या शेत-शिवारात दाखविण्यात आले. शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने चिरनेर गावात शेतकऱ्यांसाठी बायोचार नर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणात टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याविषयीचे शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना संबोधित करताना, सहाय्यक कृषी अधिकारी अक्षय राठोड यांनी पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते. यालाच बायोचार असे म्हणतात, असे सांगितले. तर, उप कृषी अधिकारी ए.डी. बुरकुल यांनी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीवर भर द्यावा असे आवाहन करत रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो, अशी माहिती दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.



## जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या वाहनांच्या मुळ मालकांचा शोध घेतला. परंतु, ते सापडले नाहीत. या गाड्या बऱ्याच कालावधीपासून पोलीस ठाणे आवारात पडून आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया केली जाणार आहे. त्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. त्यामुळे या वाहनांचा मंगळवारी (दि.२०) सकाळी ११ वाजता तळोजा पोलीस ठाण्याच्या शेजारी ईएमसी सेंटर येथे लिलाव होणार आहे. त्यासाठी इच्छुक भंगार परवानाधारकांनी सोमवार, दि.१९ जानेवारीपर्यंत पनवेल शहर पोलीस ठाण्यात निवीदा सादर कराव्यात, असे आवाहन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## माथेरानमध्ये जबरी चोरी

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात शुक्रवारी (दि.१६) रात्री साडेआठच्या सुमारास शिवाजी रोड परिसरातील वन ट्री हिल पॉइंटजवळ असलेल्या कदम टी स्टॉलमध्ये थरारक जबरी चोरीची घटना घडली. चार अज्ञात चोरट्यांनी सिगारेटच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करत चाकूसुऱ्याचा धाक दाखवून दुकानमालक नारायण कदम व त्यांच्या पत्नी चंदा कदम यांना दोरीने बांधून ठेवले. त्यानंतर घरातील सुमारे १ लाख रुपये रोख रक्कम व सात ते आठ तोळे सोन्याचे दागिने लंपास करून फरार झाले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे दाम्पत्याला मोठा मानसिक धक्का बसला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माथेरानमधील अनेक




पॉइंट व बंगले गावापासून दूर व एकाकी ठिकाणी असल्याने अशा प्रकारच्या घटनांचा धोका वाढत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. या घटनेनंतर व्यापारी व स्थानिक रहिवाशांमध्ये सुरक्षेबाबत तीव्र चिंता व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच माथेरान पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी अनिल सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. परिसरातील हालचाली, ये-जा मार्ग तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## रस्ते सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना जागरूकता

**| नेरळ | प्रतिनिधी |**

रस्ते सुरक्षतितेला केंद्र आणि राज्य सरकारसह रस्ते विकास मंत्रालयाकडून विशेष महत्व दिले जात आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षितेतेबाबत सजग असायला हवे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षितता समजून घेऊन जागरूक नागरिक व्हावे, असे आवाहन मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुरतकर यांनी केले. नेरळ येथील एलएईएस स्कुल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये रस्ते सुरक्षा सप्ताह निमित्त मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.



मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुरतकर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे नियम, वाहतूक चिन्हांचे महत्त्व, हेल्मेट व सीटबेल्ट वापरण्याची आवश्यकता तसेच सुरक्षित वाहनचालना याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून भविष्यात अपघातांचे प्रमाण कमी करण्यास हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. तर, मोटार वाहन निरीक्षक जय शेटे यांनी रस्त्यावर होणारे अपघात कमी करण्यासाठी आवश्यक काळजी व उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, विद्यार्थ्यांनी वाहने चालवताना नियमांचे पालन करावे, रस्त्याने चालत असताना अपघात घडल्यावर मदतीला धावून जावे, असे आवाहन केले. शेवटी शाळेच्या मुख्याध्यापिका अजिता नायर यांनी असे उपक्रम दरवर्षी शाळेत आयोजित करण्यात यावेत, अशी सूचना विभागीय परिवहन विभागाला केली.

## चॅरिटेबल ट्रस्टची सामाजिक बांधिलकी

**| पाली | प्रतिनिधी |**

रवींद्र पाटणी फॅमिली चॅरिटेबल ट्रस्टच्या सौजन्याने, बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर मुंबई मध्यवर्ती कमिटी व ग्रामस्थांच्या माध्यमातून सुधागडातील पंचशील नगर पाच्छापूर येथे बुधवारी (दि.१४) पंचक्रोशीतील गरीब व गरजू रहिवाशांना मोफत धान्य आणि ब्लँकेट वाटप करण्यात आले. यामध्ये जवळपास दीडशेहुन अधिक कुटुंबांना धान्य किट व ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.



रवींद्र पाटणी फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट, बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर मुंबई मध्यवर्ती कमिटी व ग्रामस्थ हे २५ वर्षांपासून दरवर्षी हा कार्यक्रम राबवित असतात. मोफत धान्य वाटप ब्लॅकेट वाटप, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, नेत्रचिकित्स शिबीर, चष्मे वाटप, शालेय विध्यार्थी यांना शालेय वस्तूंचे वाटप असे विविध कार्यक्रम सातत्याने राबवित असतात. हा कार्यक्रम राबविण्याकरिता बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर मुंबई मध्यवर्ती कमिटी व ग्रामस्थ कमिटीचे प्रमुख मार्गदर्शक व सल्लागार सुरेंद्र विश्वनाथ महाडिक यांचे मोलाचे सहकार्य असते. या कार्यक्रमाला रवींद्र पाटणी फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे डि.के. जैन, डॉ. मोहनसिंह शेखावत, संतोष सैतावडेकर, निशांत पवार, ॲड. सुशील गायकवाड, अक्षय गायकवाड व विवेक रोकडे उपस्थित होते.

## विविध कार्यक्रमांचे आयोजन

**रसायनी :** एचओसी वसाहतीत श्री साईबाबा मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने बुधवारी (दि.२१) दुपारी हळदीकुंकू समारंभ, गुरुवारी (दि.२२) सकाळपासून धार्मिक कार्यक्रम व सायंकाळी मोहोपाडा येथे पालखी मिरवणूक, तसेच शुक्रवारी (दि.२३) वसंत पंचमी प्रमुख उत्सव दिनानिमित्त सकाळपासून धार्मिक कार्यक्रम, सायंकाळी बाळकृष्ण पाटील, राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ व रात्री ज्ञानेश्वर भगत भजनी मंडळ यांचे संगीत भजन असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे श्री साईबाबा सत्संग केंद्राचे अध्यक्ष एम.एस. मगर यांनी सांगितले.



## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ग्रंथ प्रदर्शन उत्साहात

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

श्री स्वामी विवेकानंद जयंतीचे औस्तुक्य साधून न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. याप्रसंगी अशोक काते, सुशील यादव आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेता घेता उत्तम व्यक्ती बनण्यासाठी सर्वांगीण व्यक्तिगत विकास होणे खूप गरजेचे आहे. तसेच, सर्वांनी कला गुण संपन्न होणे देखील गरजेचे आहे, असे सांगितले. स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन समीर बनकर यांनी आपल्या मनोगतात, राज्यातील जवळ जवळ ९० टक्के शाळांचे डिजिटीकरण झाले असून ती काळाची गरज आहे. मी या विद्यालयात प्राचार्य म्हणून हजर झाल्यापासून माझ्या मनात एक खंत जाणवत होती. ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाचे डिजिटीकरण होणे अत्यावश्यक आहे. कारण सर्व सुविधा प्राप्त असतील तरच दर्जेदार विद्यार्थी तयार होऊ शकतात आणि स्पर्धेच्या युगात तो विद्यार्थी टिकू शकतो. ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी, स्कूल कमिटीचे सहकार्य आणि हितचिंतक यांच्या सहकार्यातून ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे प्रामाणिक प्रयत्न मी करणार असून आपल्या सहकार्याची अपेक्षा करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार संजय खांबेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत भरविण्यात आलेल्या या ग्रंथ प्रदर्शनात स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन समीर बनकर, प्राचार्य डी.आर. पाटील, पत्रकार संघटना अध्यक्ष शशिकांत शिर्के, अशोक काते, सुशील यादव, अंकुश गाणेकर, संतोष उद्धरकर, वैभव कळस, शिरीष समेळ, अंगद कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जलवाहिन्या फुटण्याचे सत्र सुरूच

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन शहरापर्यंत येणाऱ्या जलवाहिन्या अनेक वेळा फुटण्याचे प्रकार घडत आहेत. मात्र, आज एकाच दिवशी तब्बल तीन ठिकाणी जलवाहिन्या फुटण्याचा प्रकार समोर आला आहे. श्रीवर्धन जसवली मार्गावरील ट्रॉली स्टॉप या शॉपिंग सेंटरच्या जवळ एका ठिकाणी जलवाहिनी फुटली आहे. तर, दुसऱ्या ठिकाणी स्टार किड्स या शाळेसमोर जलवाहिनी फुटलेली असून तिसरे ठिकाण जसवलीच्या पुढील ओमकार हॉटेलच्या जवळ जलवाहिनी फुटली आहे.



श्रीवर्धन शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा व नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पापासून श्रीवर्धन येथील साठवण टाकीपर्यंत जुने झालेले पाईप बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. मात्र, या नवीन केलेल्या कामामध्ये असंख्य त्रुटी असल्यामुळे तसेच काम निकृष्ट दर्जाचे झालेले असल्यामुळे जलवाहिन्या वारंवार फुटण्याचे प्रकार घडत आहेत. वारंवार जलवाहिन्या फुटत असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अनियमितपणे होत आहे.

सततच्या जलवाहिन्या फुटण्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे यावर्षी भर उन्हाळ्यामध्ये शहरामध्ये पाणीटंचाईची शक्यता नाकारता येत नाही. जलवाहिन्यांचे निकृष्ट काम व कामाचा सुमार दर्जा याबाबत राज्याच्या नगर विकास विभागाने चौकशी समिती नेमून श्रीवर्धन येथील कामाचे पूर्णपणे ऑडिट करावे, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

**ग्रामीण विद्यार्थ्यांना जगाशी जोडले | डॉ. संगीता तोडमल यांचे मार्गदर्शन**

# वडगाव जि.प. शाळेचे डिजिटल पाऊल

**| रसायनी | प्रतिनिधी |**

माणिकगडाच्या पायथ्याशी डोंगरात वसलेल्या आदिवासी वस्ती असलेल्या वडगाव गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी डिजिटल दूरस्थ गुगल मीटच्या माध्यमातून अमेरिकेतील पर्यावरण तज्ज्ञ डॉ.संगीता तोडमल यांच्याशी संवाद साधला. यावेळी डॉ. तोडमल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. त्यामुळे वडगाव शाळेच्या एका डिजिटल पावलामुळे ग्रामीण विद्यार्थी जगाशी जोडले गेले.



वडगाव जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.१७) गुगल मिटच्या माध्यमातून अमेरिकेतील पर्यावरण तज्ज्ञ डॉ. संगीता तोडमल यांच्याशी संवाद साधला. यावेळी डॉ. तोडमल यांनी भारतीय व अमेरिकीन या दोन ध्रुवाच्या टोकाच्या देशातील वर्तमान वेळ, तेथील वातावरण, हवामान, घरांची रचना, वनस्पती, प्राणी यांच्यातील साम्य व फरक चांगल्या पद्धतीने स्पष्ट करत संवाद साधत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी देखील प्रश्न विचारून आपली जिज्ञासा दाखवली. तेथील सण उत्सव, पर्यावरण धोरण, प्राणी, शेती व घरांविषयी प्रश्न विचारून उत्तरे मिळवत चर्चेत सहभाग नोंदवला. तसेच, तेथील शिक्षण व प्रशासन पद्धती विषयी मार्गदर्शन करताना शाळा, संरचना, अभ्यासक्रम, वेळापत्रक व विशेष म्हणजे गणवेश नसणे आणि थेट कौंटीच्या मेयर कडूनच प्रवेश दिले जातात हे विद्यार्थ्यांना विशेष वाटले. या सत्रात पर्यावरण व पर्यावरण पूरक सण उत्सव याविषयी जास्तीतजास्त मार्गदर्शन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष राजश्री जांभुळकर, सदस्य, पालक व विद्यार्थी यांच्यासह वैजनाथ जाधव, मयुरी धायगुडे व संकेत काठोळे हे शिक्षक उपस्थित होते.

> “दोन देशांचा तुलनात्मक अभ्यास प्रत्यक्ष आभासी पद्धतीने करणे हा मुलांना वर्ल्डव्हाइल्ड विचार करण्यास पूरक असा उपक्रम आहे.
> –डॉ. संगीता तोडमल, पर्यावरण तज्ज्ञ, जॉर्जिया–अमेरिका”

> “दप्तरमुक्त शनिवार या उपक्रमांतर्गत 'एक डिजिटल पाऊल ग्रामीण विद्यार्थ्यांना जगाशी जोडण्याचे' हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना शाळेत बसून जगाचा अभ्यास व सहल करता येईल. आज डॉ. संगीता तोडमल यांनी खूप छान मार्गदर्शन करत पहिल्या पुष्पाची सुरुवात केली. पुढच्यावेळी नवीन देशांसह पुन्हा हे सत्र आयोजित केले जाईल.
> – सुभाष राठोड, मुख्याध्यापक, वडगाव शाळा”

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१८ जानेवारी
१) श्रीम.मेधा मनोहर शेंडे ब्राम्हणआळी, अलिबाग, दि.१८-१-१९४६
२)श्री.उल्हास लक्ष्मण सकपाळ मु.शिवलकर नाका, ता.अलिबाग दि.१८-१-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कु. निधी मिथुन रोगे, वाढदिवस,नवेदर नवगाव, अलिबाग**

**विमल सॉ मिल उचेडे पेण**

# राज्य महामार्गावर अपघातांत वाढ



- **गतिरोधक बसविण्याची मागणी**
- **तहसीलदारांना निवेदन**

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पाली वाकण राज्य महामार्गावर (क्र.५४८ अ) सातत्याने अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. या गंभीर अपघातात अनेकांचा जीव गेला आहे तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. या धोकादायक मार्गावर गतिरोधक बसविण्याची मागणी पँथर सेनेने केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास रस्ता रोको करणार असल्याचा इशारा दिला आहे. जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सुधागड तहसीलदारांना या मागणीचे निवेदन दिले.

काही वर्षांपूर्वी पाली खोपोली वाकण राज्य महामार्गचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पाली ते खोपोली या मार्गाचे काँक्रिटीकरण झाले असल्याने या मार्गावरील असंख्य वळणे व चढणं काढण्यात आली आहेत त्यामुळे वाहनांची गती बेसुमार वाढली आहे. परिणामी अपघातांच्या संख्येत असंख्य वाढ झाली आहे. या अनुषंगाने अपघातांना आळा घालण्यासाठी या मार्गावरील अपघाती क्षेत्र, शाळा, गाव, बाजारपेठा असलेल्या ठिकाणी गतिरोधक बसवून सूचना फलक लावण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड यांनी सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाची प्रत रायगड जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना पाठवण्यात आली आहे. निवेदन देते वेळी रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड, सुधागड तालुकाध्यक्ष मारुती गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सेवक जाधव, आकाश कांबळे व निशांत पवार उपस्थित होते.

### इथे हवेत गतिरोधक

पाली खोपोली दरम्यान चिवे गावाजवळ म्युझिक सिटी (ज्याठिकाणी वारंवार अपघात होतात), खुरावले फाटा ( पेण सुधागड मतदार संघ असलेल्या पेण तालुक्याला जोडतो) पेडली बाजारपेठ, जांभूळपाडा हायस्कुल, नाणोसे गाव, राबगाव अशा अपघाती क्षेत्र असलेल्या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी पँथर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### पर्यायी मार्गाचा वापर

पाली खोपोली वाकण या मार्गाचा वापर पर्यायी मार्ग म्हणून कोकणवासी करतात. मुंबई पुणे द्रूतगती मार्ग (एक्सप्रेस हायवे) हा खोपोली पाली फाटा येथे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गला जोडतो, त्यामुळे ठाणे, मुंबईहुन गोवा व कोकणात जाण्यासाठी नागरिकांचा वेळ वाचतो. समुद्रकिनारी व पर्यटनस्थळी सुट्ट्यांमध्ये कोकणात फिरण्यासाठी पर्यटक पाली खोपोली वाकण या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी या मार्गावरून वाहनांची रहदारी कायम असते. व वेगवान वाहनांमुळे अपघात वाढतात. तसेच या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे देखील आहेत यामुळे सुद्धा अपघात घडतात.

# कारागृह परिसरात बिबट्याचा वावर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघरमधील पांडवकडा भागात काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे प्रसारमाध्यमांद्वारे समजले होते. परंतु, तळोजा मध्यवर्ती कारागृहाचे मागील डॉगर परिसरामधून बिबट्याने कारागृहाचे वसाहत परिसरात शिरकाव केल्याचे कारागृहअधिकारी-कर्मचाऱ्यांना आढळून आले. त्यामुळे रात्रीचेवेळी कर्तव्यावर येणारे व सुरक्षा गस्तीसाठी ये-जा करणाऱ्या अधिकारी व कर्मचार्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून सर्वजण बिबट्याचे दहशतीखाली कर्तव्य बजावत आहेत. कारागृह परिसरामधील अधीक्षक बंगला वगळता आजूबाजूस कोणीही निवासी नसल्याने शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असलेले अधीक्षक व त्यांचे कुटुंबियांचे जिवितास धोका निर्माण झालेला असून लवकरात लवकर बिबट्याचा शोध घेऊन त्याला पकडणे आवश्यक झाले आहे. कारागृहाची परिसरात मागील बाजूस अधीक्षक बंगला असून सद्यस्थितीत तेथे कारागृह अधीक्षक हे सहकुटुंब वास्तव्यास आहेत. अधीक्षक बंगल्याचे सुरक्षेकरीता दिवसपाळीत व रात्रपाळीत कर्मचारी नेमलेले असतात. सदरचा बंगला हा डोंगर पायथ्याशी असून आजूबाजूला जंगलासारखी दाट झाडी आहे. यामुळे बिबट्या या वन्य प्राण्यांचा वावर होत असल्याचे आढळून आलेले आहे. बिबट्यास पकडण्यासाठी लोखंडी पिंजरा लावणेकरीता व आवश्यक उपाययोजना तातडीने करणेबाबत वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल यांना कारागृह प्रशासनाने लेखी पत्रांन्वये विनंती केलेली असून त्यांनी देखील पाहणी करुन ट्रॅप कॅमेरे बसविलेले आहेत. बिबट्या जेरबंद होईपर्यंत अधिकारी व कर्मचारी जीव मुठीत घेऊन कर्तव्य बजावीत आहेत.

# संतोष पाटील यांची बिनविरोध निवड

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा आज शुक्रवार (दि.१६) जानेवारी रोजी कर्जत नगरपरिषद सभागृह येथे पीठासीन अधिकारी तथा अध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्याधिकारी तानाजी चव्हाण उपस्थित होते.

कर्जत नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी कर्जत परिवर्तन विकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संतोष पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी कर्जत परिवर्तन विकास आघाडीचे संतोष पाटील यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष यांनी संतोष पाटील बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर केले. या सभेस अरुणा वायकर, किशोर कदम, कोयल कन्हेरीकर संकेत भासे, अंजली कडू, सुमिता गायकवाड, महेंद्र चंदन, राधिका पवार, विजय हजारे, सुवर्णा जोशी, प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, नेहा शिंदे, रामदास गायकवाड, सुचिता खोत, कुमेश मोरे, जान्हवी देवघरे, हर्षाली गायकवाड, अशोक राऊत, मानसी कानिटकर नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते. पाटील यांची बिनविरोध निवड होताच उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते पुंडलिक पाटील, रंजना धुळे तसेच कार्यकर्त्यांनी संतोष पाटील यांचे अभिनंदन केले.

# तुकाराम राऊत यांचे निधन



**बोर्लीपंचतन** : श्रीवर्धन तालुक्यातील वाकळघर गावचे ज्येष्ठ नेते, तुकाराम राऊत (दादा) यांचे शुक्रवार (दि.९) जानेवारी वयाच्या १०० व्या वर्षी वृद्धपाकळाने निधन झाले. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांचे जवळचे सहकारी होते. यांनी शैक्षणीक क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावली होती. याचे बारावे व शोकसभा (दि.२०) जानेवारी या दिवशी आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, आठ नातवंडे असा मोठा पारिवार आहे.

# मोहोपाडा कामगार नाक्यावर वाहतुक कोंडी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा जनता विद्यालय वळणावर सकाळी कामगार मोठ्या प्रमाणावर रस्त्यामध्ये उभे राहत असल्याने रोजची वाहतूक कोंडी होत असून अपघातांना आमंत्रण मिळत आहे. शिवाय सकाळी कंपनीमध्ये जाणाऱ्या बसेस सकाळी येत असल्यामुळे वाहतुक कोंडी नित्याचीच होवून बसली आहे. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये ने आण करणाऱ्या बसेस, रिक्षा याच वाहतुक कोंडीमध्ये अडकून राहतात. त्यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये वेळेवर न पोहचता रोज २० ते ३० मिनिटे उशीर होत आहे. तसेच सकाळी मुलांना शाळेत घेऊन जाणाऱ्या महिलांना सुध्दा या गर्दीचा खुप त्रास सहन करावा लागत आहे.

जनता विद्यालय वळणावरील सकाळी कामगार उभे राहण्याचे ठिकाण बदलून पर्यायी जागा मोहोपाडा येथील अचानकचे मैदान किंवा से. बी. रोड येथे करावी, अशी मागणी टाकेदेवी विद्यार्थी सेवाभावी संस्था रसायनी यांनी रसायनी पोलीस, वासांबे ग्राम पंचायतीकडे केली आहे.


# हुतात्म्यांना आदरांजली

**उरण:** तालुक्यातील पागोटे येथे ४२ वा हुतात्मा स्मृतिदिन शनिवारी (दि.१७) साजरा करण्यात आला. यावेळी महेंद्र घरत यांनी हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९८४ मध्ये केलेल्या शौर्यशाली, गौरवशाली आणि ऐतिहासिक लढ्यात पागोटे गावातील महादेव हिरा पाटील, केशव महादेव पाटील, कमलाकर कृष्णा तांडेल हे नवघर फाटा येथे पोलिसांच्या बेछूट गोळीबारात हुतात्मा झाले. त्यांच्या बलिदानाप्रीत्यर्थ पागोटे येथे हुतात्मा दिन साजरा केला जातो. यावेळी माजी आ. मनोहर भोईर, नगराध्यक्ष भावना घाणेकर, दिबांचे पुत्र अतुल पाटील, भूषण पाटील, रवी पाटील, संतोष पवार, कुणाल पाटील आणि सदस्य उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि.१८ ते २४ जानेवारी २०२६


ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## अडथळे पार कराल




**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विकासाचे घर सक्रिय राहिल्यामुळे आपल्याला व्यावसायिक क्षेत्राची वाढ होण्यास मदत करण्यासाठी अनेक संधी मिळतील. आपली मेहनत आपल्याला व्यावसायिक क्षेत्रातील अडथळे सहजपणे पार करण्यास मदत करेल. या राशीच्या व्यावसायिकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. बऱ्याच काळापासून रखडलेले एखादे काम सुरू करण्यासाठी ही चांगली वेळ असल्याचे देखील सिद्ध होऊ शकते. तथापी, काही ग्रहस्थितीमुळे, वाईट सवयी सोडा, किवां त्यांच्या आहारी न जाण्याचे धोरण ठेवा. निरोगी जीवनाकडे महत्व लक्षात घ्या. आठवड्याच्या शेवटी, ग्रहस्थिती हे सूचित करते की आपल्या भूतकाळातील चुका आणि अनुभवांकडून आत्म-आकलन करण्याची आणि समजून घेण्याची आणि शिकण्याची वेळ आली आहे. **महिलांना**: या काळात आपली वृत्ती थोडीशी हट्टी आणि मतलबी होऊ शकते, ज्यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही बाबींवर समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच, तुम्ही तुमच्या स्वभावाने सौम्य बनण्याचा प्रयत्न करा आणि कोणताही निर्णय घेण्यापूर्वी इतरांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन करा. **शुभ दिनांक** : १८,१९

## संपत्ती वाढण्याची शक्यता




**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या आठवड्याच्या सुरूवातीस, ग्रहस्थिती हे सूचित करते की या कालावधीत आपल्या जीवनसाथीची संपत्ती वाढू शकते. या व्यतिरिक्त हे घर संयुक्त वित्त संबंधित देखील आहे, यावेळी आपण दोघेही प्रॉपर्टी किंवा पॉलिसीमध्ये एकत्र गुंतवणूक करण्याचा निर्णय घेऊ शकता किंवा एकाच वेळी बँकेत संयुक्त खातेदेखील उघडू शकता, असे केल्याने आपल्यातील दोघांचे संबंध आणि नाते दृढ होण्यास मदत होईल. या राशीच्या लोकांच्या घरात एक शुभ कार्यक्रम होऊ शकतो, कारण चंद्र प्रॉपर्टी, स्टॉक मार्केट आणि ट्रेडिंगमध्ये गुंतवणूकीसाठी देखील हा एक चांगला काळ आहे कारण भविष्यात आपल्याला त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. हा एक चांगला काळ आहे जो भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरू शकतो आणि जीवनात अचूकतेने पुढे जाण्यास मदत करू शकतो. **महिलांना**: या कालावधीत काही या राशीच्या लोकांना त्यांच्या सासरच्या पक्षाकडून किंवा आपल्या जोडीदाराच्या पालकांकडून लाभ मिळू शकतात. साखर, तांदूळ, दुधासारख्या सफेद गोष्टी सोमवारी आणि शुक्रवारी दान करा. **शुभ दिनांक** : २०,२१

## यश मिळण्याची शक्यता



**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या विचारांना आपल्या कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे समर्थन आणि भरपूर प्रशंसा मिळेल. व्यावसायिकदृष्ट्या, या राशीच्या जातकांना व्यावसायिक क्षेत्रात काही नवीन यश मिळण्याची शक्यता आहे, जे आपल्यासाठी बरेच नवीन मार्ग उघडत असल्याचे सिद्ध होऊ शकते. या व्यतिरिक्त, या राशीच्या अविवाहित लोकांसाठी ही वेळ चांगली ठरू शकते कारण या काळात ते त्यांच्या लव इंटरेस्ट किंवा जीवनसाथीला भेटू शकतात. तथापी, मात्र या कालावधीत आपली प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते, ज्यामुळे आपल्याला आरोग्याशी संबंधित काही समस्यांना सामोरे जावे लागेल. परिणामी त्यांच्या विलास आणि सुख-सुविधांमध्ये वाढ होईल कारण आराम आणि विलासिताचे प्रतिनिधित्व करणारी स्थाने कार्यन्वित होणार आहेत. या व्यतिरिक्त, मालमत्ता संबंधी काही नवीन घडामोडी जसे की विक्री, खरेदी, नूतनीकरणाची शक्यताही आहे. **महिलांना**: तुळशीच्या झाडाची प्रतिदिन पूजा करा. आठवड्याच्या सुरूवातीस या राशीच्या लोकांसाठी ग्रहस्थितीमुळे,काही चांगले परिणाम मिळणार आहेत. या कालावधीत आपल्या आईबरोबरचे आपले संबंध सुधारण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक** : २२,२३

## आर्थिक फायदा होईल



**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात काहीसी स्थिती छोट्या यात्रेसाठी फायदेशीर ठरेल आणि हे त्यांच्यासाठीही चांगले ठरेल जे आयात-निर्यातीत व्यस्त राहू इच्छितात किंवा परदेशी भूमीपासून नवीन सुरुवात करू इच्छितात. आठवड्याच्या मध्यला काही अडचणी येतील, कारण ही ग्रहस्थिती काहीशी दुर्बल मानली जाते. परिवर्तन आणि रोगाचे घर देखील मानले जाते. या कालावधीत, आपल्या योजना आणि कल्पना साकार होण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ घेऊ शकतात. आपणास आत्मविश्वास आणि सर्जनशीलता कमी वाटू शकते. व्यावसायिक ताणमुळे आपल्या वैयक्तिक जीवनावरही परिणाम होऊ शकतो कारण आपण या वेळी अत्यंत आक्रमक आणि सहज रागावू शकता, परिणामी आपल्या साथीदाराबरोबर आणि मुलांशी संघर्ष होऊ शकतात. **महिलांना**: आठवड्याच्या शेवटच्या टप्प्यात, ग्रहस्थिती. हे सूचित करते की हा कालावधी मागील वेळेपेक्षा चांगला असेल आणि या कालावधीत आपल्याला आर्थीक फायदे देखील मिळतील. या काळात आपल्या वडिलांचीही परिस्थिती समृद्ध होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कुटुंबात आनंदी वातावरण निर्माण होईल. **शुभ दिनांक** : १८, २४

## सकारात्मक दुष्टीकोन ठेवा




**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वकील, सीए, शिक्षक, लिपिक आदी व्यावसायिकांना या संक्रमण काळात चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. शासकीय किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रयत्नात शुभ परिणाम मिळण्याची शक्यता आहे. दररोज सकाळी भगवान शिवच्या ''श्री शिवलीलामृत''चे वाचन करा किंवा ऐका. सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये आपल्या ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, या सप्ताहात तुम्ही आपल्या आरोग्याला घेऊन अधिक सतर्क राहाल आणि आपल्या जीवनाला उत्तम बनवण्यासाठी सर्व गरजेची कामे कराल. या सप्ताहात तुम्ही योग, ध्यान किंवा काही नवीन व्यायामाच्या माध्यमाने स्वतःच्या आरोग्यावर काम करतांना दिसाल. हे न फक्त तुमची शारीरिक गोष्टीत मदत करेल तर तुम्हाला व्यावसायिक लाभ ही प्रदान करणारे सिद्ध होईल. **महिलांना**: तुमची सकारात्मकता तुमची उत्पादकता आणि दक्षतेला वाढवण्यास मदत करेल. या वेळात तुमच्या जीवनसाथी सोबत संवाद आणि समन्वय करण्यासाठी तुमच्या अतिरिक्त प्रयत्नांना यश तर मिळेलच सोबत खूप प्रशंसा आणि सहयोग मिळेल. **शुभ दिनांक** : १९,२२

## खर्चात वाढ होण्याची शक्यता



**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही या वेळात आपल्या दृष्टिकोनात अधिक सहज आणि कार्य उन्मुख व्हाल जे तुमच्या अडकलेल्या कार्याला सहजरित्या पूर्ण करण्यात तुमची मदत करेल. सप्ताहाचा मध्य प्रेमी जोडींसाठी एक चांगली वेळ सिद्ध होईल कारण, या काळात तुमच्या साथी किंवा प्रेम सोबत तुमची समज आणि सद्भाव वाढवण्यात मदतगार सिद्ध होईल. या काळात विवाहित लोकांना कुटुंबातील विस्ताराच्या रूपात काही चांगली वार्ता ही मिळू शकते. याच्या व्यतिरित उच्च शिक्षणासाठी परदेशातील विश्व विद्यालयात प्रवेश घेणारे काही इच्छुक विद्यार्थाना या काळात काही सकारात्मक वार्ता मिळण्याचे संकेत आहे. सप्ताहाच्या शेवटी कमजोर स्थितीमध्ये तुमचे घर, कार्यालय किंवा वाहनात नूतनीकरण रूपात अचानक खर्च होऊ शकतात ज्याच्या परिणामस्वरूप, तुमच्या जीवनात अवांछित तणाव आणि खर्च वाढण्याची शक्यता आहे. **महिलांना**: या राशीच्या जातकांना आपल्या आईच्या आरोग्य विषयक समस्या पाहायला मिळतील यामुळे त्यांची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद होऊ शकतात. **शुभ दिनांक** : १८,२०

## उत्तम संधी प्राप्त होतील




**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आताची ग्रहस्थिती तुमच्या कुंडलीमध्ये खूप मजबूत धन संयोग बनवत आहे. हे याकडे इशारा करते की, या काळात तुम्हाला आपल्या संचित धन आणि बचतीच्या व्यतिरिक्त विभिन्न स्रोतांनी कमाई करण्याची नवीन संधी मिळेल. व्यावसायिक रूपात हे तुमचे विचार आणि सूचनांच्या आदान-प्रदानासाठी चांगली वेळ सिद्ध होईल. यावेळी तुमच्या समोर बऱ्याच उत्तम संधी येतील. तुम्ही विवाहित असाल तर, या काळात तुम्ही आपल्या मुलांसोबत आनंदाचे क्षण घालवाल यामुळे तुमच्या घरातील वातावरणात आनंद येण्याची शक्यता असेल. **महिलांना**: प्रेमात असलेले या राशीतील जातक या वेळात आपल्या पार्टनरला घेऊन थोडे असुरक्षित असतील यामुळे त्यांच्या नात्यामध्ये थोडी कटुता येण्याची शक्यता आहे. भांडणाचे क्षण कुटुंबातील वातावरण खराब करतील तथापी, या मतभेदांना समजणे आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी ही वेळ उत्तम सिद्ध होऊ शकते. सकाळच्या वेळी नियमित गायत्री मंत्राचा जप करा. त्यामुळे नियमित वातवरणात बदल होईल तो बदल तुम्हाला शुभ होऊ शकेल. **शुभ दिनांक** : १९, २१

## योग्य निर्णय घ्या




**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात प्रत्येक तथ्याला सावधानीने पाहिल्या नंतर आणि दुसऱ्यांच्या माध्यमाने प्राप्त होणाऱ्या माहितीला चांगल्या प्रकारे पडताळणी करूनच मग निर्णय घ्या. यावेळी प्रबळ शक्यता आहे की, तुम्हाला मिळणारी सर्व माहिती योग्य नसेल आणि असा घाईगर्दीत घेतलेला निर्णय तुमच्यासाठी नुकसानदायक सिद्ध होऊ शकतो. सोबतच, या काळात तुमचे उद्दिष्ट्य आणि महत्वाकांक्षाला प्राप्त करण्यासाठी तुम्हाला सामान्य पेक्षा अधिक प्रयत्न करावे लागू शकतात. लाभदायक परिणाम प्राप्त करण्यासाठी या सप्ताहाच्या वेळी चांदीच्या ग्लास मध्ये पाणी प्या. त्यामुळे आपल्याला सकारत्मक बदल झालेला दिसेल. **महिलांना**: यावेळी ऑफिसला जाण्याऐवजी आपण वर्क-फ्रॉम-होम विकल्प निवडू शकतात. त्यामधून घरातील सुरक्षेच्या संबंधित हेतू पूर्ण होऊ शकतो. तरीही हा कालावधी तुमच्या वित्तसाठी व्यवस्था करणे किंवा त्याला योग्य प्रकारे प्रबंधन करण्यासाठी एक खूप चांगला काळ सिद्ध होतो आहे. तुम्ही फक्त आपले विजेचे व इतर बील जास्त येणार नाही याची काळजी घ्या. **शुभ दिनांक** :२०, २२

## नवीन भागीदारी कराल



**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये ग्रहस्थितीचा परिणाम स्वरूप व्यवसायीक लोक या काळात मनाची शांतता घेण्यास अधिक इच्छुक असतांना दिसतील. तसेच सही करण्यापूर्वी त्यांनी कागदपत्र योग्य प्रकारे पहावीत. या ग्रहस्थितीमुळे तुम्हाला संतृष्ट वाटेल आणि हे सुरक्षेच्या भावनांना वाढवण्यात मदत करेल अशी आहे. सप्ताहाचा मध्य तुमच्यासाठी सर्वात चांगला असेल. या काळात जर तुम्ही नवीन परियोजना सुरु करण्याच्या विचारात आहे तर, त्यासाठी ही वेळ खूप शुभ सिद्ध होऊ शकते कारण, या काळात तुम्ही ऊर्जा आणि उत्साहाने परिपूर्ण असाल. आपला व्यवसाय नेटवर्किंगने जोडण्यासाठी हा कालावधी उत्तम ठरू शकतो. जिथे तुम्ही अतिरिक्त धन प्राप्त करू शकतात. सप्ताहाच्या शेवटी शिक्षक, पब्लिक डीलिंग, खेळ इत्यादींच्या संबंधित व्यवसायाने जोडलेल्या लोकांसाठी चांगली वेळ सिद्ध होऊ शकते. **महिलांना**: हा काळ याकडे ही इशारा करते की, आपल्या आकर्षणाच्या बळावर तुम्ही इतर लोकांना आपल्याकडे आकर्षित कराल. यामुळे तुम्ही काही नवीन भागीदारी करू शकाल. आपली कामे योग्य रीतीने पूर्ण करू शकाल. **शुभ दिनांक** : २१,२३

## तणावात राहू नका



**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या क्षमतेनुसार या वेळी यशस्वी होण्यासाठी बऱ्याच संधी प्राप्त करू शकतात. व्यावसायिकांना सल्ला दिला जातो की, त्यांनी सोशल नेटवर्किंग साधनांचा उपयोग केला पाहिजे ज्यामध्ये त्यांना आपल्या कार्यक्षेत्राच्या विस्तारासाठी चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे. विद्यार्थी यावेळी आपल्या क्षमतांचे उत्तम प्रदर्शन ही करतील. या वेळी नवग्रह स्तोत्र वाचन फायद्याचे राहील. या काळात तुम्हाला मेल, इंटरनेट इत्यादी माध्यमाने काही महत्वाचे कागदपत्र प्राप्त होऊ शकतात ज्याची तुम्ही बर्याच काळापासून वाट पाहत होते. तुमच्या कार्य स्थळी अचानक तुम्हाला काही महत्वपूर्ण भूमिका आणि जबाबदाऱ्यांना सांभाळण्यासाठी सांगितले जाऊ शकते. ज्यामध्ये तुम्ही आनंदी ही असाल आणि थोडे तणावात ही राहू शकतात. तसेच हा कालावधी लहान यात्रांना ही दर्शवतो म्हणून, मौज मस्ती किंवा व्यापाराच्या संबंधित गोष्टींसाठी ही या काळात तुमच्या काही यात्रा होऊ शकतात. **महिलांना**: सप्ताहाच्या सुरवातीमध्ये ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, तुम्ही या काळात आपल्या भाऊ बहीण, मित्र आणि नातेवाईकां सोबत चांगल्या योगाचा आनंद घ्याल. धनप्राप्ती होण्याचा ही हा कालावधी आहे. **शुभ दिनांक** :२२,२४

## शुभवार्ता मिळण्याची शक्यता



**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही वेळ चांगली सिद्ध होऊ शकते कारण, त्यांना या संबंधित काही शुभ वार्ता मिळायची शक्यता आहे. सप्ताहाच्या मध्यात काळात तुम्ही थोडे घाबरलेले आणि चिंतीत दिसू शकतात कारण, तुम्ही स्वतःच्या बाबतीत विचार करण्याऐवजी कुठल्यातरी वेगळ्या गोष्टीच्या विचारात राहू शकतात की, लोक तुमच्या बाबतीत काय विचार ठेवतात आणि याचा सरळ प्रभाव तुमच्या आत्मविश्वासावर पडेल. ज्यामुळे तुम्ही कार्यस्थळी आपले उत्तम प्रदर्शन करू शकणार नाहीत. म्हणून, आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा आणि आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा आणि या गोष्टीकडे अजाबात लक्ष देऊ नका की, इतर लोक तुमच्या बाबतीत काय विचार करत आहे असे केल्यास तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुमचे प्रदर्शन ही उत्तम होईल. **महिलांना**: घरातील वातवरण आनंदी राहील. मनात योजलेले काही कार्य या वेळी जमून येईल जीवनसाथी आपणास सरप्राईज देऊ शकतो. मुलांना दमदाटी करू नका. त्यांची समस्या प्रेमाने सोडवण्यासाठी त्यांना मदत करा. **शुभ दिनांक** : २२,२३

## कामे मार्गी लागतील



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हा कलावधी हे दर्शविते की आपण आपल्या व्यवसायातील कार्यक्षेत्रात पुढे जायचे असल्यास, आपल्या कौशल्यांचा लाभ घेण्यासाठी आणि नवीन काहीतरी शिकण्यासाठी हा उत्कृष्ट काळ आहे. आठवड्याच्या सुरूवात या राशीच्या जातकांसाठी खूप चागली चांगली राहणार आहे, काही गोष्टी आपणास सहज मिळतील आणि जे सहज मिळणार नाही ते आपण परिश्रमाने मिळवू शकाल. या वेळी आपण आपल्या कोणत्याही गुरु किंवा सल्लागारांना भेटू शकता ज्यांच्याशी आपण कल्पनांची देवाणघेवाण करू शकता, त्यांच्याशी सल्लामसलत करू शकता आणि आपल्या जीवनात एक चांगले बदल आणू शकता. एकूणच आपल्या आठवड्यासाठी ही खूप चांगली सुरुवात होणार आहे. आपल्याला पैसा, कैरियर आणि पद-प्रतिष्ठाच्या यासर्व गोष्टी अचानक मिळू शकतील. **महिलांना**: दररोज सकाळी गणपतीची पूजा करा. हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. विशेषता पाणी उकळून घ्या. रात्रीचा आहार मोजकाच घ्या. **शुभ दिनांक** : १८,२३

# पांढऱ्या कांद्याची काढणी लांबणीवर

## • फेब्रुवारीत बाजारात दाखल होण्याची शक्यता



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळा परिसरात उत्पादित होणाऱ्या प्रसिद्ध पांढऱ्या कांद्याच्या काढणीला यंदा उशीर झाला आहे. साधारणपणे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत सुरू होणारी कांदा काढणी यावर्षी पावसाच्या लांबलेल्या कालावधीमुळे रखडली आहे. परिणामी, पांढरा कांदा फेब्रुवारी महिन्यात बाजारात दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दरवर्षी कापणीची कामे पूर्ण झाल्यानंतर आठ ते दहा दिवसांत पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते. मात्र, यंदा पावसाने जिल्ह्यात जास्त काळ मुक्काम केल्याने नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणारी कांदा लागवड नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात करावी लागली. त्यामुळे कांद्याची लागवड सुमारे पंधरा दिवस उशिरा झाली. या विलंबाचा परिणाम कांदा काढणीवरही झाला असून, जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात, २६ जानेवारीनंतर कांदा काढणीला सुरुवात होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. त्यानंतर कांद्याच्या माळी तयार करणे व बाजारात पाठविण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याने फेब्रुवारीतच हा कांदा बाजारात दाखल होईल, असे सांगण्यात आले.

> अलिबाग तालुक्यातील कार्ले परिसरातील पांढऱ्या कांद्याला चव आणि गुणधर्मांमुळे विशेष मागणी असते. रायगड जिल्ह्यातील स्थानिक बाजारपेठांसह रत्नागिरी, नवी मुंबई, वाशी, मुंबई आणि पुणे येथून या कांद्याला मोठ्या प्रमाणात मागणी केली जाते. यंदा पांढरा कांदा बाजारात सुमारे पंधरा दिवस उशिरा दाखल होणार आहे.
>
> – सतीश म्हात्रे, पांढरा कांदा उत्पादक

## नवीमुंबई येथे अमली पदार्थविरोधी शपथ

**पनवेल:** राष्ट्रीययुवादिनाचे औचित्य साधत नवी मुंबई पोलिस आयुक्त कार्यालयात अमली पदार्थविरोधी शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय यनपुरे, पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांच्यासह आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी नशामुक्त भारत या संकल्पनेला बळ देण्यासाठी उपस्थितांच्या वतीने, समाजातून व्यसनमुक्त समाज घडवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तरुणाईने नशेपासून दूर राहून सशक्त , सुरक्षित व उज्ज्वल भारत घडवावा, असा ठाम संदेश या वेळी देण्यात आला.

# बायोचारनिर्मितीचे प्रशिक्षण शिबीर



**। उरण । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने बेलोंडेखार या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी बायोचारनिर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये आर. टी. नारनवर (तालुका कृषी अधिकारी) ए. डी. बुरकुल (उप कृषी अधिकारी) सहाय्यक कृषी अधिकारी, विभावरी चव्हाण, नमिता वाकळे, दत्ताराम गोंधळी, तसेच गटाने शेती करणाऱ्या महिला शेतकरी उपस्थित होत्या. 'बायोचार : काळाची गरज' या प्रशिक्षणाचे सहाय्यक कृषी अधिकारी विभावरी चव्हाण व नमिता वाकळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बायोचाराची सविस्तर माहिती दिली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले.

# शूटिंगबॉलला भविष्यात चांगले दिवस येतील

## • चंद्रकांत मोकल यांचे प्रतिप्रादन



**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

खारेपाटातील शूटिंगबॉलचे आजी-माजी खेळाडू शूटिंगबॉलशी एकनिष्ठ राहून हा गेम अविरत राहण्यासाठी मोठी मेहनत घेत आहेत, त्यांची मेहनत वाया जाणार नाही, मी पण या खेळावर जीवापाड प्रेम करणारा एक कार्यकर्ता आहे. राज्यतील शूटिंगबॉलचे अनेक गुणी खेळाडू या खेळातून आपले भविष्य उज्वल व्हावे यासाठी कष्ट घेत आहेत ते वाखाणण्यासारखे आहे. या कष्टाचे नक्की चीज होईल, असा विश्वास क्रीडा संघटक वऑल इंडिया पॅसेंजर्स असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी व्यक्त केला. मॉडेल संघ रांजणखार, ता. अलिबाग यांच्या वतीने अयोजित ६७ व्या राज्यस्तरीय शूटिंगबॉल स्पर्धेच्या अध्यक्ष पदावरून ते उपस्थितांना संबोधित होते. त्यांनी स्पर्धेत सहभागी राज्यातील सर्व शुटींगबॉल संघांना सुयश चिंतुन विजयासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन पार पडले.

यावेळी चिंचवली ग्रामपंचायत सदस्य राजेश विद्याधर म्हात्रे, दिप्ती पाटील, मॉडेल संघ रांजणखारचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, पदाधिकारी रमाकांत पाटील, व्हि.एस. पाटील, मंगेश पाटील, दिपक रमेश म्हात्रे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र म्हात्रे, अ‍ॅड. भालचंद्र पाटील, गणेश म्हात्रे, शंकर मोकल, अजित मोकल, चंद्रशेखर म्हात्रे व मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी कुलाबा रायगड शूटिंगबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मंगेश पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर संघाचे कर्णधार सतीश म्हात्रे यांनी आभार मानले. खारेपाटातील स्थानिक संघासहीत राज्यातील अनेक नामवंत संघ स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

## पेंढा ठेवण्याचा माच होतोय लुप्त

**पाताळगंगा** : रायगड भाताचे कोठारे म्हणून प्रचलित असून सध्या शेतीला औद्योगिक करणांचे ग्रहण लागले असल्यामुळे भात शेती कमी होत चालली आहे. शेती अल्प असल्यामुळे पारंपरिक पध्दतीने शेती न करता तांत्रिक ने शेती केली जाते. परिणामी शेतकऱ्यांकडील गुरे कमी होत चालल्यामुळे पेंढा साठविण्यासाठी लाकडी माच लुप्त होत चालला आहे. पुर्वी शेती ही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतक-याजवळ गुरे ही खूप होती. मात्र गेल्या काही वर्षात औद्योगिकरण तसेच शेतीचे विभाजन झाल्यामुळे शेती ही तुकड्यामध्ये विभागली गेली. त्यातच मुंबई सारख्या धनीकांनी आपली जमिन घेवून त्या ठिकाणी बंगले बांधले गेले आहेत. परिणामी लागवडीचे क्षेत्र कमी होत चालले आहे.

# चोंढी येथे रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा वाहतूक पोलिसांकडून दरवर्षी जानेवारी महिन्यात विशेष रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात येतो. याचा उद्देश वाहन चालवताना वाहनचालक व त्यांचे मालक वाहतूक नियमांचे पालन करत आपली व इतरांची काळजी घ्यावी, जेणेकरून अपघात होऊन जीवितहानी व वित्तहानी होऊ नये यासाठी सदैव जागरूक राहावे, असा आहे.

त्या अनुषंघाने मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या वाहतूक पोलीस विभाग व शुभम पीपीसी, पीएनटी लिमिटेड कंपनीतर्फे बुधवारी (दि.१४ ) जानेवारी रोजी चोंढी नाक्यावर रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या वाहतूक विभागाचे किशोर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी दुचाकी वाहन चालवताना कटाक्षाने व सदैव हेल्मेटचा उपयोग करीत आपला प्रवास सुरक्षित करणाऱ्या चालकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच चारचाकी वाहन चालवताना नेहमीच सीटबेल्ट लावणाऱ्या चालक व मालकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित वाहनचालकांना व त्यांच्या मालकांना नेहमीच हेल्मेट व सीटबेल्टच्या वापरासोबत वाहतूक नियमांचे पालन करावे, याबाबत सूचना देण्यात आल्या.

याप्रसंगी चोंढी नाक्यावर रिक्षा चालक-मालकांना वाहतुकीचे नियम व नियम मोडल्यास होणाऱ्या दंडाबाबत सविस्तर माहिती दिली. प्रमाणापेक्षा जास्त प्रवासी बसवून वाहतूक न करणे बसवणे, अति वेगाने वाहन न चालवणे, रहदारीचे नियम पाळणे, प्रत्येकाने ड्रेस कोड वापरण्या बाबत सूचना देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाच्या वेळी बादल नायक, दिपक तिवारी, रानोज डे, मुन्ना, सुजित झुंजारराव, आदित्य असे अनेक अधिकारी व कर्मचारी व त्यांचे मालक उपस्थित होते.

# जिजाऊंच्या राजवाड्याला मिळणार गतवैभव

**। महाड । प्रतिनिधी ।**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांना जन्म देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पाचाड येथील राजवाड्याला आता गतवैभव प्राप्त होणार आहे. मुंबईच्या पुरातत्व सर्वेक्षण मंडळाच्या वतीने राजवाड्याच्या संवर्धनाची कामे पूर्ण केली जाणार आहेत. यासाठी मंत्री भरत गोगावले यांच्या माध्यमातून सरपंच, माजी सरपंच राजेंद्र खातू यांनी प्रयत्न केले आहेत.

**अशी होणार संवर्धनाची कामे**

पाचाड येथील राजवाडा, तसेच परिसरातील संवर्धनांतर्गत मंजूर कामांमध्ये तटबंदीवर वाढलेल्या गवताचे मुळापासून निर्मूलन करणे, काही जागी नाहीसे झालेले विशिष्ट आकाराचे प्रस्तर, दगड प्राप्त पुराव्यांनुसार बनवून बसवणे. जलस्रोताचे संवर्धन आणि पुनर्स्थापन करणे. मुख्य प्रवेशद्वार ते जिजाऊ निवासस्थान यादरम्यान दगडी रस्ता उपलब्ध करणे, ठिकठिकाणी ऐतिहासिक स्थळाविषयी थोडक्यात माहिती फलक बसवणे, दृकश्राव्य माहिती उपलब्ध करणे, शिवभक्त पर्यटकांसाठी जलपेय सुविधा उपलब्ध करून देणे आधी बाबींचा समावेश आहे. यासंदर्भात केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे महाड-रायगडचे प्रकल्पप्रमुख दिवेकर यांनी या संवर्धनाच्या कामाला मंजुरी मिळाल्याच्या माहितीला दुजोरा दिला असून, ही कामे तातडीने हाती घेण्यातून पूर्ण केली जातील, असे सांगितले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक १) लता अनंता भोईर २) दिपक अनंता भोईर ३) अभिजीत अनंता भोईर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं/प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ८४/१/अ/५ | ५-८०-०० यापैकी जमिन मालक यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र २-९०-०० | ५८-०० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नांद घ्यावी.

दिनांक : १८/०१/२०२६

**अ‍ॅड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या मालकांकडून खरेदी करण्याचा आमच्या अशिलांचा मानस आहे व त्या संबंधी उभयतांत बोलणी सुरु आहेत,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कुरुळ | ४८/१६ | ०-९६-०० पो.ख. ०-१७-९० १-१३-०० | १.४४ |

पैकी १) श्री. पांडुरंग तुकाराम दळी व २) सौ. सुजाता पांडुरंग दळी यांच्या मालकीची ० हेक्टर ९६ आर एवढी मिळकत

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १८/०१/२०२६

**अ‍ॅड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल श्री.प्रभाकर नथु शेळके, रा. किरवली, ता. कर्जत, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - भिसेगाव, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नावं | स.न/ हि नं | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| किसनलाल अमरसी राठोड | ५२/२ | ००-५८-२० पो.ख००-०६-०० ००-६४-२० | ० रू ३० पैसे |
| सुरेश अमरसी राठोड | ५२/३ | ००-२४-०० | ० रू १६ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्यावे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसावे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून सदरहू येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १७/०१/२०२६

सही/-
**अ‍ॅड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री.रूपेश रविंद्र मांडे श्री. विपूल नविनचंद्र शाह श्री. मिलन प्रविणचंद्रा शाह रा. हनुमान मंदिरा जवळ, दहिगाव पोस्ट वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दत्तात्रय बारकु पाटील श्री राजीव बापू जोशी श्री.सुनील बापू जोशी रा.महात्मा फुले मार्ग, धुत पापेश्वर कारखन्या मागे, १३०२ दुर्वांकुर पनवेल ता. पनवेल जि.रायगड ४१०२०६ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कडाव तालुका. कर्जत जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं(प्लॉट) | क्षेत्रफळ (हे-आर- चौ-मी) शेती | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९३ | ६/ब/२ | २-४७-९० पो.ख ०-३३-६० एकुण क्षेत्र २-८१-५० | १.७१ |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्भूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : १८/०१/२०२६

अशिला तर्फे अ‍ॅडव्होकेट
**अ‍ॅड हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा युको बॅक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हृषीकेश दत्तात्रय पवार यांचेकडून विकसनासाठी घेण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड | ३२/१/ब/५ | २-८०-०० | २८.०० |

अलिबाग,
दि. १७/०९/२०२६

सही/-
**अ‍ॅड. महेश सुहास म्हात्रे**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No.1.Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics,
Alibag Raigad

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतींचे विद्यमान मालक यांच्यामध्ये साठेकरार करण्यात आलेला आहे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता.अलिबाग. | ३२७ | ०-३४-२० पो.ख.०-०३-३० एकूण०-३७-५० | १०.११ | १.श्री.चंद्रकांत दत्तात्रेय ठाकुर, २. योजना राम काठे, ३.संध्या कामळाकर नाईक, ४.श्रीशा उर्फ निलम गणेश पाटील ५. मिनल मोहन ठाकूर, ६. मानसी श्रेयस पाटील, ७. महती मोहन ठाकूर, |
| वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी ०-१८-७५ हे.आर. ही जमिन मिळकत या साठेकराराचा विषय आहे. | | | | |

संदर्भित मिळकती पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन ७ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १७/०१/२०२६

**अ‍ॅड. किशोर म.हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

जा.क्र.नोंदणी शाखा/१३५/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
अलिबाग जि.रायगड
दि.१६/०१/२०२६

### चौकशीची जाहीर नोटीस
**नियम ७ अ प्रमाणे**

अर्ज क्रमांक : ०३/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांकः “ NIHIRA CHARITABLE TURST”
.....बाबत

Mrs. Diptee Sushant patil ...अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेतः-

(१)वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत- (वर्णन) रोख रक्कम १०००/-रूपये
(ब) स्थावर मिळकत -(वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशी रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६.०१.२०२६ रोजी दिली.

सही/-
**प्र.अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बोअरवेल, विहीरीसाठी** इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **शुभमूर्हुत विवाह मंडळ** अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवंराची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **प्रथम, पुर्नविवाह** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **रिसॉर्टमध्ये कामासाठी एका** जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण -सासवणे, संपर्क- +९१९६०७१०२३५७
- **प्रा.लि. कंपनीसाठी फ्लॅट,** बंगलो भाड्याने व विकत पाहिजे. प्रत्यक्ष मालकांनी फोन करणे. ९८३४९९१२३६
- **नवीन बिल्डींग मधील १** BHK फ्लॅट भाड्याने व विकत देणे आहे. मो. ९९२३६०५४४६
- **1st floor** ८५० sqft 4 bed२४ तास पाणी, पार्किंग, भाड्याने आणि दोन दुकाने १०X१०(५०००/-महिना भाडे) १०X५ (४०००/- महिना भाडे) भाडेतत्वावर देणे आहे. संपर्क : ९४२३३७७४२२
- **ऑफिस कामाकरिता अनुभवी** कॉम्प्युटर ऑपरेटर , ऑफिस असिस्टंट मुलगा व रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण – ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT. संपर्क – सौ.रेश्मा पाटील पत्ता– अलिबाग ७०८३३९९५३३ वेळ – ११.०० ते५.००
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : संकल्पपूर्तीसाठी अनुभवींचा सल्ला घ्या. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृषभ** : आर्थिक निर्णय घाईगडबडीत घेऊ नका. विरोधकांच्या कारवायांबाबत सावध रहावं. संयम बाळगावा.
- **मिथुन** : मतभेद वा गैरसमज दूर होतील. गुंतवणुकीचा विचार तुर्तास दूर ठेवा. आर्थिक स्थिती बरी राहील.
- **कर्क** : कौटुंबिक बाबतीत मनस्ताप संभवतो. जबाबदाऱ्या योग्य रितीनं पूर्ण कराव्या. प्रवास शक्यतो टाळा.
- **सिंह** : कामातील सातत्य गरजेचे ठरेल. उत्साहवर्धक घटना घडतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **कन्या** : प्रलंबित कामांना गती येईल. मोठ्या व्यवहारात तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **तूळ** : कार्याबाबत उत्साह राहील. मित्रमंडळीत आर्थिक व्यवहार टाळावेत. पित्ताच्या विकारात काळजी घ्या.
- **वृश्चिक** : कौटुंबिक मतभेद त्रासदायक ठरतील. गुंतवणुकीत अनुकूलता राहील. थोरामोठ्यांचा सल्ला घ्यावा.
- **धनु** : कोणावर टीका करणं टाळावं. वेळ आणि कामाचं योग्य नियोजन करावं. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **मकर** : आत्मविश्वासपूर्वक वाटचाल सुरू राहील. कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या येतील. बाकी चिंता नको.
- **कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. नव्या कामांबाबत उत्साह राहील. स्थावर बाबतीत दिलासा मिळेल.
- **मीन** : मनाजोग्या संधी प्राप्त होतील. व्यक्तिगत बाबतीत कमी बोलावं. प्रियजनांचा सहवास लाभणार आहे.

मेक अप मंत्रा

## खोट्या पापण्या की लॅश एक्सटेंशन?

बरेचदा आपल्याला कृत्रिम पापण्यांचा आधार घ्यावा लागतो. या खोट्या पापण्या आपल्या पापण्यांवर चिकटवता येतात. दुसरा पर्याय म्हणजे आयलॅश एक्सटेंशन. यात नैसर्गिक पापण्यांवर एक-एक पापणी चिकटवून त्यांची लांबी वाढवली जाते. असं असताना खोट्या पापण्या चिकटवायच्या की आयलॅश एक्सटेंशनचा पर्याय निवडायचा या प्रश्नाचं जाणून घेऊ या.

✲ काही दिवसांच्या सरावाने खोट्या पापण्या चिकटवण्याची कला तुमच्या अंगवळणी पडेल. दुसरीकडे आयलॅश एक्सटेंशनसाठी एखाद्या व्यावसायिकाची मदत घ्यावी लागेल. त्या तुमच्या नैसर्गिक पापण्यांवर एक-एक करुन चिकटवल्या जातात. खोट्या पापण्या एका मिनिटात चिकटतात तर लॅश एक्सटेंशनच्या प्रक्रियेला एक ते दोन तास लागू शकतात. ✲ खोट्या पापण्या अगदी सहजपणे उपलब्ध आहेत. मेक अप स्टोअर किंवा ई कॉमर्स वेबसाईटवरून तुम्हाला ही खरेदी करता येईल. त्यांच्या किंमतीही फार नसतात. पण मस्कारा वापरत असाल तर तो काढताना नाजूक पापण्या तुटण्याची भीती असते. (क्रमश:)

## १८ जानेवारी

दिनविशेष

**१९६७** : क्रांतिकारक, कृषीतज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचं निधन.
**२०१३** : वाहतुकीला अडथळा आणणारा कोणताही पुतळा उभारण्याची अथवा बांधकामाची परवानगी न देण्याचे केंद्राचे राज्य सरकारांना निर्देश.
**२०१४** : ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर यांची 'द वर्ल्ड पोस्ट' या ऑनलाइन संकेतस्थळाच्या संपादकीय मंडळावर नियुक्ती.
**२०१५** : अन्नसुरक्षा अभियानात सरसकट सर्व कुटुंबांचा समावेश करण्याचा आघाडी सरकारचा निर्णय भाजप सरकारनं रद्द केला.

कोण होणार?

## व्हा युआय, युएक्स तज्ज्ञ

वेबसाईट तयार करताना बरीच मेहनत हे काम डिझायनर्स करतात. त्यांना 'यूआय' किंवा 'यूएक्स' डिझायनर्स असं म्हणतात. ही मंडळी ॲप्स आणि साईट्स तयार करतात. या क्षेत्रात सध्या खूप संधी आहेत.

यूआय डिझायनर्स वेबसाईट्स तसंच ॲप्सच्या रंगरुपावर लक्ष केंद्रित करतात. यासोबतच ग्राफिक्स, रंगसंगती आणि त्याचा लोकांवर पडणारा प्रभाव याचाही विचार त्यांना करावा लागतो तर यूएक्स डिझाइनची उपयुक्तता, अनुभव आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने काम करतात. यासाठी त्यांना लोकांचा दृष्टिकोन, आवड जाणून घ्यावी लागते. यात कारकिर्द घडवायची असेल तर यूआय आणि यूएक्स किंवा इंटरॅक्शन डिझाइनमध्ये प्राविण्य मिळवून डिझायनिंगमध्ये पदवी मिळवू शकता. त्यासाठी तुम्हाला 'ॲडोब फोटोशॉप', 'कोरल ड्रॉ', 'इनडिझाइन'सारख्या सॉफ्टवेअरची माहिती असायला हवी. यासोबतच एचटीएमएल, एक्सएमएल, सीएसएस, जावाचं ज्ञान असेल तर खूपच छान. नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ डिझाइन,अहमदाबाद, इंडस्ट्रीअल डिझाइन सेंटर, मुंबई, एनआयएफटी, दिल्ली, यासारख्या संस्थांमधून तुम्ही याचं शिक्षण घेऊ शकता.

आरोग्यमंत्र

## खा ओला हरभरा

सध्या बाजारात हिरवे हरभरे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. ते प्रथिने, कार्बोहायड्रेट, फायबर, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे यांसारख्या पोषक तत्त्वांचा चांगला स्रोत असतात. ओले हरभरे खाल्ल्यामुळे हिवाळ्यात शरीराची कमी होणारी प्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे सर्दी, ताप यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होतो. हिरवा हरभरा शरीराचे वजन वाढवतो. यामध्ये असणारे फोलेट मूड स्विंग, चिंता आणि नैराश्य टाळते.



✲ हिरवे हरभरे फायबरचा चांगला स्रोत आहे. फायबरच्या कमतरतेमुळे पचनक्रिया बिघडते आणि चरबी झपाट्याने वाढू लागते. फायबरमुळे बद्धकोष्ठता आणि पचनाशी संबंधित समस्या दूर होतात आणि चरबी लवकर कमी होते. ✲ हरभऱ्याचे सेवन केल्याने शरीरात ब्युटीरेट नावाचे संयुग तयार होते जे कर्करोगाच्या पेशींचा वाढता धोका कमी करण्यास मदत करते. यासोबतच हरभऱ्यामधील फोलेट आणि व्हिटॅमिन बी ९ मूड स्विंग्सवर प्रभाव दाखवतात. यासोबतच ते चिंता आणि नैराश्याशी लढण्यास मदत करते. ✲ हरभऱ्याच्या सेवनाने हृदय निरोगी राहते. यामधील मॅग्नेशियम आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रणात ठेवते. यासोबतच यातील प्रोटीनमुळे केसांच्या वाढीवरही उत्तम परिणाम होतो. हे केसांची चमक टिकवून ठेवते आणि केस गळणे टाळते. हरभरा, हिरव्या भाज्या मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहेत.

## पंचांग

**रविवार, १८ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. १५, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : हर्षण,
सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२१

## फॉरवर्डस

**जिसें अपनीं धून मिल ग़यी उसें...**

**दुनियाँ क़ी तालियाँ नहीं चाहियें...!**

## वेगळ्या वाटा

नॅसकॉमच्या अहवालानुसार देशात १०० पेक्षा जास्त कंपन्या गेम डेव्हलपमेंटशी संबंधित आहेत. युवा मंडळी गेमिंगच्या क्षेत्रात करीअरच्या वाटा शोधू शकतात.


**गेम डिझायनर**

गेमची संकल्पना ही गेम डिझायनरची असते. नियम ठरवण्यापासून गेमचं कथानक गुंफण्यापर्यंतची अनेक कामं ही मंडळी करतात. गेम डिझायनिंगचं प्रशिक्षण घेतल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात उडी घेऊ शकता. कॉम्प्युटर इंजिनिअर्स किंवा कॉम्प्युटर सायन्समध्ये बी टेक करूनही गेम डिझायनर म्हणून काम करता येतं. (क्रमश:)

भटकंती

## दिल्ली परिसरात फिरायचंय?

दोस्तांनो, देशाची राजधानी असणाऱ्या दिल्लीबाबत तुम्हालाही आकर्षण वाटत असेल. त्यादृष्टीने दिल्लीला भेट देतानाच परिसरात फिरण्याची योजना असेल तर बाईक ट्रिपचा आनंद लुटू शकता. दिल्लीच्या आसपास असणाऱ्या ठिकाणांना भेटी देऊ शकता. मित्रमंडळींची गँग सोबत असेल तर बाईक काढा आणि या गुलाबी थंडीत फिरायला बाहेर पडा.



✲ तुम्ही गडमुक्तेश्वरला जाऊ शकता. राष्ट्रीय महामार्ग २४ वरून हापुडच्या दिशेने चला. हा रस्ता सुस्थितीत आहे. शिवाय या भागात वाहतुकीची कोंडीही होत नाही. या रस्त्यावर खाण्यापिण्याची बरीच ठिकाणं आहेत. इथल्या धाब्यावर पंजाबी जेवणाचा आनंद लुटता येईल.

✲ तुम्ही अलवरला निघू शकता. इथला रस्ता फार चांगला नाही. त्यामुळे बाईक सांभाळून चालवा. अलवरपासून सवाई माधोपूर आणि पुढे उदयपूरला जाता येईल.

✲ दिल्लीहून जयपूरला जाता येईल. हा रस्ता थोडा खराब आहे. या रस्त्यावर पंजाबी आणि राजस्थानी जेवण मिळेल. सीकर रोड परिसरात चांगले धाबे आहेत. इथे स्वादिष्ट भोजन करता येईल. जयपूरला बरीच खरेदी करता येईल. या परिसरात बरीच पर्यटनस्थळंही आहेत. तुम्ही गडकिल्ल्यांनाही भेटी देऊ शकता.

खेचाखेची

## काय करणार?

एटीएम मधून पैसे काढल्यानंतर जे लोक पैसे मोजून बघतात...
.
त्यांना माझा एक साधा प्रश्न आहे...
.
.
.
.
पैसे कमी निघाले तरी तुम्ही काय करणार आहात?

## वेगळं काही

पृथ्वीवरच्या सर्वात धोकादायक ठिकाणांमध्ये 'बर्म्युडा ट्रँगल' आणि 'एरिया ५१' चं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. 'बर्म्युडा ट्रँगल' भागात विमानं आणि जहाजं गायब होतात. पण अमेरिकेतलं 'नेवाडा ट्रँगल' अधिक धोकादायक आहे. या भागावरून गेलेलं एकही विमान आजवर परतलेलं नाही. एका अहवालानुसार गेल्या ६० वर्षांमध्ये इथून दोन हजारपेक्षा जास्त विमानं गायब झाली आहेत. त्यातले प्रवासी तसंच कर्मचाऱ्यांचा काहीच पत्ता लागलेला नाही. 'नेवाडा ट्रँगल' परिसरातली विशिष्ट शक्ती विमानांना आपल्याकडे खेचून घेते असं म्हटलं जातं. पण ही शक्ती कोणती? यामागचं शास्त्रीय कारण काय? याचं गुपित शास्त्रज्ञांना उलगडता आलेलं नाही. (क्रमश:)

स्टाईल स्टेटमेंट

## वापरा ट्रेंडी बॉटम्स



मैत्रिणींनो, सध्या विविध प्रकारच्या बॉटम्सचा ट्रेंड आहे. एकापेक्षा एक हटके बॉटम्स खूप छान दिसतात. यामुळे एकच कुर्ती वेगवेगळ्या स्टाईलने कॅरी करता येते. ऑफिस असो किंवा लग्न समारंभ, या ट्रेंडी बॉटम्स तुम्ही कुठेही कॅरी करू शकता. कुर्तीवर घालता येण्यासारखे बॉटम्सचे विविध पर्याय...

✲ सध्या धोती पँटची क्रेझ आहे. कुर्तीला साजेशी धोती पँट शिवून घेता येईल. तयार धोती पँटचा पर्यायही आहे. या पँटवर लाँग किंवा शॉर्ट कुर्ती घालता येईल. यावर अनारकली स्टाईल शॉर्ट कुर्ती खूप छान दिसेल. ✲ ट्राउजर स्टाईल पँटचा ऑप्शनही आहे. अशा पँटमध्ये तुम्हाला खूप आरामदायी वाटतं. आपली आवड आणि कंफर्टचा विचार करून ट्राउजर पँट शिवून घेता येतील. ✲ स्टायलिश आणि ट्रॅडिशनल लूकसाठी कुर्तीसोबत शरारा घालता येईल. यावर लाँग किंवा शॉर्ट यापैकी कोणतीही कुर्ती घालता येईल. ✲ पलाझोचा ट्रेंडही जोरात आहे. डिझायनर कुर्त्यावर प्लेन पलाझो घालता येईल. फॉर्मलवेअर म्हणून पलाझो आणि कुर्ती कॅरी करता येईल.

## सुडोकू ५५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | १ | | | ६ | | | ३ |
| | ५ | | १ | ३ | | | ६ | |
| ३ | | ६ | | | २ | | | ५ |
| १ | २ | | ३ | ४ | | ६ | | ७ |
| | | ३ | | | ५ | १ | | |
| ५ | | | ७ | ६ | | | ९ | २ |
| | | ४ | २ | | | ७ | | |
| ६ | | | | | | ५ | | ९ |
| | | ५ | | | ३ | | | १ |

**टीप -**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५ | २ | ६ | ४ | १ | ९ | ७ | ८ |
| ९ | ७ | ८ | ५ | ३ | २ | ४ | १ | ५ |
| ४ | ६ | १ | ९ | ८ | ७ | २ | ५ | ३ |
| ७ | ३ | ६ | २ | १ | ९ | ८ | ४ | ५ |
| २ | १ | ४ | ३ | ५ | ८ | ७ | ६ | ९ |
| ५ | ८ | ९ | ७ | ६ | ४ | ३ | २ | १ |
| ६ | ९ | ३ | ४ | ७ | ५ | १ | ८ | २ |
| ८ | ४ | ५ | १ | २ | ३ | ६ | ९ | ७ |
| १ | २ | ७ | ८ | ९ | ३ | ५ | ३ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक ५५

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | | ■ | ६ | ■ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | १० | | ■ | | ■ | ११ | | १२ | | ■ |
| | ■ | १३ | | | ■ | १४ | | १५ | | ■ | | ■ | १६ |
| १७ | १८ | | | ■ | १९ | | ■ | | ■ | २० | | | |
| ■ | २१ | | ■ | २२ | | ■ | २३ | | २४ | ■ | | ■ | |
| २५ | | | | | | २६ | | ■ | २७ | | | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | २८ | | २९ | | ■ | | ■ | ३० |
| ■ | ३१ | | | ■ | ३२ | | ■ | | ■ | ३३ | ■ | ३४ | |
| ३५ | | | ■ | ३६ | | | ३७ | ■ | ३८ | | ३९ | ■ | |
| ■ | | ■ | ४० | ■ | | ■ | ४१ | | | ■ | ४२ | ४३ | |
| ४४ | | ४५ | | ■ | ४६ | ४७ | | ■ | ४८ | ४९ | ■ | | ■ |
| | ■ | ५० | | ५१ | ■ | | ■ | ५२ | | | | | ५३ |
| ५४ | | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | | ■ | | ■ | ५८ | |
| | ■ | ५९ | | | | | ■ | ६० | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) निष्णांत
४) एक सरपटणारा प्राणी
७) जुगार
८) संताप
९) भरीव नसलेले
११) मुलांचा पुष्कळ भरणा असलेले घर
१३) दशानन
१४) घटाफोट
१७) मुस्लीमांचा एक सण
१९) दुसरा, पंख
२०) बिल्डिंग (म)
२१) फणसातील गर
२२) अजगर
२३) च्या सह
२५) ✲✲✲✲ ✲✲ ✲✲ ठिणगी ठिणगी वाहू दे
२७) राज्याचा/ देशाचा कारभार पाहणारे मंत्रीमंडळ
२८) कारखान्यातील मजूर
३१) अडत्या
३२) अवघा, संपूर्ण
३४) दुश्मनी
३५) लेखणी
३६) अतिशय मऊ कापड प्रकार
३८) ओलसर हवा
४१) मिंधा, दीन
४२) अंजन, सुरमा इ.प्रकार
४४) नीच, दुष्ट
४६) घोड्यावरून मारलेली चक्कर
४८) नेम, कटाक्ष, रोकड
५०) कप्पा, खण
५२) सवाद्य मिरवणूक
५४) कैकयीचा पुत्र
५५) संगीतातील लकेर
५७) पुस्तकातील पाठ
५८) सडक, मार्ग
५९) बडबडी, लोचट स्त्री
६०) ताडकन

**उभे शब्द :-**
१) मर्यादा, सीमा
२) वर्ण
३) तपश्चर्येची जागा
४) घोटाळा
५) वेतन
६) मीठ
७) एकटा, सिंचन
१०) पदार्थाचा सूक्ष्म भाग
११) कापडाची वीण, पेटविलेला काकडा
१२) भूत आणि भविष्यामधील काळ
१३) खेळातील पत्त्यातील तीन माणसे
१४) पुष्कळ
१५) सुवर्ण
१६) रक्षण, सांभाळ
१८) सुसर
१९) उद्याच्या नंतरचा दिवस
२२) आज्ञा, हुकूम
२३) मुजऱ्यातील नमस्कार
२४) रेशीमाचे जाडसर कापड
२५) एकोपा
२६) देहू गावचे संत
२९) समुद्राच्या लाटांचा आवाज.
३०) मनाला आलेला थकवा
३१) चिखलाची जमीन
३२) प्रतिवर्षी
३३) चंद्र
३७) कपाळ
३८) प्रतिदिनी
३९) बंगाली भाषेत रुपाया
४०) जुगाराचा एक प्रकार
४३) ✲✲ ✲✲✲ जय किसान
४४) चणे, एक द्विदल धान्य
४५) हाताचा तळवा
४७) सराफाचे दुकान
४९) उकिरडा
५१) ख्रिसमस
५२) अनेक खोल्यांचे अंगण असलेले घर
५३) संरक्षक भिंत
५६) आकाश
५७) मालक.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को | ल्हा | ■ | ग | रा | ■ | गा | व | रा | न | ■ | रा | जी | व |
| र | सा | त | ळा | स | जा | णे | ■ | ब | र | क | त | ■ | ह |
| डा | ■ | ड | ■ | ■ | या | ■ | मा | ता | ■ | पा | ■ | स | न |
| ■ | सा | क | व | ■ | प | खा | ल | ■ | म | ळ | क | ट | ■ |
| पा | व | ■ | प्र | ग | ती | ■ | दा | द | ला | ■ | प | र | त |
| रं | का | ळा | ■ | रु | ■ | प | र | वा | ■ | व | ■ | फ | ट |
| प | र | ■ | क | ड | क | ड | ■ | खा | ल | सा | ■ | ट | ■ |
| रि | ■ | क | र | पा | ■ | सा | ध | ना | ■ | ह | ज | र | त |
| क | पा | ळ | ■ | र | स | द | ■ | ■ | स | त | त | ■ | ल |
| ■ | र | वा | ना | ■ | मो | ■ | बो | क | ड | ■ | न | र | म |
| न | ■ | क | म | त | र | ता | ■ | र | क | बा | ■ | द | ■ |
| र | वा | ळ | ■ | रू | ■ | त | ब | क | ■ | ग | जा | न | न |
| व | स | व | स | ■ | सा | डी | ■ | री | स | ■ | व | ■ | क्ष |
| र | व | ■ | य | म | न | ■ | न | त | म | स्त | क | ■ | त्र |

**मकर संक्रांतीच्या निमित्ताने संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण पहायला मिळत आहे. हा काळ सूर्याने मकर राशीमध्ये प्रवेश करण्याचा... उत्तरायण सुरू होण्याचा. आल्हाददायक वातावरणामुळे हे दिवस हवेहवेसे वाटतात. त्यातच नात्यातील गोडवा वाढवणारी मकर संक्रात सुखाची अनुभूती देऊन जाते. सध्याच्या वाढत्या तणावग्रस्ततेच्या काळात प्रत्येकानेच याची जाण ठेवायला हवी. जगण्यात गोडी निर्माण करायला हवी.**

# जगणे गोड करु या

स्वाती पेशवे

नदीच्या काठाने वसलेल्या आणि विस्तारलेल्या सजीवसृष्टीवर मानवाने संस्कृतीचे सुरम्य घाट बांधले आणि ऐल व पैलतीराकडे बघण्याची नवी दृष्टी दिली. या घाटावर विसावल्यामुळे अनेकांच्या सामान्य जगण्यातही नवे रंग भरले. उगवतीच्या आणि मावळतीच्या छटांनी जगण्याला गहिरेपण दिले. माणसासारखा माणूस पण वेगवेगळ्या विचारांनिशी, जगण्याच्या विविध पद्धतींनीशी पुढे जाऊ लागला. मात्र या सगळ्याच्या मुळाशी असणारी निसर्गाची नाळ मात्र कधीच तुटली नाही. ती तुटू शकतही नाही. असे असताना आजही आपण ऋतूबदलाच्या प्रत्येक टप्प्यावर साजऱ्या होणाऱ्या सणांच्या माध्यमातून ही वीण घट्ट करण्याचा प्रयत्न करतो. उसवू शकणारे टाके नव्याने विणण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात एखादा विरलेला भागही सहज जुळतो आणि वस्त्र एकसंध, तलम राहते. माणसाचा सातत्याने सुरू असणारा हा प्रयत्नच निसर्गनियमांबरोबर जगण्याच्या विविध आयामांशी असणारे आपले बंध जुळवून ठेवतो. हे बंध नसले म्हणून जगणे थांबवणार नसले तरी जगण्याला अर्थही मिळणार नाही, हे खरे. आज प्राधान्याने या अर्थाने मकर संक्रांतीकडे पहावे लागेल.

गोडी वाढवण्यासाठी साखरेचा वापर बराच अलिकडचा... यापेक्षा गुळाचा वापर फार जुना. गूळ, मध, फळांची गोडी वापरुन पदार्थांची चव वाढवणे ही फार जुनी आहारपद्धती. गुळाची उष्ण प्रकृती थंडीमध्ये शरीराला उष्णता देण्यासाठी उत्तमच. त्यामुळे रोजच्या जेवणात पानामध्ये तुपाच्या धारेसह पडणारा गुळाचा खडा आकाराने बराच लहान, पोळीचा लाडू करतानाही गुळाचा वापर तसा मर्यादितच. भाजी-आमटीमध्ये त्याचा वापर चवीपुरता, पण हाच गूळ हिवाळ्यामध्ये मात्र स्वयंपाकात मनसोक्त वापरण्यात येणारा... या दिवसांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या लाडवांमध्ये, मिठायांमध्ये आवर्जून गूळ वापरायचा, कारण घटत्या तापमानामध्ये तो आरोग्यासाठी कारक ठरणारा. असे असताना मकर संक्रांतीच्या वेळी त्याला स्निग्ध तिळाची साथ मिळते आणि वड्या, लाडू, काटेदार हलवा यासारखे रुचकर पदार्थ तयार होतात. विविध प्रांतांमध्ये ते तयार करण्याची कृती वेगळी, साहित्यातही थोडाफार फरक मात्र, सरतेशेवटी प्रयोजन एकच. ते म्हणजे वाढत्या थंडीमध्ये शरीरक्रिया सुरळीत सुरू ठेवणे. तिळगुळाची गोडी सर्वप्रथम आपल्यापर्यंत पोहोचते ती आरोग्यशास्त्राच्या या अभ्यासातून...

त्यातही मकार संक्रांत हा केवळ एक दिवस नाही, तर ही साजऱ्या होणाऱ्या दिवसांची साखळी आहे. भोगी, मकर संक्रांत, त्यानंतरची कर, मग रथसप्तमीपर्यंत घरोघरी पार पडणारे हळदी-कुंकवाचे कार्यक्रम, लहानग्यांचे बोरनहाण, नवदांपत्याचा हलव्याच्या दागिन्यांनी केला जाणारा शृंगार, गुळाच्या रुचकर पोळीचे भरपूर साजूक तुपासवे होणारे सेवन हे सगळे या सणाचे अविभाज्य भाग आहेत. संक्रांतीच्या दिवशी सुगड्यांमध्ये बोरे, उसाचे करवे, गव्हाच्या ओंब्या, विविध प्रकारच्या शेंगा, गाजर आदी ठेवून साजरे होणारे आगळे सांस्कृतिक संमेलन हादेखील महिलावर्गाचा लाडका प्रकार. या दिवशी खास चंद्रकळा नेसायची, शृंगार करायचा, वापरास योग्य ठरेल अशा छोट्या-मोठ्या वस्तूंचे वाण लुटत एकत्र येण्याचा आनंद घ्यायचा... जगणे सहज आणि निरलस होते तेव्हा इतक्या साध्या, सहज पद्धतीने सूर्याच्या मकर राशीतील प्रवासारंभाचा हा महत्त्वाचा टप्पा, उत्तरायणाचा प्रारंभ साजरा केला जायचा. आता दिवस मोठा होणार आणि रात्र लहान... कृषीप्रधान भारतामध्ये शेतीच्या कामासाठी अतिरिक्त वेळ उपलब्ध करुन देणारी ही महत्त्वाची बाब. त्यामुळेही या दिवसाचे मोठे कौतुक.



आजही देशभर आनंदाने मकर संक्रांत साजरी होते. कुठे पतंग महोत्सव, कुठे राजकीय वजन वाढवण्यासाठी आयोजित होणारे हळदी-कुंकवाचे कार्यक्रम, कुठे पानिपत युद्धाचे स्मरण करत धारातीर्थी पडलेल्या मराठ्यांना वाहिल्या जाणाऱ्या श्रद्धांजलीचे कार्यक्रम तर कुठे सूर्याच्या रथाची पूजा करत होणारी आराधना, अंगणात दूध उतू घालवून सूर्यनारायणाला दिले जाणारे अर्घ्य... हे सारे वातावरणातील आनंद आणि नात्यांमधील सौहार्द वाढवणारे आहे. पूर्वी पोस्टाच्या पाकिटातील छोटेखानी कप्प्यातून आपल्यापर्यंत पोहोचणाऱ्या हलव्याच्या, तिळगुळाच्या दाण्यांनी ते वाढायचे; आता मोबाईलवरुन मिळणाऱ्या शुभेच्छांमधून ते वाढते. थोडक्यात, माध्यमांमध्ये काळानुरुप फरक पडला आहे, भावनांमध्ये नाही.

साजरीकरण आणि शिकवण या प्रत्येक सणाच्या दोन बाजू असतात. आत्तापर्यंत आपण साजरीकरणाची चर्चा केली. आता मात्र नाण्याच्या या बाजूचा म्हणजेच शिकवणीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे वाटते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या सणाचे प्रयोजनही नात्यातील प्रेम, आपुलकी वाढवणे हेच आहे. काळाच्या ओघात नात्यांमध्ये अंतर निर्माण होते. काही घटना, प्रसंग माणसाला एकटे पाडतात. काही नाती आघात, समज-गैरसमजांच्या वावटळीत गिरक्या घेतात. काहींना मायेच्या लोकांपेक्षा पैशाची ऊब अधिक प्रिय वाटू लागते. पुढे कालौघात पैसा हे साध्य नसून साधन असल्याचे त्यांच्या लक्षात येतेही... पण तोपर्यंत बराच उशीर झालेला असतो. तेव्हा तो लागू नये, सर्वांना एकत्र येण्याची आणि राहण्याची एक संधी देणारा सण म्हणूनही आज आपण संक्रांतीकडे पहायला हवे.

नात्यांचे बंध आजही आहेत. सख्या भावंडांची संख्या कमी झाली असली तरी आता एखाद्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी सहसा कोणी सोडत नाही. विभक्त कुटुंब व्यवस्थेतील वाढत्या एकटेपणाच्या, तुटलेपणाच्या झळा जवळपास सगळ्यांनाच जाणवत लागल्यामुळे आता पुन्हा एकदा लोक एकमेकांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे, सामाजिक पातळीवरही वर्गमित्र वा मैत्रिणींचे स्नेहमेळावे, जुन्या स्नेह्यांची रियुनियन, गेट टूगेदर असे प्रकार वाढले आहेत. यानिमित्ताने परिचित व्यक्तीच नव्हे, तर त्यांची कुटुंबही एकत्र येतात आणि नवे स्नेहबंध आकार घेतात. काळानुरुप समाजामध्ये बघायला मिळणाऱ्या या समजुतदारपणाचा सत्कार करायला हवा. सध्याच्या विमनस्कता, भीती-चिंता वाढणाऱ्या, काळजीची छाया अधिक गडद करणाऱ्या काळात याची सर्वाधिक आवश्यकता आहे. मात्र या सगळ्याबरोबर जगण्याची गोडी लावणाऱ्या क्षेत्रांची ओळख, तेथील उठबस वाढवणे हेदेखील या दिवसाचे नवे प्रयोजन ठेवायला हवे, असे वाटते. आज प्रत्येकजण आपापल्या कार्यक्षेत्रात रममाण असला तरी त्यात नको इतका बुडालेला दिसतो आहे. कामाचे भूत इतर आनंदवाटा अडवून उभे आहे. आज अनेकांना पठडीबाहेर विचार करायची भीती वाटते, अनवट वाटा तुडवताना जीव धास्तावतो तर पैसा मिळवणे हेच एकमेव उद्दिष्ट ठेवणारे अनेक जीव नको त्या चक्रात फिरत राहून जगण्यातील खरी गोडी हरवून बसतात. अशा सर्वांनीच या सणाच्या निमित्ताने विचार करण्याची गरज आहे, कारण गोडी केवळ पदार्थांमध्ये नव्हे तर जगण्याच्या प्रत्येक सुंदर चौकटीमध्ये सामावलेली असते. आहे त्या स्थितीमध्ये आनंदनिर्मिती करण्याची मूळ प्रेरणा वेळूतून शीळ, प्रवाहातून नाद आणि वाऱ्यातून धून निर्माण करणाऱ्या निसर्गाकडूनच आपल्याला मिळाली आहे. आज मात्र काहींना त्याचा विसर पडताना दिसतो. विविधांगाने जगण्याचा आनंद घेण्यात ते कमी पडताना दिसतात. तेव्हा या मकर संक्रांतीला ताटातील गोडी वाढवण्याबरोबर आयुष्यातील आनंद वाढवण्याचाही प्रयत्न करु या. समस्यांची बजबजपुरी असणाऱ्या सध्याच्या सामाजिक चौकटीमध्ये आपापल्या घरांची चौकट अधिकाधिक शोभिवंत करण्याचा प्रयत्न करु या. संसार तुटणे कायद्याने सहज होण्याच्या या काळात मनाने स्विकारलेले प्रत्येक नाते जपण्याचा आणि फुलवण्याचा प्रयत्न करु या. वाढत्या चंगळवादी जगण्यातून आणि कृत्रिम फुलझाडांनी सजवलेल्या घरातून जुनी खोडे बाहेर न काढता नव्या रोपट्यांबरोबर त्यांचीही नव्याने रुजवण करण्याचा, त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करु या. वाढते अनारोग्य आणि त्यापोटी येणारे आजार थोपवण्यासाठी निसर्गशाळेमध्ये गिरवल्या गेलेल्या पूर्वीच्या धड्यांची उजळणी करु या. कारण हे सर्व शाश्वत आहे. यातून मिळणारा आनंद असीम आहे. इंग्रजी कालगणेनुसार एका वर्षाची सुरूवात होण्याचा तर हिंदू कालगणेनेनुसार एका वर्षाची अखेर होण्याचा हा काळ परस्परांमधील सामंजस्य वाढणारा ठरला तर अनेक प्रश्नांची आपोआप उकल होईल, यात शंका नाही. पानगळीचे दिवस संपून वसंत फुलतो; त्याप्रमाणे जगण्यातील गोडी वाढताच नवी पालवी फुटेल आणि रसनिर्मितीमुळे जाणवणारा रसरशितपणा आपल्यापैकी प्रत्येकाला अनुभवता येईल. यंदाच्या संक्रांतीचे हेच सांगणे आहे. **

# ‘कोंबडीची ‘रवणी’

## कोकणच्या अंगणातील लुप्त होत चाललेला एक सृजन सोहळा!

**पोटधंदा आणि आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य घटक म्हणून कोकणात गावठी कोंबडीकडे पाहिले जात होते. परंतु बदलत्या काळानुसार हे प्रमाण आता फारच अल्प आहे. मात्र, आजही कोकणातील गावागावात कोंबड्यांसोबत जिव्हाळ्याचे नाते जपण्याचा प्रयत्न केला जात आहे.**



धनंजय शेटये

कोकणची लाल माती म्हणजे केवळ निसर्गाचा चमत्कार नव्हे, तर ती मानवी भावना आणि निसर्गचक्र यांचा एक सुंदर मिलाफ आहे. नव्वदीच्या दशकापर्यंत कोकणच्या प्रत्येक घराचे ‘मागले दार’ हे केवळ एक प्रवेशद्वार नसून, ते कौटुंबिक जिव्हाळ्याचे आणि चैतन्याचे एक जिवंत व्यासपीठ होते. पहाटेच्या प्रहरी उमटणारा कोंबड्याचा तेजस्वी आरव हा त्या काळी ग्रामीण भागाचा ‘अलार्म’ असायचा. अंगणात पडणाऱ्या कोवळ्या उन्हात गुबगुबीत पिल्लांची होणारी पळापळ म्हणजे घराच्या समृद्धीचे चालते-बोलते लेणे असायचे. प्रत्येक घराच्या कोपऱ्यात बांबूच्या कामट्यांनी विणलेले ‘घुराडे’ (घुड) असायचे, जे केवळ कोंबड्यांचे निवारास्थान नसून त्या घराच्या वात्सल्याचे उबदार घरटे होते.

**गावठी संस्कृती आणि अर्थकारणाचा कणा**

कोकणी माणसासाठी गावठी कोंबड्यांचे पालन हा निव्वळ व्यवसाय नव्हता, तर तो एक ‘पोटधंदा’ आणि जीवनशैलीचा अविभाज्य भाग होता. घरातील उरले-सुरले अन्न आणि निसर्गातील दाणे टिपून वाढणारा हा ३०-४० कोंबड्यांचा ताफा म्हणजे त्या कुटुंबाची एक छोटीशी ‘बँक’ असायची. एखादा रुबाबदार तुरा असलेला कोंबडा विकला की हातावर खेळणारे चार पैसे गृहिणीच्या गाठीला विसावा द्यायचे, तर ‘तलाग’ (मादी) विक्रीतून मिळणारी जुजबी मदत संसाराचा गाडा ओढायला आधार द्यायची. देवदेवतांचा नवस असो वा ‘राखणी’चा मान, या गावठी कोंबड्यांशिवाय कोकणचे धार्मिक विधी पूर्ण होत नसत.

**‘रवणी’ म्हणजे निसर्गदत्त मातृत्वाचा उत्सव असतो.**

या साऱ्या प्रक्रियेतील सर्वात गूढ आणि विलोभनीय टप्पा म्हणजे ‘रवणी’. ज्याला आज आपण तांत्रिक भाषेत ‘नैसर्गिक उबवणूक’ म्हणतो, तो कोकणी संस्कृतीत एक प्रकारचा ‘सृजन सोहळा’ असायचा. एखादी कोंबडी अंडी घालून पूर्ण झाली की तिच्या शरीरातील ऊब निसर्गतः वाढू लागते. ती अन्नापाण्यावरचा मोह सोडून, जगाचा विसर पडल्यागत एका जागी स्थिर बसते; यालाच कोकणी बोलीत कोंबडी 'कुडूक' होणे म्हणतात. तिचा तो विशिष्ट ‘कुड-कुड’ असा व्याकूळ आवाज आणि डोळ्यांतील अंडी उबवण्याची प्रबळ जिद्द पाहून घरधणिन मोठ्या मायेने ‘रवणी’ची सिद्धता करायची.

**पारंपारिक तंत्र आणि शास्त्रीय कौशल्य यांचा सुंदर मिलाफ पाहावयाला मिळतो.**

रवणी लावणे ही एक सूक्ष्म कला होती. बांबूची पाटी, त्याखाली पसरलेले मऊशार सुके गवत किंवा भाताचा पेंढा यांतून एक उबदार आसन तयार केले जाई. ७ ते १० दिवसांतील ताजी, प्रजननक्षम अंडी निवडून त्या मातेखाली ठेवली जात. २१ दिवसांच्या या खडतर तपश्चर्येत त्या कोंबडीची देखभाल एखाद्या बाळंतिणीप्रमाणे केली जायची. १०-१२ दिवसांनंतर अंधारात दिव्याच्या उजेडात अंडी तपासून 'खादी' (निर्जीव) अंडी बाजूला काढण्याचे ते पारंपारिक ज्ञान आजच्या विज्ञानयुगालाही थक्क करणारे आहे. पावसाळ्याच्या दिवसात अंड्यांचे कवच कडक झाले, तर पिल्लांच्या नाजूक चोचीला ते फोडणे सोपे जावे म्हणून शेवटच्या दिवसांत त्यावर पाण्याचा हबका मारण्याचे ते कसब म्हणजे पिढ्यानपिढ्या चालत आलेला एक जिवंत वारसाच होता.



काळाचा महिमा आणि हरवलेली नाती आजहहे दृश्य समाजात पाहायला मिळते.

मात्र, काळाचे चक्र फिरले आणि ‘ब्रॉयलर’ संस्कृतीच्या आक्रमणात हा अस्सल गावठी वारसा धूसर होऊ लागला. झटपट नफ्याच्या हव्यासापोटी अंगणातील चिवचिवाट हरवला. शेणाने सारवलेल्या अंगणाची जागा जेव्हा चकचकीत मार्बल आणि टाईल्सनी घेतली, तेव्हा त्या आरस्पानी जमिनीवर कोंबड्यांची विष्ठा ‘अस्वच्छता’ ठरू लागली. ज्या माऊलीने ‘रवणी’च्या माध्यमातून हजारो पिल्लांना जन्म दिला, तिलाच घराबाहेर काढले गेले. आज गावठी रश्श्याची चव हॉटेलमध्ये शोधली जाते, पण ज्या प्रक्रियेतून ही संस्कृती जन्माला आली, ती ‘रवणी’ आता केवळ जुन्या पिढीच्या आठवणींच्या कप्प्यात बंदिस्त झाली आहे.

‘रवणी’ची ही परंपरा केवळ कुक्कुटपालन नव्हते, तर ते निसर्गाशी नाते सांगणारे एक शाश्वत अर्थशास्त्र होते. कोकणच्या लाल मातीत रुजलेली ही 'स्वयंपूर्णतेची' संस्कृती पुन्हा एकदा जपण्याची गरज आहे, जेणेकरून आपल्या पुढच्या पिढीला केवळ या आठवणी सांगायला नकोत, तर तो जिवंत अनुभवही घेता येईल. **

# सौभाग्याचं लेणं : कुंकू

**मकर संक्रांत सण झाला की सर्वत्र हळदी कुंकू समारंभांना सुरुवात होते. रथसप्तमी पर्यंत चालणाऱ्या या उत्सव काळात सर्वत्रच्या स्त्रिया उत्साहाने सहभागी होतात. विविध महिला मंडळे, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था यांसह राजकीय पक्षांच्या वतीनेही हळदी कुंकू समारंभ साजरे केले जातात. महापालिका निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक यंदा हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने प्रभागातील महिला मतदारांच्या भेटीला नक्कीच जातील. हळदी कुंकूंच्या दिवसांत कधी नव्हे ते स्त्रियांचे संघटन पाहायला मिळते.**



मोक्षदा घाणेकर

यावेळी स्त्रियांना तिळगुळ वाटपासह वाण म्हणून काहीना काही वस्तू दिली जाते. या सर्वांत प्रमुख कृती असते ती हळद आणि कुंकू लावण्याची. सौभाग्याचे आणि समृद्धीचे प्रतिक म्हणून कपाळी हळद आणि कुंकू लावले जाते. स्त्रियांच्या दोन भुवयांमध्ये आज्ञाचक्राच्या स्थानी लावले जाणारे हळद कुंकू श्रद्धेने लावले जाते. प्रत्येक स्त्रीमध्ये दुर्गादेवीचे तत्व असते, त्यामुळेच स्त्रीला ‘शक्ती’ असेही म्हणतात. स्त्रिया एकमेकींना हळद कुंकू लावतात म्हणजे एकमेकांतील दुर्गादेवीच्या तत्वाचे पूजन करतात. संपूर्ण चेहऱ्याच्या संवेदनांसाठी जबाबदार असणारा मज्जातंतू हा याच भागात असतो. दोन भुवयांच्या मध्यभागी मज्जातंतूच्या एकूण तीन शाखा असतात. या जागेवर दाब पडल्याने सायनसचा त्रास कमी होतो. डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसा देखील याच भागात असतात आणि या नसा डोळ्यांच्या स्नायुंशी जोडलेल्या असतात. या ठिकाणी थोडासा दाब दिल्यास दृष्टीही चांगली राहते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते. माणसाच्या मनावर ताण आला की कपाळावर आठ्या पडतात. शरीरातला सगळ्या गोष्टींचा ताण हा कपाळावरील त्या बिंदूच्या ठिकाणी जमा होतो. म्हणूनच त्या बिंदूला थोडीशी उत्तेजना दिल्यास आपला ताण कमी होतो, दृष्टी सुधारते आणि निद्रानाशही कमी होतो. त्यामुळे बिंदू दाबन, योगशास्त्रदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही कुंकू लावण्याचे अनेक लाभ आहेत. हळद आणि चुना किंवा हळद आणि लिंबू यांच्या मिश्रणतून कुंकू बनवले जाते. त्यामुळे कपाळी कुंकू लावण्याचे आयुर्वेदिक लाभही आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांसह पुरुषांनीही कपाळाला कुंकू लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आधुनिकतेच्या नावाखाली पूर्वापार चालत आलेल्या लाभदायक प्रथा हळूहळू लोप पावत चालल्या आहेत. हल्लीच्या स्त्रिया साडी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांना नेसतात तसे कुंकूही केवळ हळदी कुंकू समारंभातच लावले जाऊ लागले आहे. कुंकूची जागा आता टिकलीने घेतली असून हळूहळू तिही नष्ट होण्याच्या मार्गांवर आहे. हल्लीच्या स्त्रियांवर हिंदी चित्रपटातील अभिनेत्रींचा प्रभाव अधिक असल्याने आज अनेक

स्त्रिया उजाड माथ्याने वावरताना दिसतात. काही स्त्रिया, मुली टिकली तर लावतात मात्र ती दुर्बिणीने शोधावी लागेल अशा आकाराची लावतात. आपल्या हिंदु प्रथा परंपरा या मानवाचे सर्वांगीण हित साधणाऱ्या असून त्या सर्वांमागे अध्यात्म, मानस आणि आरोग्यशास्त्र दडलेले आहे. आज ते विज्ञानाच्या आधारावरही सिद्ध होत आहे. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन त्यांना त्यागण्यापेक्षा त्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब करणे हिताचे आहे. हळदी कुंकू साजरी करण्याच्या प्रथेतील व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन स्त्रियांनी प्रतिदिन कपाळावर कुंकू लावण्याची सवय स्वतःला लावून घायला हवी. **

# पतंग खेळच बंद करावा?



अलिकडील काळात पतंगानं गळे कापत आहेत. जीव जात आहेत. पशुपक्षी जखमी होत आहेत. त्यांचे जीवन जात आहेत. एकंदरीत सांगायचं झाल्यास बरेच नुकसान होत आहेत. हे पाहता असं वाटायला लागलं आहे की हा पतंग उडविण्याचा खेळच कायमचा बंद करुन टाकावा.

अंकुश शिंगाडे

सरकार राबवित आहे नायलॉन मांजा बंद करण्याचा उपक्रम. लोकं सर्रास नायलॉन मांजा वापरत आहेत. जो मांजा सडत नाही. खराब होत नाही व वर्षानुवर्ष टिकून राहतो. ज्या मांजानं अनेकांचे गळे कापले जातात. अनेक पक्षी त्या मांज्यात लटकून त्यातून सुटका न झाल्यानं उपासानं व विना अन्नपाण्यानं मरण पावतात.

सरकारचं म्हणणं आहे की नायलॉन मांजावर बंदी आणणं. परंतु पतंग हा लोकांचा आवडता खेळ असल्यानं सरकारनं जरी नायलॉन मांजावर बंदी घातली तरी या नायलॉन मांज्याची विक्री लोकं लपूनछपून करतातच, करीत आहेत व लोकांचे गळे कापले जात आहेत.

नायलॉन मांज्याच्या अनुषंगानं विचार केल्यास पुर्वी पतंग उडत नव्हते काय? उडत होते. मग त्यात जो मांजा वापरला जात होता, तो घातक नव्हता काय? तो घातकच होता. कारण त्यात काच राहात होता. परंतु त्यावर बंदी घातली गेली नव्हती. कारण त्यात काच जरी असला तरी ते धागे कालांतरानं कुजत असत व नष्ट होत असत. याचा अर्थ असा नव्हता की ते धागे माणसाचे आजच्यासारखे गुण कापत नव्हते. तसेच त्याच धाग्यात आजच्यासारखे पशुपक्षी लटकून पडत नव्हते.

अलिकडील काळात पतंग उडविणे या खेळाला लोकं जास्त महत्व देवू लागले आहेत. पतंग उडविण्याचा छंदही तसा वाढत चाललेला आहे. यातूनच माणसांचे गळेच कापले जात नाहीत तर पशुपक्षांचेही जीवच जात आहेत.

पतंग हा खेळ राष्ट्रीय नाही. म्हणतात की तो खेळ चीनमधून आला. तसा तो खेळ वाईटच. कारण पतंग कटल्यानंतर ती पतंग उडत उडत लांब अंतरावरुन जमिनीवर पडते आणि ती पडतांना माणसाला क्षति पोहोचवते. यामुळंच हा खेळच मुळात बंद करायला हवा. नायलॉन मांजावर बंदी आणण्याऐवजी. कारण या खेळात फक्त क्षणिक सुख मिळत असते. मात्र दुःख पाहता जन्मभराचं होते. कुणाचा एकुलता एक लहान मुलगा मरण पावतो तर कुणाच्या घरचा मोठा जीव मरण पावतो. जो कमवता असतो. मग तो नायलॉन मांजा का असेना आणि साधा मांजा का असेना. मांजा विचारच करीत नाही की मी नायलॉन आहे वा मी साधा आहे.

देशानं नायलॉन मांजावर बंदी घालणं हा व्यक्तीगत अधिकार आहे. भारतीय संविधानानं बहाल केलेला. भारतीय संविधानात अनुच्छेद १९ ते २२ मध्ये काही कलमानुसार आपल्याला स्वातंत्र्य वागण्याचे अधिकार दिले आहेत. स्वातंत्र्य व मुक्त विहार करण्याचे अधिकार. त्यात कलम २१ मध्ये व्यक्तिगत स्वातंत्र्य बहाल केले गेले आहे. पतंग उडविणे हा आपला व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यामुळंच त्यावर बंदी आणता येत नाही. परंतु त्या छंदानं जर कुणाचे जीव जात असेल तर असे छंद कोणत्या कामाचे? असे छंद वा खेळ बंद केलेले बरे. उदाहरणार्थ एखाद्यानं जर म्हटलं की मला अनुच्छेद १९ ते २२ नुसार व्यक्तिगत स्वातंत्र्याचे अधिकार आहेत. मला त्यानुसार मुक्तपणे वागता येते. त्याच वागण्यातून मला हत्या करायची आहे. तर हत्या करण्याचा अधिकार अनुच्छेद १९ ते २२ बहाल करीत नाहीत. पतंग उडविणे ह्या गोष्टीही अशा हत्येच्याच प्रकारात बसतात. त्यामुळंच तसे खेळच मुळात बंद करण्याची गरज आहे. फक्त नायलॉन मांजा बंद करणे नाही. त्यासाठी केवळ जनजागृतीचीच गरज नाही तर तसा कायदा बनविण्याची गरज आहे. जेणेकरुन शेकडो लोकांचे प्राण वाचवता येईल. पशुपक्षाचेही प्राण वाचवता येतील. महत्वाचं सांगायचं झाल्यास पतंग हा खेळ जरी लोकांना रोजगार देणारा असला तरी तो विध्वंसक खेळ आहे. असे खेळ बंद केलेले बरे. ते खेळ जर बंद झाले तर भविष्यातील कित्येक लोकांचे प्राण वाचवता येवू शकतील हे तेवढंच खरं. तशी बंदी आणल्यास लोकं नक्कीच भडकतील. परंतु काही दिवसानंतर हळूहळू सवय पडेल व तद्नंतर लोकांना वाटेल की ही गोष्ट बरी झाली की पतंग उडविण्याचा छंद बंद झाला.

पतंग उडविणे हा छंद असून तो छंद बंद करणे अतिशय आवश्यक आहे. तो बंद केल्यास उद्या भावी पिढी आपले उपकारच मानतील. म्हणतील की प्राणी पक्षांचा जीवाची आमच्याही जुन्या पिढीनं दखल घेतली व पतंग उडविण्याचा खेळ बंद केला म्हणून बरे झाले. **

# वाचनानंद आणि...

दरवर्षी नवीन वर्ष सुरू होते, तेव्हा प्रत्येकजण आपापल्यापरीने काही संकल्प करतो आणि वर्षाच्या शेवटी संकल्प आणि सिद्धी यांचा लेखाजोखा मांडला जातो. प्रत्यक्षात या दोहोंतील वाढते अंतर अनेकांना अस्वस्थ करते. 'शहाणी माणसे' यामुळेच नव्या वर्षाचा कोणताही संकल्पच करीत नाहीत. त्यामुळे संकल्प-सिद्धीचा प्रश्नच नसतो. अशा व्यक्तींना त्यामुळे मानसिक अस्वस्थताही येत नाही. बिनधास्त !

या नववर्षाच्या प्रारंभी, माझ्या वर्षभरातील लेखन- वाचनाचा आढावा घेण्याची इच्छा निर्माण झाली. त्याचे गवसलेले फलित, माझ्या प्रिय वाचक सुहृदांसमोर सादर करीत आहे. माझे प्रत्येक आठवड्याला, विविध पुस्तकांवरील लेख आणि माझे चिंतनात्मक लेख, 'मुक्तांगण सदरात, दैनिक श्रमिक एकजूट, नांदेड; दैनिक कृषीवल, वेश्वी, अलिबाग; साप्ता. कोकणनामा, तसेच अन्य नियतकालिकांमध्ये, वेळोवेळी प्रकाशित होत असतात. गेल्या वर्षी 'मुक्तांगण' या सदरामध्ये, एकूण सहा लेख प्रकाशित झाले. त्याद्वारे पद्माकर घाणेकर आणि प्रा. सुरेश घाटे, या दोन दिवंगत, विशेष व्यक्तिमत्त्वांच्या विविध आठवणी, या दोन लेखांतून जागवल्या. सध्याची समाजस्थिती पाहता ''मेंदूला जपा'' आणि ''सुखाचा निरंतर शोध'' या शीर्षकाखालील माझे लेख उल्लेखनीय होते. हे लेख चिंतनाला आणि कृतीला प्रवृत्त करतात, असे विविध सुजाण, वाचकांनी त्यांच्या प्रतिक्रियांद्वारे कळविले. अलिबाग तालुक्यातील, सोगाव येथील ''बालग्राम'' मधील एका कार्यक्रमाला गेलो असता, तेथील विविध वयोगटातील सुमारे सत्तर मुलांसमोर, आपली जडणघडण कशी होते हे मी सांगितले. त्यानंतर याच विषयावर सविस्तर लिहिले. 'शिक्षण : दिशा आणि दशा!' या लेखामध्ये, प्रचलित शिक्षण विषयक काही विचार मांडले. रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील, विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम प्रत्यक्षात आणणाऱ्या, अलिबाग तालुक्यातील, गुणी आणि विविध पुरस्कार प्राप्त, प्राथमिक शिक्षक, संदीप दत्तात्रेय वारगे, यांच्या कार्याचा, या लेखातून संक्षिप्त परिचय करून देता आला.

२०२५ मध्ये माझी विविध प्रकारच्या पुस्तकांवरील, ३४ पुस्तक परीक्षणे प्रकाशित झाली. त्यामध्ये विविध प्रकारची पुस्तके समाविष्ट होती. त्यांनी मला वाचनानंद आणि लेखनाचा आनंद मिळवून दिला.१६ एप्रिल, २०२५ रोजी, माझ्या उजव्या डोळ्यावर, मोतीबिंदू आणि काचबिंदूसाठी शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर दीर्घकाळ वाचन बंद होते. माझी प्रिय पत्नी शुभांगी, या सक्तीच्या विश्रांतीच्या काळात, विविध वृत्तपत्रे, नियतकालिके वाचून दाखवत असल्यामुळे हा 'न वाचण्याचा, सक्तीचा काळ' छान व्यतीत झाला. ''वाचनाची उपासमार'' त्यामुळे टळली. डोळ्यात विविध प्रकारची औषधे घालून, वेळोवेळी, पडून राहावे लगे. त्यावेळी डोळे मिटून चिंतन करायला आडकाठी नसल्यामुळे, काही लेखांचे बीजे गवसली! जी नंतरच्या ''मुक्तांगण''च्या सदरात बहरली.




मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

वाचलेल्या आणि त्यावर परीक्षण प्रकाशित झालेल्या ३४ पुस्तकांचे ढोबळ मानाने, चरित्र-आत्मचरित्र, कवितासंग्रह, प्रवासवर्णन, कादंबरी, आठवणी, वैचारिक आणि माहितीपूर्ण पुस्तके, असे वर्गीकरण करता येईल. गेल्या वर्षभरात सात चरित्रे आणि आत्मचरित्रे वाचली. हा साहित्य प्रकार नेहमीच वाचनीय आणि प्रेरक असतो. त्यातून काही शिकवणही मिळते. यामध्ये 'जागरण,' लेखक-भारत सातपुते, 'कार्यकर्ता' – डॉ. राजा दांडेकर, लेखक सुमेध वडावाला रिसबुड, 'अवघाचि संसार' लेखिका डॉ. शुभा थत्ते, ही आत्मचचित्रे विलक्षण वाचनीय आणि प्रेरक आहेत. या व्यक्ती जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत, आपले कार्य, पूर्ण समरसतेने आणि आनंदाने करीत आहेत. 'प्रतिभासूर्य रवींद्रनाथ टागोर', 'शेक्सपियर आणि त्याचा नाट्य संसार' लेखक-विलास खोले, आणि प्रदीप कुलकर्णी, 'र.धों. कर्वे' लेखक डॉ. अनंत देशमुख, 'अक्की' लेखक संतोष परांजपे, ही सर्व चरित्रे वेगवेगळ्या देशांतील, भागांतील आणि वेगवेगळ्या परिस्थितीतील, कालखंडातील असून विलक्षण वाचनीय आणि प्रेरक आहेत. आठ कवितासंग्रह वाचण्याची संधी मिळाली. हे सर्व कवी आणि कवयित्री प्रामुख्याने मुक्तछंदामध्ये लिहिणारे आहेत. अनेक विषयांवर सादर केलेल्या या कविता वाचनीय आहेत. या कवींची प्रतिभा जीवनाचे विविध भाव पकडते आणि त्यांचे दर्शन घडवते. कवी कुसुमाग्रज म्हणतात, ''कवितेच्या स्वामित्वाची मुद्रा एकदा कपाळावर बसली, म्हणजे माणसाच्या जीवनात एक विचित्र कैफ निर्माण होतो. तसा कैफ माझ्याही जीवनात झाला. नेहमीपेक्षा वेगळे आकार, वेगळे रंग माझ्या दृष्टीला दिसू लागले...कवितेनं अनेक व्यथा, दुखणी माझ्या दाराशी आणली असतील हे खरं आहे. परंतु त्याचबरोबर हे ही खरं आहे की तिनं मला जे सुख आणि समाधान दिलं, ते मला इतरत्र कोठेही मिळालं नव्हतं'' पुस्तक रूपाने भेटलेल्या या कवी आणि कवयित्रींमध्ये हाच कैफ दिसून येतो. गतवर्षी पाच प्रवासवर्णने वाचण्याची संधी मिळाली.

वर्षा कुवळेकर, अॅड. विलास नाईक, राजीव लिमये, प्रसाद घाणेकर यांच्या, विविध पुस्तकांनी मला आणि माझ्या वाचकांना वेगवेगळ्या देशांत आणि प्रदेशांत भटकंती करण्याची संधी मिळवून दिली. ''करुणा'', ''तिची असाइनमेंट'', ''कन्या झाली हो..'' या तीन कादंबऱ्यांतून लेखकांनी एक वेगळेच विश्व वाचकांसमोर उलगडले आहे. तसेच सात, वैचारिक आणि माहितीपूर्ण पुस्तके वाचता आली. त्यामध्ये मृदुला भाटकर, कविता पाटणकर, मोहन रानडे, डॉ. भास्कर घाटावकर, सुधाकर लाड, डॉ. विजया फडणीस या लेखकांचा समावेश आहे.

या विविध लेखांवर मला माझ्या विविध वाचकांनी, आपल्या प्रतिक्रिया कळविल्या होत्या. त्याचप्रमाणे लेखक आणि कवींनीही माझे पुस्तक परीक्षण आवडल्याचे वेळोवेळी कळविले होते. त्यामुळे वाचन आणि लेखनाचा छंद आणखी दुणावला! गेल्या वर्षभरात विविध लेखक, प्रकाशकांनी अगत्याने पाठविलेली, त्यांची पुस्तके, आता मला वाचनासाठी साद देत आहेत. ''बखर कल्याँची'' या राजीव लिमये, यांच्या पुस्तकाची एक विशेष गोष्टच घडली. डॉ. सरोज देशपांडे, या पुण्यातील स्नेही यांनी, लिमये यांची रत्नागिरी आकाशवाणी केंद्रावर प्रसारित झालेली, त्यांच्या पुस्तकाविषयाची मुलाखत पाठवली. राजीव लिमये यांनी, रत्नागिरीचे त्यांचे प्रकाशक यांचे मार्फत पुस्तक पाठवले. लिमये यांच्या गावात, माझे रत्नागिरीतील, कॉलेजमधील जिवलग मित्र, जयप्रकाश सुर्वे राहत होते. त्यांचा आणि त्यांच्या पत्नीचा, स्वातीचा, दीर्घकालीन परिचय होता. परंतु त्यांची खुशाली, दीर्घकाळ न कळल्याने, स्वाती सुर्वेला मी या पुस्तकाचा फोटो पाठवला आणि या पुस्तकाविषयी व्हॉट्स अॅपवर कळवले. त्यानंतर एके दिवशी, संध्याकाळी स्वातीचा फोन आला. ती दीर्घकाळ संधिवातामुळे, घरातच जखडलेली होती आणि नंतर तिला कर्करोगही झाला. एका वृद्धाश्रमात ती राहत असल्याचे तिने मला कळविले. हे ऐकून मला अतिशय दुःख झाले. या पुस्तकामुळे मला मित्राची नाही, पण त्याच्या पत्नीची फोनद्वारे भेट झाली. कालांतराने १० डिसेंबरला, तिचे निधन झाल्याचे, विदेशातून भारतात आलेल्या तिच्या मुलीने, सुरेलने, स्वातीच्याच व्हॉट्स अॅपवरून मला कळविले होते.

गेल्या वर्षी आणि त्याआधी ज्यांच्या पुस्तकांची मी परीक्षणे लिहिली, त्यापैकी काही साहित्यिकांना भेटण्याची, त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याची संधी मिळाली. २९ जुलै, २०२५ रोजी भारतातील ज्येष्ठ व्यंगचित्रकार, आदरणीय शिवराम दत्तात्रेय फडणीस यांना शंभर वर्षे पूर्ण झाली. आम्ही दोघे आणि माझे एक माजी विद्यार्थी, पुस्तकप्रेमी वाचकमित्र, दिलीप पाटील यांच्यासह, त्यांची पुण्याला, सदिच्छा भेट घेऊन त्यांना आदरपूर्वक कृषीवल दिवाळी अंक भेट दिला. या अंकात माझा, त्यांच्यावरील सविस्तर लेख प्रकाशित झाला आहे. माझे वाचन आणि लेखन दीर्घकाळ सुरू आहे. त्यामुळे आमचे दोघांचे जीवन, वाचनानंदामुळे समृद्ध झाले आहे. तुमचेही जीवन विधायक छंदांद्वारे आनंदी व्हावे, हीच मनःपूर्वक सदिच्छा ! **

# वर्ष नवे, हर्ष भरे...

**नवीन वर्षाची सुरूवात जोशात झाली असली तरी भविष्यातील घटनाक्रमांचा वेधही घ्यायला हवा. आताच्या बदलेल्या भारताकडे जग वेगळ्या नजरेने बघत आहे. वाढती श्रमशक्ती, गतिमान अर्थव्यवस्था, प्रगल्भ सामाजिक जाणीवा आणि अत्युच्च संस्कार हे भारताचे खरे वैभव असून ते वाढवण्यासाठी प्रयत्नरत राहण्यास आपण प्राधान्य द्यायला हवे. मुख्य म्हणजे आव्हानांकडे दुर्लक्ष करण्याची चूक होता कामा नये.**


नवीन वर्ष अनेक अपेक्षा घेऊन येते. स्वागत करताना प्रत्येकजण चांगल्यासाठीच कामना करतो. आपण भारतीय लोक तर सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणाचा विचार करणारे आहोत आणि संपूर्ण पृथ्वीला एक कुटुंबच मानतो. तथापि, सर्वांच्या सुख-समृद्धीच्या या प्रामाणिक इच्छेबरोबर समाज आणि राष्ट्राच्या जीवनामध्ये आव्हाने, समस्यादेखील अपरिहार्य असतात, हे वास्तव आहे. या वर्षीही त्या उद्भवतीलच. म्हणूनच नववर्षाच्या जल्लोशात आणि कल्पनाविश्वात मग्न असताना दुसरीकडे याची सज्जताही करायला हवी. नवीन वर्षात आव्हानांना प्रभावीपणे तोंड देत आनंद आणि समृद्धीसह सुसंवाद वाढवणाऱ्या प्रगतीच्या मार्गावर वेगाने वाटचाल करणे हेच आपले धोरण असायला हवे. मात्र एक राष्ट्र म्हणून आपली कार्यसंस्कृती चांगल्या अर्थाने बदलेल आणि प्रगतीला अडथळा आणणाऱ्या मूलभूत समस्या सोडवल्या जातील, तेव्हाच हे शक्य होईल. म्हणूनच वर्षारंभी सर्वप्रथम यावर विचार व्हायला हवा. कोणत्याही देशाची कार्यसंस्कृती बदलण्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकार आणि प्रशासनातील लोकांवर असली तरी, या कामात सार्वजनिक सहकार्यदेखील आवश्यक असते. जगभरातील अनेक देशांचा इतिहास या वस्तुस्थितीची साक्ष देतो की, राज्यकर्ते सामान्य लोकांसह आपली राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समर्पितपणे काम करतात तेव्हा देशाची भरभराट होते. भाग्य उजळते.

या पार्श्वभूमीवर बघायचे तर भारत आता सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश आहे. मात्र प्रचंड लोकसंख्या आणि विविध धर्म आणि भाषा असणाऱ्या या देशात सरकार, प्रशासन आणि सामान्य लोकांचे दृष्टिकोन बदलल्याशिवाय प्रगती अशक्य आहे. म्हणूनच यासाठी प्रयत्नरत असणे हे राज्यकर्त्यांबरोबरच नागरिकाचेही कर्तव्य असते. विविध मुद्द्यांवरून सरकार आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांवर योग्य टीका केली जात असली तरी सर्वसामान्यांची साथ नसेल तर अनेक प्रश्न अनेकदा अनुत्तरीत

उर्मिला राजोपाध्ये

राहतात. तेव्हा नवीन वर्षात तरी आपण भारतातील लोक नागरी कर्तव्य योग्यरित्या पार पाडत आहोत का, हा प्रश्न स्वतःलाच विचारायला हवा. प्रत्येकाला हक्कांची जाणीव असली पाहिजे, परंतु आपण कर्तव्यांची जाणीवदेखील बाळगतो का, हा कळीचा प्रश्न आहे. कारण आधी उल्लेख केल्याप्रमाणे सरकार आणि प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अनेक समस्या सुटत नाहीत तर दुसरीकडे लोकांच्या अपेक्षित सहकार्याचा अभाव असल्यानेही अनेक समस्या गुंतागुंतीच्या राहतात. तेव्हा सार्वजनिक पाठिंब्याचा हा अभाव दूर करता आला तर नवीन वर्षात स्वावलंबी भारताचा मार्ग सोपा होऊ शकतो आणि विकसित राष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी अपेक्षित असणारे स्वावलंबन मिळवू शकतो. ही उज्ज्वल भविष्याकडे नेणारी गुरुकिल्ली आहे.

२०२५ ला निरोप देणारा देश आता एका नवीन युगात प्रवेश करत आहे.




अर्थातच या वर्षात आपल्याला विकसित भारताचे ध्येय साधायचे आहे. मात्र ते प्रत्यक्षात आणण्यासाठी मानसिकतेत बदल होणे अत्यावश्यक आहे. गेल्या दशकात एक सशक्त राष्ट्र म्हणून भारताची प्रतिमा निश्चितच बहरली आहे. आता नवीन वर्षात बदलत्या भारताच्या भविष्याचा विचार करताना आपण देशाची समृद्ध प्राचीन संस्कृती आणि आधुनिक राष्ट्र-राज्याची संकल्पना या दोन्ही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे.

नैतिक आणि न्याय्य शासनाचे प्रतिक असणाऱ्या रामराज्याची अमिट प्रतिमा अजूनही लोकांच्या स्मृतीत आहे. म्हणूनच जागतिकीकरणाशी सुसंगत असणाऱ्या आकांक्षा आपण लक्षात ठेवल्या पाहिजेत. हे करत असताना नैतिकता, सत्य आणि अहिंसा यासारख्या मानकांचीही आपण काळजी घेतली पाहिजे. देशाच्या प्रगतीकडे पाहताना सातत्य आणि बदलत्या परिस्थितीचे भान राखण्यास प्राधान्य दिले पाहिजे. आता ढोबळमानाने नव्हे, तर विकसित भारत कसा दिसेल याचा अतिशय गांभीर्याने आणि वस्तुनिष्ठ विचार केला पाहिजे. भारतीय समाजात अनेक प्रकारची विविधता असली तरी त्यात नव्याने एकता शोधणे आणि ओळखणे हेही या वर्षाचे ध्येय असले पाहिजे. संपूर्ण सजीवसृष्टीशी जवळीक साधून विविधतेचे सहअस्तित्व आणि परस्परसंवाद हा नेहमीच भारताचा मूलभूत विचार आहे. आपल्या विचारसरणीत कुटुंब किंवा कुळाचे रूपक केंद्रस्थानी आहे; ते विनाकारण नाही. तेव्हा त्यालाच धरुन येणारी राष्ट्रीय एकात्मता, देशाप्रती आपलेपणाची भावना आणि देशभक्तीसाठीही ही दृष्टी आवश्यक आहे.

भारतासाठी गेले वर्ष आव्हानांनी भरलेले होते. अमेरिकेच्या बदलत्या धोरणामुळे भारताच्या निर्यातीत, रुपयाच्या मूल्यात, परकीय गुंतवणुकीत आणि देयकांच्या संतुलनामध्ये अडचणी निर्माण झाल्या. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिकेचे हितसंबंध जपण्यासाठी आक्रमक भूमिका घेतल्याने आपल्याला काही प्रमाणात नुकसान सोसावे लागले. मात्र हे वेळीच लक्षात घेत भारताने परिस्थिती व्यवस्थापित करण्यासाठी वेगाने बरीच पावले उचलली. जीएसटी दर कमी करण्यात आले आणि सुधारीत कामगार कायद्यांची अंमलबजावणी करण्यात आली. आंतरराष्ट्रीय अनिश्चिततेच्या भयानक परिस्थितीतही भारताचा जीडीपी, विकास दर जगात सर्वोच्च राहिला ही एक मोठी कामगिरी आहे. दुसरीकडे, सरत्या वर्षात किरकोळ महागाईदेखील गेल्या आठ वर्षांमधील सर्वात कमी पातळीवर पोहोचली. चांगले उत्पादन, सुधारित पुरवठा साखळी आणि कच्च्या तेलाच्या किमान किमती या परिस्थितीला मदतकारक ठरल्या. शेअर बाजारात देशांतर्गत गुंतवणूकदारांनी आपली अर्थव्यवस्था मजबूत केली. उत्पन्न कर आणि कर संकलनातही सुधारणा झाली. वीज, शहरी विकास, खाणकाम आणि वित्तीय सेवा या क्षेत्रात नवीन उपक्रम सुरू करण्यात आले. या सर्वामुळेच भारत एक प्रमुख जागतिक आर्थिक शक्ती बनण्याच्या मार्गावर असून २०३० पर्यंत ७.३ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार असल्याचे मत बलिष्ठ होण्यास मदत झाली.

सामाजिकदृष्ट्या बघायचे तर सध्या देशात मध्यमवर्गाचा आकार वाढत आहे. त्यामुळे वस्तू-सेवांचा वापर आणि शहरीकरणही वाढत असून गरिबी कमी होत आहे. देशातील पायाभूत सुविधांचा विस्तार होत आहे. डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), अंतराळ विज्ञान, महानगरे आणि बुलेट ट्रेनमध्येही प्रगती होत आहे. 'मेड इन इंडिया' उपक्रमांतर्गत उत्पादन, आयटी, आरोग्य सेवा आणि स्टार्ट अप्समध्ये लक्षणीय वाढ झाल्याने रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. आता उत्पादनक्षेत्रात वाढ अपेक्षित असून आपण स्वदेशी विकासाचे धोरण स्वीकारत आहोत.

येत्या काळात ५ जी आणि रोबोटिक्सच्या वापराची व्याप्ती वाढण्याची अपेक्षा आहे. ऑनलाइन शॉपिंग आणि ओटीटी प्लॅटफॉर्म अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. यातही महत्त्वपूर्ण बदल अनुभवास येतील. भविष्यात, एआयचे वर्चस्व वाढेल. पण दुसरीकडे सायबर गुन्हेदेखील वाढू शकतात. या संदर्भात, सायबर सुरक्षा ही एक महत्त्वाची चिंता बनत आहे. हे देखील लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, देशाचे भविष्य आर्थिक प्रगतीच्या निर्देशकांपुरते मर्यादित असू शकत नाही. आर्थिक विकासाकडे केवळ विकासदरांच्या दृष्टीनेच नव्हे तर वाढत्या रोजगाराच्या संधी, सामाजिक गतिशीलता आणि सामान्य लोकांसाठी सुधारित राहणीमानाच्या दृष्टीनेही पाहिले पाहिजे. सर्वांसाठी दर्जेदार जीवन सुनिश्चित करण्यासाठी अर्थव्यवस्था ज्ञानकेंद्रित आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार बनली पाहिजे.

स्वावलंबी भारतासाठी ही संधी आहे, परंतु आपण आपल्या मर्यादांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तरुण भारताला श्रमसंपत्ती म्हणून ओळखले जाते. परंतु ही ओळख सार्थ ठरवण्यासाठी कौशल्य, आरोग्य आणि शिक्षणात गुंतवणूक आवश्यक आहे. तरुणांमध्ये कौशल्य विकासाचा अभाव आणि बेरोजगारीमुळे समाजात असंतोष निर्माण होत आहे. तेव्हा नवीन शिक्षण धोरणातील विसंगती दूर करण्यासाठी आणि नीट अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

सध्या देशात शिक्षणाची सुलभता, गुणवत्ता आणि प्रासंगिकतेबद्दल अनेक शंका आहेत. त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य सेवादेखील किमान दर्जाच्या आहेत. मानसिक आरोग्यरक्षणासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा अपुऱ्या आहेत. महिला कामगार दलाचा सहभाग कमी आहे. उत्पन्न आणि संपत्तीची असमानतादेखील वाढली आहे आणि अनौपचारिक क्षेत्रातील असुरक्षितता कायम आहे. जात, वर्ग, लिंग आणि प्रादेशिक असमानता अजूनही अस्तित्वात आहे. या वर्षी या सगळ्यावर आपल्याला काम करावे लागेल. राजकीय पक्ष निवडणुकीच्या फायद्यासाठी सामाजिक ध्रुवीकरणाच्या आधारे शोषण करत राहणार असतील तर आपण हे प्रयत्न हाणून पाडायला हवेत. **

## निवडक



### क्रीडा संकुलात स्पर्धेचे आयोजन

**अलिबाग :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, रायगड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अलिबाग, प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्था रोहा, स्पर्धा विश्‍व अकॅडमी अलिबाग यांच्या सहकार्याने ऑलम्पिक पदक विजेते स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड प्रकाश वाघ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली-अलिबाग या ठिकाणी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमास क्रीडा कार्यालयाचे सहकारी, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथा स्पर्धा विश्‍व अकॅडमी संचालिका सुचिता साळवी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेले युवक युवती उपस्थित होते. क्रीडा स्पर्धांमध्ये ८०० मी.धावणे, १०० मी. धावणे, गोळा फेक आदी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्याकरिता जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या कर्मचार्‍यांनी परिश्रम घेतले.

### कर्नाटकला नमवून विदर्भ अंतिम फेरीत

**बंगळूर :** सलामीवीर अमन मोखाडे याचे झंझावाती शतक आणि रविकुमार समर्थ याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर विदर्भाने विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत कर्नाटकचा ६ गडी राखून पराभव केला. या विजयासह विदर्भाने दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली आहे. प्रथम फलंदाजी करताना कर्नाटकने करुण नायर आणि कृष्णन श्रीजित यांच्या अर्धशतकांच्या जोरावर ४९.४ षटकांत २८० धावा केल्या होत्या. विदर्भाच्या दर्शन नळकांडे याने ५ बळी घेत कर्नाटकला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यात यश मिळवले. त्यानंतर २८१ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना विदर्भाची सुरुवात खराब झाली. अथर्व तायडे (६) लवकर बाद झाला. मात्र, त्यानंतर अमन मोखाडेने १२२ चेंडूंत १२ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १३८ धावांची मॅरेथॉन खेळी केली. अमन आणि ध्रुव शोरे (४७) यांनी ९८ धावांची भागीदारी करून डावाला आकार दिला. त्यानंतर अमन आणि रविकुमार समर्थ यांनी तिसर्‍या विकेटसाठी १४७ धावांची निर्णायक भागीदारी केली. रविकुमारने ६९ चेंडूंत ७६ धावांची नाबाद खेळी करत विदर्भाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. विदर्भाने हे लक्ष्य ४६.२ षटकांत ४ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले.



### लक्ष्य सेनचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**नवी दिल्ली :** माजी विजेता लक्ष्य सेनने आपल्या मजबूत बचावावर आणि वेगवान खेळाच्या जोरावर जपानच्या केन्टा निशिमोटोचा पराभव केला. तर किदाम्बी श्रीकांत आणि एच. एस. प्रणॉय यांचा प्रेरणादायी खेळही पुरेसा ठरला नाही. बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित आणि एचएसबीसी बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ७५० दर्जाच्या इंडिया ओपन २०२६ स्पर्धेच्या दुसर्‍या फेरीत इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर हे सामने झाले. सेनने निशिमोटोचा २१-१९, २१-११ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

### मिहिरा बनली तरुण वेटलिफ्टर

**पुणे :** वय लहान पण जिद्द, मेहनत आणि आत्मविश्‍वास प्रचंड असला की अशक्य असे काही नाही, याचे जिवंत उदाहरण म्हणजे पुण्याची अवघी सहा वर्षांची मिहिरा गांगुर्डे. स्वतःच्या शरीरापेक्षा अधिक वजन उचलत मिहिराने भारतातील सर्वात तरुण वेटलिफ्टर होण्याचा मान पटकावत क्रीडा क्षेत्रात नवा इतिहास रचला आहे. इतक्या लहान वयात वेटलिफ्टिंगसारख्या कठीण खेळात मिळवलेले हे यश अनेकांसाठी आश्‍चर्याचा आणि प्रेरणेचा विषय ठरत आहे. मिहिरा रोज नियमितपणे वॉर्मअप, रनिंग, जंपिंग आणि व्यायाम करते. मला हा खेळ खूप आवडतो. पुढे जाऊन ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करायचे आहे, असे ती आत्मविश्‍वासाने सांगितले.

# महाराष्ट्राचा ओडिशावर रोमहर्षक विजय

## ■ पुरुष गटात रेल्वेच्या शिलेदारांचे वर्चस्व



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काझीपेठ येथील रेल्वे ग्राऊंडवर रंगलेली ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद ‘खो-खो’ स्पर्धा शेवटच्या क्षणापर्यंत थरारक ठरली. भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने व तेलंगणा खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली पार पडलेल्या या महास्पर्धेत महाराष्ट्राच्या रणरागिणींनी महिलांच्या गटात अजिंक्यपदाचा झेंडा फडकावला, तर रेल्वेच्या शिलेदारांनी पुरुष गटात आपले वर्चस्व सिद्ध केले. महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडिशाला नमवले, तर पुरुषांच्या अंतिम लढतीत रेल्वेने महाराष्ट्रावर रोमहर्षक विजय मिळवला. या स्पर्धेत धाराशिव, महाराष्ट्राच्या संध्या सुरवसेला राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, तर रेल्वेच्या रामजी कश्यपला (सोलापूर) एकलव्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. महिलांमध्ये महाराष्ट्राचे हे २७ वे, तर पुरुषांमध्ये रेल्वेचे १३ वे अजिंक्यपद ठरले.

**स्पर्धेतील मानकरी**

महिला गट: राणी लक्ष्मीबाई पुरस्कार - संध्या सुरवसे (महाराष्ट्र) सर्वोत्कृष्ट संरक्षक-अर्चना प्रधान (ओडिशा)सर्वोत्कृष्ट आक्रमक - प्रियंका इंगळे (महाराष्ट्र) पुरुष गट: एकलव्य पुरस्कार - रामजी कश्यप (रेल्वे)सर्वोत्कृष्ट संरक्षक - प्रतीक वाईकर (महाराष्ट्र) सर्वोत्कृष्ट आक्रमक - अभिनंदन पाटील (रेल्वे).

महाराष्ट्राच्या रणरागिणींनी राखले वर्चस्व राखत महिलांच्या अंतिम सामन्यात ओडिशावर २३-२२ असा १ गुणाने थरारक विजय मिळवला. महाराष्ट्राच्या विजयात प्रियंका इंगळे (२.१० मि. संरक्षण व १० गुण), संध्या मोरे (२.४० मि. संरक्षण), संध्या सुरवसे (२.३० मि. संरक्षण) आणि अश्विनी शिंदे (१.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी निर्णायक योगदान दिले. पराभूत ओडिशाकडून अर्चना प्रधान (२.१० मि. संरक्षण व २ गुण), अर्चना माझी (नाबाद १.५० मि. संरक्षण), मधुस्मिता ओझा (१.४० मि. संरक्षण व २ गुण) आणि शोभाश्री सिंग (१.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी जबरदस्त लढत दिली; मात्र त्यांचा प्रयत्न अपुरा ठरला.

पुरुषांच्या महाअंतिम सामन्यात रेल्वेने महाराष्ट्राचा २६-२१ असा ५ गुणांनी पराभव करत जेतेपद पटकावले. मध्यंतराला रेल्वे संघ १४-११ ने आघाडीवर होता. विजयी रेल्वे संघाकडून रामजी कश्यप (नाबाद २.३० मि. संरक्षण व २ गुण), महेश शिंदे (१.४० मि. झुंज), जगन्नाथ दास (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), अरुण गुणकी (१.३७ मि. संरक्षण व २ गुण) आणि अभिनंदन पाटील (४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. महाराष्ट्राकडून प्रतीक वाईकर (१.५५ मि. संरक्षण व २ गुण), अनिकेट चेंदवणकर (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) आणि शुभम उतेकर (नाबाद १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंजार खेळ केला. महाराष्ट्राचा पुरुषांमध्ये कोल्हापूरवर तर महिलांमध्ये दिल्लीवर विजयपुरुषांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राने कोल्हापूरवर २९-२७ असा २ गुणांनी विजय मिळवला, तर दुसर्‍या उपांत्य सामन्यात रेल्वेने ओडिशाचा २५-१७ असा ८ गुणांनी पराभव केला. महिलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राने दिल्लीवर २७-०६ असा एक डाव व २१ गुणांनी दणदणीत विजय नोंदवला, तर ओडिशाने विमान प्राधिकरणावर २७-१९ असा ८ गुणांनी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

# आरुष कोल्हे मुंबई संघाचा कर्णधार

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीचा खेळाडू आरुष कोल्हे यांची मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे.

१४ वर्षाखालील मुंबई संघाकडून खेळताना आरुष यांनी सातत्याने चांगली कामगिरी केली होती तसेच मुंबईतील निवड चाचणी स्पर्धेत ही सतत मोठी धावसंख्या त्यांनी उभारली होती व अनेकदा शतकी खेळी करून संघाला विजय मिळवून दिला आहे.

गतवर्षीच्या क्रिकेट हंगामात तो मुंबईच्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाचा उपकार्णधार होता. यावेळी मात्र त्याच्या खेळातील सातत्य व नेतृत्वाचे गुण बघून त्याची कर्णधार पदी



निवड करण्यात आली आहे. महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीत आरुषने क्रिकेटचे

**■ चाचणी स्पर्धेत साकारली मोठी धावसंख्या**

**■ अनेकदा शतकी खेळी करून संघाला केले विजयी**

धडे गेली ८ वर्ष घेत आहे. आरुषची मेहनत व खेळातील सातत्य उल्लेखनीय असून त्याच्या यशात त्याच्या आई वडिलांचे नेहमीच प्रोत्साहन मिळत आहे.त्याच्या या निवडीबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.त्याच्या निवडी बद्दल एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आवेश चिचकर यांनी कौतुक केले असून आरूष हा मेहनती व तितकाच गुणवान खेळाडू असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.१८ जानेवारीपासून गुजरात येथे पश्चिम विभागीय १४ वर्षाखालील मुलांच्या

क्रिकेट स्पर्धेत आयुष मुंबई संघाचे नेतृत्व करणार आहे. या स्पर्धेत गुजरात, बरोद्रा, सौराष्ट्र, महाराष्ट्र, मुंबई हे संग सहभागी होणार आहेत. स्पर्धेत महाडचा आरुष हा मुंबई संघाचे नेतृत्व करणार असल्याने महाड व संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे.

त्याच्या निवडीबद्दल एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष बशिर चिचकर, संजीव शेठ, विजय जाधव, कल्याण जगदाळे, ॲड.दत्ता वाडकर, ॲड. पंकज पंडित, संदिप शेठ, अशोक कोकणे, विनायक जाधव, अनिल हेलेकर यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र विजयासह बाद फेरीत दाखल



**। विजयवाडा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राने ५१व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवीत बाद फेरी गाठली. या विजयाने महाराष्ट्राने ‘ब’ गटात अव्वल स्थान पटकाविले. विजयवाडा, आंध्र प्रदेश येथील बंदिस्त क्रीडा संकुलातील मॅटवर झालेल्या ‘ब’ गटातील दुसर्‍या साखळी सामन्यात महाराष्ट्राने चुरशीच्या लढातीत उत्तराखंडचा प्रतिकार ५०-४७ असा मोडून काढला. झोकात सुरुवात करीत महाराष्ट्राने ४थ्या मिनिटाला लोण देत १०-०१ अशी आघाडी घेतली. पण त्याने हार न मानता उत्तराखंडने त्या लोणची परतफेड करीत ११-१६ अशी आघाडी कमी केली.

उत्तरार्धात सामना रंगतदार अवस्थेत पोहचला. ४ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या महाराष्ट्राने आक्रमक खेळ करीत लोण देत ४३-३४ अशी आघाडी घेतली. पुन्हा उत्तराखंडने लोण देत ही आघाडी ४३-४४ अशी कमी केली. शेवटच्या ५मिनिटात सामना ४६-४६ अशा बरोबरीत असताना शुभम बिटकेने चतुरईने बोनस व नंतर दोन गुण घेत महाराष्ट्राच्या विजयात महत्वाची भूमिका वठविली. त्याला चढाईत जीत सिंग, तर पकडीत अतुल जाधव व वेदान्त जाधव यांची मोलाची साथ लाभली.

## ऑस्ट्रेलियन ओपन जिंकण्यासाठी दिग्गज सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२६ च्या ऑस्ट्रेलियन ओपनला १८ जानेवारी रोजी सुरुवात होणार आहे. गेल्या हंगामात जॅनिक सिनरनं पुरुष एकेरीचे विजेतेपद जिंकले होते, तर मॅडिसन कीजनं महिला एकेरीचे विजेतेपद जिंकले होते. आता तिचे लक्ष सलग दुसर्‍यांदा विजेतेपदावर असेल. मात्र, तिला नोवाक जोकोविच आणि कार्लोस अल्काराझ यांच्यासारख्या कठीण स्पर्धेला सामोरे जावे लागेल. यावेळी, आर्यना सबालेन्का आणि इगा स्वाएटेक महिला जेतेपदाच्या शर्यतीत आहेत.

ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ च्या वेळापत्रकानुसार, पहिल्या फेरीचे सामने १८ ते २० जानेवारी दरम्यान, दुसर्‍या फेरीचे सामने २१ आणि २२ जानेवारी रोजी आणि तिसर्‍या फेरीचे सामने २३ आणि २४ जानेवारी रोजी सुरु होतील. चौथ्या फेरीचे सामने २५ आणि २६ जानेवारी रोजी खेळवले जातील, तर उपांत्यपूर्व फेरीचे सामने २७ आणि २८ जानेवारी रोजी होतील. महिला एकेरीचे दोन्ही उपांत्य सामने २९ जानेवारी रोजी होतील, तर पुरुष एकेरीचे उपांत्य सामने ३० जानेवारी रोजी होतील. महिला एकेरीचा अंतिम सामना ३१ जानेवारी रोजी होईल आणि पुरुष एकेरीचा अंतिम सामना १ फेब्रुवारी रोजी होईल. २०२६ मधील पहिली ग्रँड स्लॅम स्पर्धा असलेल्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत बक्षीस रकमेत लक्षणीय वाढ झाली आहे.

# फिफाच्या तिकिटांची विक्रमी विक्री

**। झुरिच । वृत्तसंस्था ।**

आगामी फिफा विश्‍वचषक २०२६ साठी जगभरातील फुटबॉल चाहत्यांमध्ये अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळत आहे. ११ डिसेंबर २०२५ ते १३ जानेवारी २०२६ या काळात चाललेल्या रँडम सिलेक्शन ड्रॉ तिकीट विक्रीच्या टप्प्यात जगभरातून ५० कोटींहून अधिक तिकीट अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती फिफाने दिली आहे. या विक्रमी मागणीमुळे फिफा विश्‍वचषक २०२६ हा क्रीडा इतिहासातील सर्वात मोठा इव्हेंट ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तिकिट विक्रीसाठी अर्ज मागणीच्या ३३ दिवसांच्या या कालावधीत दररोज सरासरी १.५ कोटी अर्जांची नोंद झाली. फिफाच्या २११ सदस्य देशांमधील सर्वच प्रदेशांतून चाहत्यांनी अर्ज




केले आहेत.

प्रथमच या स्पर्धेत ४८ संघ सहभागी होणार आहेत. सर्वाधिक मागणी असलेले देश: यजमान देश अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा वगळता जर्मनी, इंग्लंड, ब्राझील, स्पेन, पोर्तुगाल, अर्जेंटिना आणि कोलंबिया या देशांमधून सर्वाधिक अर्ज आले आहेत. सर्वात लोकप्रिय सामने चाहत्यांमध्ये सर्वाधिक आकर्षण असलेल्या पाच सामन्यांची यादीत कोलंबिया विरुद्ध पोर्तुगाल (२७ जून, मियामी) - या टप्प्यातील सर्वात जास्त मागणी असलेला सामना. मेक्सिको विरुद्ध दक्षिण कोरिया (१८ जून, ग्वाडालाजारा) विश्‍वचषक फायनल (१९ जुलै, न्यूयॉर्क न्यू जर्सी). स्पर्धेचा उद्घाटन सामना : मेक्सिको विरुद्ध दक्षिण आफ्रिका (११ जून, मेक्सिको सिटी).राऊंड-ऑफ-३२ सामना (२ जुलै, टोरँटो). चाहत्यांना ५ फेब्रुवारी २०२६ पासून ई-मेलद्वारे कळवला जाईल. मागणी उपलब्ध तिकिटांपेक्षा जास्त असल्याने, रँडम सिलेक्शनद्वारे पारदर्शकपणे तिकिटांचे वाटप केले जाईल. ज्यांचे अर्ज यशस्वी होतील, त्यांच्या क्रेडिट कार्डवरून तिकिटाचे पैसे आपोआप कापले जातील. ज्यांना या टप्प्यात तिकीट मिळणार नाही, त्यांना स्पर्धा सुरू होण्यापूर्वी लास्ट मिनीट सेलमध्ये तिकिट खरेदीची पुन्हा संधी मिळेल. हा सेल आधी येईल त्यास प्राधान्य या तत्त्वावर असेल. फिफाने चाहत्यांना अधिकृत वेबसाईटवरूनच तिकिटे घेण्याचे आवाहन केले आहे.

**प्लेइंग इलेव्हनमध्ये अमेरिकेत खेळाडू नाही | महाराष्ट्राच्या उत्कर्ष श्रीवास्तवचा समावेश**

# संघ अमेरिकेचा अन् खेळाडू भारतीय

**। बुलावायो । वृत्तसंस्था ।**

आयसीसी पुरुष १९ वर्षांखालील विश्‍वचषक १५ जानेवारी सुरु झाला आहे. यातील पहिला सामना अमेरिकेच्या १९ वर्षांखालील आणि भारताच्या १९ वर्षांखालील संघांमध्ये झाला आहे.

अमेरिकेन संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये अमेरिकेत जन्मलेला कोणताही खेळाडू नव्हता. संघाचे नेतृत्व १८ वर्षीय उत्कर्ष श्रीवास्तव करत आहे. ज्याचा जन्म १८ फेब्रुवारी २००७ रोजी महाराष्ट्रातील पुणे इथे झाला. आणखी एक गोष्ट लक्षात



घेण्यासारखी आहे की अमेरिकन संघातील सर्व १५ सदस्य भारतीय वंशाचे असल्याचे दिसून येते.

बुलावायोमध्ये सहभागी झालेल्या अमेरिकन संघातील नावे बघा, साहिल गर्ग, अमरिंदर गिल, अर्जुन महेश (यष्टीरक्षक), उत्कर्ष श्रीवास्तव (कर्णधार), ऋत्विक अप्पीडी, अदनीत झांब, अमोघ अरेपल्ली, नितीश सुदिनी, सबरीश प्रसाद, आदित कप्पा आणि ऋषभ शिंपी हे सर्व भारतीय वंशाचे असल्याचे दिसून आले.

अमेरिकन संघात पारंपारिक अमेरिकन नाहीत. आयसीसीने त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवर या खेळाडूंचे फोटो शेअर केले तेव्हा काही चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली आणि त्यांना एनआरआय (अनिवासी भारतीय) संघ म्हटले आहे.

मात्र, हे काही नवीन नाही, कारण अनेक देशांमध्ये क्रिकेट स्थलांतरित समुदायांवर आधारित आहे. अमेरिकेतील क्रिकेटची पातळी प्रामुख्याने भारतीय, पाकिस्तानी, श्रीलंकन, वेस्ट इंडियन आणि इतर आशियाई डायस्पोराच्या सदस्यांवर अवलंबून असते. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, क्रिकेट हा अमेरिकेत व्यापक लोकप्रिय खेळ नाही, शाळा किंवा महाविद्यालयीन पातळीवर या खेळाचा फारसा विकास झालेला नाही.

१९ वर्षांखालील पात्रता निकषांमध्ये खेळाडू ज्या देशात जन्मले आहेत किंवा ज्या देशात त्यांचे नागरिकत्व/निवासस्थान आहे त्या देशाचे प्रतिनिधित्व करु शकतात असे नमूद केले आहे.

अमेरिकेत जन्मलेले नसले तरी, खेळाडू तिथे राहतात किंवा नागरिक आहेत. तांत्रिकदृष्ट्या, हा एक अमेरिकन संघ आहे, परंतु सांस्कृतिक आणि क्रिकेटच्या दृष्टीने, तो भारतीय डायस्पोरा संघासारखा आहे.

**विश्‍वचषकाचा संघ :**

अमरिंदर गिल, साहिल गर्ग, अर्जुन महेश (यष्टिरक्षक), उत्कर्ष श्रीवास्तव (कर्णधार), अदनीत झांब, अमोघ अरेपल्ली , नितीश सुदिनी, शिवा शानी, आदित कप्पा, साहिर भाटिया, रायन ताज, अद्वैत कृष्णा, सबरीश प्रसाद, ऋत्विक अप्पीडी आणि ऋषभ शिंपी यांचा समावेश आहे.

## आयुषने टाळले हस्तांदोलन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि बांगलादेश, या शेजारील राष्ट्रांमध्ये वाढलेल्या तणावाचे पडसाद १९ वर्षांखालील वर्ल्ड कप स्पर्धेतील भारत-बांगलादेश लढतीत पाहायला मिळाले. कर्णधार आयुष म्हात्रे याने नाणेफेक करताना बांगलादेशचा कर्णधार अजिजुल हकिम याच्याशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. त्यामुळे आता नवा वाद पेटला आहे. त्यात सूर्यवंशीनेही आपल्या आक्रमक खेळीने बांगलादेशच्या गोलंदाजांना रडवले होते. त्यामुळे ते त्याला भिडले, काही काळासाठी सामन्यातील वातावरण तापले होते. भारतीय संघाने वर्ल्ड कप स्पर्धेतील पहिल्या सामन्यात अमेरिकेवर विजय मिळवला होता आणि बांगलादेश त्यांचा पहिलाच सामना खेळला जात आहे.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी भारताचा कर्णधार आयुषने त्याच्याशी हस्तांदोलन टाळले. बांगलादेशात हिंदूवर अत्याचार होत आहे. त्यामुळे भारतात त्यांच्याविरोधात संतापाची लाट आहे. त्यामुळेच इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मधून बांगलादेशी गोलंदाज मुस्ताफिजूर रहमानची हकालपट्टी केली गेली. त्यामुळे चवताळलेल्या बांगलादेश सरकारने आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी भारतात येण्यास नकार दिला. शिवाय आयपीएलच्या सामन्यांचे प्रक्षेपणावर देशात बंदी घातली आहे. अशात आयुषच्या या पवित्र्याने बांगलादेशी आणखी खवळले आणि त्यांनी सामन्यात राग काढण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)